
साम्राज्यांतील आपले

भाग १ ला—ब्रिटिश बेटांतील लोक



पृ० १४] सुएजच्या कालव्यांतून —

ना. म. पटवर्धन

साम्राज्यांतील आपले संबंधी

भाग १ ला

ब्रिटिश बेटांतील लोक

लेखक

ना. म. पटवर्धन, एम्. ए., एल्. टी.,

प्रिन्सिपल—अध्यापिकाशाला, हिंगणें.

१९३२

किंमत १० आणे

मुद्रक:
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु आणि कंपनीज प्रेस,
५१३ शनवार, पुणें २.

प्रकाशक:
ना. म. पटवर्धन,
हिंगणें, पुणें नं. ४.

प्रो० ना. ग. नारळकर यांचें पत्र

श्री

ऑफिसर्स कँप,

कोरेगांव, २२-१२-३२

तीं० दादा यांस–

सा. न. वि. वि. आपलें पत्र पोंचलें. पुस्तकाकडे शिक्षणशास्त्रज्ञाच्या चिकित्सक दृष्टीनें न पाहतां सर्वसामान्य वाचकाच्या दृष्टीनें पाहून काय वाटतें हें पत्ररूपानेंच कळवा असें तुम्ही लिहितां. एका दृष्टीनें मला ही तुमची कल्पना फार पसंत पडली. कारण माझ्या मूळच्या बेताप्रमाणें प्रस्तावना लिहावयाची म्हणजे एकतर मला अजून कमींत कमी १५–२० दिवस तरी लागतील. आणि तोंपर्यंत तुमच्या नाताळांतील वर्गाचें काम खलास होऊन वर्गास येणाऱ्या शिक्षकांचे नजरेस आपलें पुस्तक पडावें, त्यांनीं आपल्याला चांगलें म्हणावें, व जमल्यास थोड्याबहुत प्रतीहि खपाव्या ही जी तुमची मनांतली इच्छा ती सफल होणार नाहीं. दुसरें असें कीं, प्रस्तावना लिहावयाची म्हणजे लिहिणारावर टीकाकाराइतकी नसली तरी–थोडी तरी जबाबदारी पडतेच, व लिहिण्यांत एकप्रकारचा औपचारिकपणा व परकेपणा हे येतातच; व ते तर मला नको असतात. तेव्हां तुम्हीं सुचविलेला पत्राचा मार्गच मला जास्त पसंत पडला आहे. अर्थात् अशा पत्रांत मला माझीं भूगोलशिक्षणविषयक मतें पूर्णपणें मांडतां येणार नाहींत हेंहि कांहीं खोटें नाहीं. पण सगळेंच कसें साधणार ?

अगदीं खरेंखुरें, व तेंहि एकदमच सांगावयाचें म्हणजे तुमचें हें पुस्तक मला तुमच्या पहिल्या तिन्ही पुस्तकांइतकेंच आवडलें. पहिल्या तिन्ही पुस्तकांत तुम्हीं '**जगांतील मौजा**,' '**जगांतील मुलें**' व जगांतील निरनिराळ्या चालीरीति ह्यांसंबंधीं थोडथोडी माहिती देऊन मुलांना जगाची नुसती तोंडओळखच करून दिलीत. त्यापुढच्या पुस्तकांत निरनिराळे देश घेऊन त्यांची सविस्तर–पण मुलांना रुचेल अशी व पचेल इतकी–माहिती देणें क्रमप्राप्तच होतें. या दृष्टीनें तुम्हीं आतां एकेका देशाची माहिती देण्यास सुरुवात केलीत हें ठीक

झालें. पण देशाची निवड करतांना तुम्ही हिंदुस्थानापासूनच सुरुवात केली असतीत तर बरें झालें असतें. ज्ञाताकडून अज्ञाताकडे जावयाचें, किंवा जवळच्यापासून सुरुवात करून दूर दूर जावयाचें, या शिक्षणशास्त्रांतील दंडकाप्रमाणें तुम्हीं प्रथम आपल्या हिंदुस्थान देशाचीच माहिती द्यावयास नको होती काय ? स्वतःच्या देशासंबंधीं प्रथम कांहीं एक न सांगतां एकदम दुसऱ्या देशांविषयीं लिहावयास घेणें हा दोष तुमच्या 'जगांतील मुलें' या पुस्तकांत जसा झाला होता, तसाच तो याहि प्रसंगीं झाला आहे असें मला वाटतें. ब्रिटिश बेटांसंबंधींच्या माहितीचीं पुस्तकें बाजारांत जितकीं उपलब्ध आहेत तितकीं हिंदुस्थानच्या माहितीसंबंधीं नसल्यामुळें, व जीं कांहीं आहेत तीं हिंदी दृष्टीनें लिहिलीं नसल्यामुळें प्रथमतः ब्रिटिश बेटांसंबंधींच लिहिणें तुम्हांस जास्त सुकर वाटलें असावें. खरें सांगायचें म्हणजे तुम्हांला काय किंवा मला काय, पूर्णपणें स्वतंत्र असें अद्याप लिहितांच येत नाहीं. कोठलें तरी इंग्रजी पुस्तक घे, व त्याचें सपशेल भाषांतर कर–किंवा फार झालें तर रूपांतर कर—असें आपलें होतें. हिंदुस्थानासंबंधीं तुम्हाला हवें तसें पुस्तक एकादा साहेब जेव्हां लिहील तेव्हां त्याचें पाहून तुम्ही लिहिणार ! हरकत नाहीं. या वेळीं झालें नाहीं तरी तुमचें पुढचें पुस्तक तुम्हीं हिंदुस्थानाबद्दलचेंच लिहावें, असें मी आग्रहानें म्हणेन.

भूगोलाच्या सजीव व निर्जीव अशा दोन बाजू मानतां येतील. त्याच्या निर्जीव बाजूंत डोंगर, पर्वत, भूशिरें, समुद्र, सामुद्रधुन्या, आखातें, नद्या, बेटें, हवा, पाणी, पिकें इ० गोष्टींचा समावेश होतो; तर त्याच्या सजीव बाजूंत वनस्पति, पशुपक्षी, कीटक वगैरे जीवसृष्टि व विशेषतः मनुष्य प्राणी–त्याच्या चालीरीति, त्याचें अन्न-पाणी, घरें, पोषाख, त्याचीं कामेंधामें–इत्यादींचा अंतर्भाव होतो. आपल्या वेळच्या भूगोलाच्या पुस्तकांत पहिल्या म्हणजे निर्जीव बाजूवरच विशेष लक्ष दिलें जात असे. डोंगर, नद्या, आखातें, भूशिरें यांच्या जंत्र्या पाठ केल्या, कीं काम भागे पण त्याचा परिणाम काय झाला हें आपल्याला माहीत आहेच. 'इंग्लंड लंडन टेम्सनदीवर' असें सात वर्षें घोकूनहि इंग्लंडमध्यें कोणते लोक राहतात, व आपण इकडे जे इंग्रज लोक पाहतों—ते तिकडूनच येतात येवढी साधी माहितीसुद्धां आपल्याला त्या वेळीं असेल नसेल. याच्या उलट तुम्हीं आपल्या पुस्तकांत भूगोलाच्या सजीव बाजूकडे जास्त लक्ष दिलें

आहेत ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. तुम्हीहि मुंबई ते लंडनपर्यंत लागणारे समुद्र, बेटें, बंदरें, देश, गांवें वगैरे दिलीं आहेत. तसेंच प्रत्यक्ष ब्रिटिश बेटांत असलेले डोंगर, किनाऱ्याचे व जमिनींचे निरनिराळे प्रकार, तेथें वाहणाऱ्या नद्या, तेथें पडत असलेलीं हवा व पाऊस, तेथें पिकणारीं पिकें, सांपडणारे धातु वगैरे निवळ भौगोलिक गोष्टींची माहिती तुम्हींहि दिली आहे. परंतु ती देत असतांना त्या त्या गोष्टींचा तेथें राहणाऱ्या मनुष्यप्राण्याच्या जीवनावर व त्याच्या राहणीवर काय परिणाम झाला, किंवा उलट मनुष्यानें मूळच्या परिस्थितींत आपल्या कर्तृत्वानें काय काय फेरबदल करून ती जीवनोउपयोगी करून घेतली हेंहि तितक्याच ठळक रीतीनें तुम्हीं दाखविलें असल्यामुळें तुमचें पुस्तक वाचीत असतांना आपण रूक्ष व निर्जीव भूगोलावरून भुताप्रमाणें भटकत नसून मनुष्यानें वसती केलेल्या एकाद्या रम्य व सजीव भूलोकांतून प्रवास करीत आहों असें वाटतें. (शब्द सुचलेच आहेत म्हणून विचारतों; मुलांनीं भूगोलाचा ज्या दृष्टींनीं अभ्यास करावा असें आपल्याला वाटतें त्या दृष्टीनें बोलावयाचें झाल्यास भूगोलाच्या पार्थिव बाजूपेक्षां त्याच्या लौकिक बाजूकडे मुलांची दृष्टि वेधण्याचे दृष्टीनें 'भूगोल' या शब्दापेक्षां 'भूलोक' हा शब्द तुम्हाला चांगला वाटत नाहीं ?) ब्रिटिश बेटांत राहणाऱ्या मुख्य प्रकारच्या लोकांचा जीवनक्रम यथातथ्य रंगविण्याचा तुम्ही जो प्रयत्न केला आहे तो पूर्णपणें नसला तरी पुष्कळच साधला आहे यांत शंका नाहीं. तुमच्या पुस्तकांतील हीच गोष्ट मला विशेष आवडली, व म्हणूनच मीं तिचा इतका विस्तारपूर्वक उल्लेख केला.

तुमचें पुस्तक वाचीत असतांना मला आपण तें वाचीत आहों असें न वाटतां कोणी तरी सांगत आहे व आपण नुसतें ऐकत आहों असा भास होत होता; आणि मुलांच्या दृष्टीनें पाहतां ही मोठीच करामत आहे. मुलांना मजेदार वाटेल व त्यांना समजेल अशीच माहिती देणें, भाषा साधी व घरगुती घालणें, उपमा, दाखले वगैरे मुलांच्या व्यवहारांतले देणें, मधून मधून संबोधनवाचक शब्दांनीं हांक मारणें, व विशेषतः मुलांच्या मनांतील शंका कल्पनेनें अगोदरच डोळ्यांपुढें आणून सांगतां सांगतां त्यांच्या शंकांचें समाधान करण्याचा प्रयत्न करणें इत्यादि युक्तींच्या योगानें पुस्तक खरोखरच बालबोध व

बालोचित झालें आहे; परंतु पुस्तक बालबोध व मनोरंजक करण्याच्या भरीस पडल्यामुळें पुष्कळ वेळां–कदाचित् तो अपरिहार्य असेल–एक दोष उत्पन्न झाला आहे हें तुम्हाला नाकबूल करतां येणार नाहीं. तुम्हीं पुष्कळ वेळां संख्या-विशेषणांनीं द्यावयाची माहिती नुसत्या परिमाणबोधक किंवा गुणवाचक विशेषणांनीं देतां उदाहरणार्थ–अमुक एक डोंगर इतके फूट उंच आहे, किंवा अमुक एका ठिकाणीं इतके इंच व इतके सेंट पाऊस पडतो किंवा अमुक एका खाणींत इतके टन कोळसा सांपडतो असें नक्की सांगण्याऐवजीं तुम्ही नुसतेंच फार उंच डोंगर, आतिशय पाऊस, खूप कोळसा असें म्हणतां व त्यामुळें तुमचें लिहिणें मोघमस्वरूपाचें व अनमानधपक्याचें वाटतें. तसेंच वस्तूवस्तूं-मधील कार्यकारणसंबंध दाखवितांना तुम्ही त्या संबंधाच्या अगदीं शेवटच्या दुव्यापर्यंत न जातां जवळच्या एक दोन दुव्यांशींच थबकतां व त्यामुळें तुम्हीं दिलेली कारणपरंपरा अगदीं वरवरची व तात्पुरत्या स्वरूपाची वाटून तेणें करून खऱ्या तज्ज्ञाचें समाधान होत नाहीं. हा मोघमपणा व चालचलाऊपणा अगदीं लहान मुलांच्या पुस्तकांतून चालूं शकतो–नव्हे शोभतोहि असें कदा-चित् तुम्ही म्हणाल; परंतु ज्या मुलांकरितां तुम्हीं हें पुस्तक लिहिलें आहे त्यांच्या दृष्टीनें पाहतां तें थोडें जास्त शास्त्रीय स्वरूपाचें हवें होतें यांत शंका नाहीं.

या पुस्तकांत तुम्हांला परदेशांतून जाऊन आलेल्या आपल्या आप्तमित्रांची पुष्कळच मदत झाली आहे व तुम्हीं त्यांचे अगदीं मनांतून आभारी असले पाहिजे. तुमच्या पत्नी सौ० गंगूबाई, रा० अत्रे, रा० कर्वे यांच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या माहितीचा नुसत्या पुस्तकांतून वाचलेल्या माहितीपेक्षां तुम्हाला कितीतरी जास्त फायदा झाला आहे. सबंध मजकुराला जो एक प्रकारचा प्रत्यक्षपणा आला आहे तो त्यांच्यामुळेंच असावा. तुम्हीं स्वतःच जर ह्या सर्व गोष्टी पाहिल्या असत्या तर–परंतु तुम्हांला त्या तश्या पाहातां आल्या नाहींत याचें वाईट वाटत असतांनाच तुम्ही न पहातांहि केवळ ऐकीव व वाचलेल्या माहितीवरून इतकें चांगलें लिहूं शकतां याबद्दल थोडेंसें कौतुकहि वाटतें. मुख्य चित्र यथातथ्य पण उठावदार दिसावें म्हणून चिताऱ्याला चित्राला उचित अशी पार्श्वभूमि रंगवावी लागते; परंतु ही पार्श्वभूमि फार पाल्हाळानें न चितारतां शक्य तितक्या थोड्या परंतु

ठसठशीत रेघांनीं दाखविली तरच ती, व मुख्य चित्र हीं सुशोभित दिसतात. वर्णन यथातथ्य करणें म्हणजे प्रत्येक बारीकसारीक गोष्टी सुद्धां खचून व भरमसाटपणें भरणें अशी पुष्कळांची समजूत असते; आणि म्हणूनच पुष्कळशा भूगोलाच्या पुस्तकांतून एकून एक गांव, एकून एक डोंगर किंवा एकून एक नदी यांचें वर्णन करण्याच्या भरीस लेखक पडलेले दिसतात. पण त्यामुळें त्यांचें पुस्तक रेल्वे गाईडपेक्षां कांहीं जास्त किंमतीचें होत नाहीं. तुम्ही बरीक सर्व बारीकसारीक गोष्टींना फांटा दिला असून जगाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या अशाच गोष्टींचें वर्णन केलें आहे ही फार चांगली गोष्ट आहे.

तुमच्या पुस्तकांत एकाच तऱ्हेचा मजकूर पुष्कळ वेळां पुनःपुन्हा येऊन एक प्रकारची पुनरुक्ति झाली आहे. मात्र माहिती तीच असली तरी ती निरनिराळ्या संदर्भानें व सहज आली असल्यामुळें ती पुनरुक्ति तितकीशी दोषास्पद न ठरतां एक प्रकारें फायद्याचीच झाली आहे. कारण एकच गोष्ट निरनिराळ्या नात्यांनीं, निरनिराळ्या कारणांनीं पुढें आली म्हणजे तिचें यथातथ्य ज्ञान होण्यास व ती लक्षांत राहण्यास चांगलीच मदत होते.

आतां आणखी बारीकसारीक मुद्द्यांत न शिरतां, तुमचें पुस्तक वाचीत असतांना ज्या कांहीं शंका मनांत आल्या त्या तुम्हांपुढें मांडून पत्र संपवितों. हें पुस्तक लिहावयास घेतांना तुम्हीं आपल्या मनाची अशी कल्पना करून घेतली आहेत, कीं हिंदुस्थान हा देश ब्रिटिश साम्राज्याचा एक स्वतंत्र घटक असून त्याला इतर घटकांशीं बरोबरीच्या नात्यानें नांदतां येतें आहे. तसें जर असेल तरच तुमच्या पुस्तकाचें नांव सार्थ ठरेल. वस्तुस्थिति तशी नसल्यास आतांच्या नांवांत कार्य अर्थ उरला? दुसरीहि एक गोष्ट तुम्ही गृहीत धरून चालला आहां, व ती म्हणजे मजूर पक्ष दिवसेंदिवस जास्त कार्यक्षम ठरून पुढें येणार. लिहायला सुरुवात करतांना तशी स्थिति होती व ती तशीच पुढेंहि राहील असें वाटण्याला जागाहि होती; परंतु आतांहि तसेंच म्हणतां येईल काय? तसेंच इंग्रज मनुष्य तुम्हीं जितका चांगला रंगविलेला आहे तितका तो खरोखरचाच आहे काय? हिंदुस्थानांतील प्रत्यक्ष अनुभव तर पुष्कळ वेळां निराळा येतो. तसेंच मनुष्यांत दिसून येणारे गुणदोष व त्याचा स्वभाव हे ज्या भौगोलिक परिस्थितींत तो जन्माला येतो व वाढतो त्या परिस्थितीमुळेंच सर्वस्वीं बनलेले

असतात असें नेहमींच दिसून येतें काय ? हिंदुस्थानचा किनारा इंग्लंडच्या किनाऱ्याइतका दंतुर होणें आतां तर कांहीं शक्य दिसत नाहीं व म्हणून हिंदी लोकांना इंग्रज लोकांइतकें शूर, दर्यावर्दी, धाडशी कधींच का होतां येणार नाहीं ? असो. असे पुष्कळ प्रश्न तुम्हाला या निमित्तानें विचारावेसें वाटून त्याला माझीं काय उत्तरें आहेत तेंहि सांगावेंसें वाटतें; परंतु तें सर्व पत्रांत लिहितां येणें शक्य नसल्यामुळें सुरुवातीसच म्हटल्याप्रमाणें थोडासा तोटाहि झाला आहे. आपल्याच माणसाचे गुण आपणच सांगावयाचे नसतात हें खरें असलें तरी आपलेंच माणूस झालें तरी त्याला विनाकारण नांवेंहि ठेवणें योग्य होणार नाहीं; आणि म्हणूनच खरोखर सांगायचें म्हणजे तुमचें पुस्तक मुलांच्या दृष्टीनें सुंदर झालें असून त्यांना तें पूर्णपणें आवडेल असें मला नक्की वाटतें. वर मधून मधून दाखविलेले दोष, व शेवटीं ध्वनित केलेल्या शंका मोठ्या माणसांच्या दृष्टीलाच दिसून येणाऱ्या असल्यामुळें लहान मुलांना पुस्तक मनोरंजकच वाटेल यांत शंका नाहीं. या तुमच्या पुस्तकाच्या द्वारें तुम्हांला यशोलाभ व अर्थप्राप्तिहि होवो असें अभीष्ट चिंतन करून मी हें पत्र पुरें करतों. कळावें, हे विनंति.

आपला

नाना नारळकर

अनुक्रमणिका

साम्राज्यांतील आपले संबंधी


भाग १ ला

ब्रिटिश बेटें

प्रकरण १ लें

ब्रिटिश साम्राज्य

आपला हिंदुस्थान देश केवढा मोठा आहे, तो किती सुपीक आहे, त्यांत किती निरनिराळ्या प्रकारचे लोक राहतात, त्यांत पाहण्यासारख्या कोणकोणत्या गोष्टी आहेत, इत्यादी-संबंधींची बरीचशी कल्पना तुम्हांला आतांपर्यंत आली असेलच. पसतीस कोट लोकसंख्येचा, एकाद्या खंडायेवढ्या विस्ताराचा, व अत्यंत सुबत्तेचा असा देश पूर्णपणें आपल्या ताब्यांत असावा म्हणून हिंदु, मुसलमान, मोगल, फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रज वगैरे देशी–विदेशी लोकांनीं आज शेंकडों वर्षें कितीतरी प्रयत्न केले आहेत! त्याकरितां त्यांच्या आपापसांत वेळोवेळीं कितीतरी लढाया झाल्या आहेत! मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन जेथला जेथला प्रांत त्यांना बळकावितां आला तेथला तेथला प्रांत बळकावून त्यांनीं आपापलीं राज्यें थाटलीं, व अद्याप-हि त्यांपैकीं कांहीं भाग त्यांच्या वंशजांकडे शिल्लक आहेत. परंतु सबंध हिंदुस्थान आपल्या एकट्याच्या मालकीचा असावा अशी महत्त्वाकांक्षा एका इंग्रज लोकांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि लोकांची


ग्रीनलंड
कानडा
ब्रिटिश बेटें
युरोप
आशिया
न्युफाउंडलंड
युनायटेड स्टेटस
आफ्रिका
हिंदुस्थान
अटलांटिक
पॅसिफिक
महासागर
ग्यायना
महासागर
दक्षिण अमेरिका
बोर्निओ
न्युगिनी
हिंदि महासागर
आस्ट्रेलिया
न्यु झिलंड
फॉकलंड (ब्रि.)

ब्रिटिश साम्राज्य

सफल झाली नाहीं. आज शेंसवाशें वर्षे हिंदुस्थान पूर्णपणें इंग्रजांचे ताब्यांत असून म्हैसूर, हैदराबाद, कोल्हापूर, बडोदें, ग्वालेर, काश्मीर वगैरे देशी राज्यें, व गोवें पाँदेचरीसारखीं विदेशी राज्यें हिंदुस्थानच्या नकाशावर मधून मधून दिसत असलीं तरी तीं 'स्वतंत्र राज्यें' म्हणून राहिलीं नसून इंग्रजांचे हातांतील संस्थानें बनून राहिलीं आहेत!

इंग्रज लोकांचे ताब्यांत एकटें हिंदुस्थान, किंवा त्यांचा स्वतःचा देश इंग्लंड येवढेंच नसून आणखी कितीतरी देश त्यांचे ताब्यांत आहेत. वास्तविक त्यांचा मूळचा देश–इंग्लंड–फारच लहान–म्हणजे जवळ जवळ आपल्या महाराष्ट्रा येवढा–असून त्यांच्या ताब्यांत असलेला मुलूख मूळच्या देशाच्या जवळ जवळ शंभर पट आहे! या सर्वांना मिळून ब्रिटिश साम्राज्य असें म्हणतात. सोबतचा जगाचा नकाशा पहा. त्यांत ब्रिटिश साम्राज्यामध्यें मोडणारे सर्व देश व महत्त्वाचीं ठाणीं काळ्या रंगांत दाखविलीं आहेत. यांपैकीं कांहीं देश आशियांत तर कांहीं आफ्रिकेंत, कांहीं अमेरिकेंत तर कांहीं ऑस्ट्रेलिआंत असून लहानमोठीं बेटें तर सर्व बाजूंच्या समुद्रांत जणूं उधळून दिलीं आहेत! अबब! केवढें हें साम्राज्य! एका लहानशा बींतून मोठाथोरला वटवृक्ष वाढावा, किंवा लहानग्या वामनानें त्रिभुवन व्यापावें अशांतलाच हा प्रकार नाहीं का?

फार प्राचीन काळीं इटलीचा सीझर, ग्रीसचा शिकंदर, हिंदुस्थानचे अशोक व चंद्रगुप्त इत्यादि राजेलोकांनींहि निरनिराळे देश जिंकून मोठमोठीं साम्राज्यें स्थापिलीं होतीं; किंवा अलीकडेहि फ्रान्सचा नेपोलियन, रशियाचा झार, किंवा जर्मनीचा कायझर वगैरे राजांनींहि आपल्या राज्यांचा बराच विस्तार केला होता; परंतु ब्रिटिश साम्राज्याचे मानानें हीं साम्राज्यें कांहींच नव्हत!

पृथ्वी गोलाकार असल्यामुळें तिच्या एका बाजूवर सूर्य प्रकाशत असतांना दुसरी बाजू काळोखांत असणार हें उघडच आहे; परंतु ब्रिटिश साम्राज्य पृथ्वीच्या दोन्ही गोलार्धांवर कोठें ना कोठें असल्यामुळें त्यांतील कोणत्या ना कोणत्या भागावर सूर्य सदोदित प्रकाशत असतोच असतो. आणि म्हणूनच इंग्लिश लोक मोठ्या अभिमानानें असें म्हणतात, कीं आमच्या साम्राज्यावरील सूर्य कधींच मावळत नाहीं! हा त्यांचा अभिमान वृथा आहे असें कोण म्हणेल ?

ते कधीं कधीं आपल्या साम्राज्याला मुकुटाची उपमा देतात. सबंध साम्राज्याला मुकुट म्हटलें म्हटजे अर्थातच साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांना किंवा देशांना त्या मुकुटाचीं रत्नें असें म्हणावयास पाहिजे. आणि खरोखरच इंग्रज लोकांना ब्रिटिश साम्राज्यांतील सर्वच देश अगदीं रत्नांप्रमाणें अतिशय मौल्यवान् वाटतात. कारण त्यांपैकीं प्रत्येकामुळें इंग्लंडच्या समृद्धींत भर पडून एकंदर ब्रिटिश साम्राज्य परिपूर्ण झालें आहे. कॅनडा, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिआ वगैरे देश ब्रिटिश बेटांना गहूं पुरवून तेथील लोकांची भूक भागवितात, तर ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका वगैरे देश त्यांना लोंकर, कातडीं, मांस, फळें वगैरे पुरवून त्यांचें थंडीपासून निवारण करतात. तसेंच हिंदुस्थान, ईजिप्त वगैरेसारखे देश इंग्लंडच्या गिरण्यांना लागणारा कापूस तिकडे पाठवून त्यांतील मजुरांना काम पुरवितात. ब्रिटिश बेटांत तयार होणाऱ्या पक्क्या मालाचें मुख्य गिऱ्हाईक साम्राज्यांतील हेच देश असून ब्रिटिश बेटांतील वाढत्या लोकसंख्येला वस्ती करावयाला जागा देणारे देशहि हेच आहेत. अशा रीतीनें ब्रिटिश लोकांना आपल्या देशावर व साम्राज्यांतील इतर देशांवरहि कोणत्याना कोणत्या बाबतींत अवलंबून रहावें लागत असल्यामुळें सबंध साम्राज्याबद्दल त्यांस अगत्य वाटून

त्यांतील देशांचा त्यांनीं आस्थापूर्वक अभ्यास करणें हें क्रमप्राप्तच आहे. परंतु ह्या प्रत्येक देशाचेंहि ब्रिटिश बेटांवांचून कांहींच आडत नाहीं असें नाहीं. आपल्या हिंदुस्थानचीच गोष्ट घ्या ना. आपल्या देशांत धान्य, भाजीपाला, कापूस वगैरे शेतींचें उत्पन्न व इतर कच्चा मालहि मुबलक पिकत असला तरी कच्च्या मालाचे पक्के पदार्थ करण्याकरितां लागणारीं यंत्रें, तीं करण्याला लागणारें लोखंड, व चालविण्याला लागणारा कोळसा हीं बरींचशीं ब्रिटिश बेटांतूनच आणावीं लागत आहेत; आणि म्हणून आपल्याहि देशाचें ब्रिटिश बेटांवांचून नडत नाहीं असें नाहीं. शिवाय ब्रिटिश बेटांत व साम्राज्यांतील इतर देशांत लागत असलेल्या निरनिराळ्या शास्त्रीय शोधांचा व त्यामुळें होणाऱ्या सुखसोयींचा उपयोगहि आपणांस कांहीं कमी होत नाहीं. म्हणून आपणांसहि त्यांचेबद्दल आगत्य वाटून आपणहि त्यांचा आस्थापूर्वक अभ्यास केला पाहिजे. शिवाय आपण इतके दिवस ज्या साम्राज्यांत राहिलों व अजूनहि ज्या साम्राज्यांत इतरांप्रमाणें बरोबरीच्या नात्यानें राहण्याची आपली इच्छा आहे त्या साम्राज्याबद्दल आपल्याला मिळेल तेवढी माहिती मिळवावयास नको काय ?

आपण आगगाडींत किती थोडा वेळ बसतों; परंतु तेवढ्या थोड्या वेळांत सुद्धां आपल्या डब्यांतील माणसांबद्दल आपल्याला एकप्रकारचा आपलेपणा वाटूं लागतो. ते कोठून आले, कोठें जाणार, कोठें राहतात, काय करतात, काय खातात-पितात, याची चौकशी आपण करितों. त्यांच्या कपड्यांकडे, त्यांच्या बरोबरच्या सामानाकडे, फराळाच्या पदार्थांकडे, आपण किती बारकाईनें पाहात असतों ! त्यांचें बोलणें समजत नसलें तरी ते कसे बोलतात हें आपणांस ऐकावेंसें वाटतें. ज्यांचा आपला संबंध इतक्या थोड्या वेळापुरता

जडतो त्यांच्यासंबंधीं आपणांस इतकी वास्तपुस्त करावीशी वाटते, तर ज्यांचा आपला संबंध इतक्या दिवसांचा आहे त्यांच्यासंबंधीं आपण कितीतरी जास्त वास्तपुस्त केली पाहिजे. आगगाडींतील प्रवासी व आपण बोलाचालावयास व सोबत म्हणून एकमेकांस हवेसे वाटत असलों तरी खाण्यापिण्याचे बाबतींत किंवा पैशाअडक्याचे बाबतींत आपण एकमेकांवर मुळींच अवलंबून नसतों. परंतु आपण व ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देश हे तर याहि बाबतींत एकमेकांवर अवलंबून आहोंत; आणि म्हणून आपणां सर्वांना एकमेकांची माहिती झाली पाहिजे, एकमेकांबद्दल सहानुभूति वाटली पाहिजे, एकमेकांच्या आवडीं-निवडींकडे, मानापमानांकडे, सोयी-गैरसोयींकडे आपलेपणानें पाहण्याची वृत्ति आपणां सर्वांत उत्पन्न झाली पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे साम्राज्यांतील आपण सर्व लोक आप्त-संबंधी आहोंत असें आपणांस वाटावयास लागलें पाहिजे. आणि असें वाटूं लागलें म्हणजेच आपण खरा भूगोल शिकलों असें होईल.

ब्रिटिश साम्राज्यांत सुमारें पंचेचाळीस कोट लोक आहेत. हे लोक जसे निरनिराळ्या देशांतील आहेत, तसेच ते निरनिराळ्या जातींचे, निरनिराळ्या धर्मांचे, निरनिराळ्या वर्णांचे, निरनिराळ्या आचारांविचारांचे असून ते भाषाहि निरनिराळ्या बोलतात. येवढें सर्व साम्राज्य अवघ्या तीनशें वर्षांत बनलें असून तें कसें बनलें याचा इतिहास मोठा मनोरंजक व बोधप्रदहि आहे. हिंदुस्थानांत ज्यांना आपण 'इंग्रज' म्हणून म्हणतों, ते सर्व इंग्लंडचेच रहिवाशी असतात असें नाहीं. त्यांपैकीं कित्येक आयर्लंडचे आयरिश, स्कॉट्लंडचे स्कॉटिश्, वेल्सचे वेल्श लोकहि असतात. इंग्लंड, वेल्स, स्कॉट्लंड, व आयर्लंड, हे चारी देश स्वाभाविक दृष्ट्या वेगवेगळे असले तरी

ते इतके जवळ जवळ आहेत, व व्यापारी आणि राजकीय दृष्ट्या इतके एकत्र बांधलेले आहेत, कीं त्या सर्वांना 'संयुक्त राज्य' किंवा 'ब्रिटिश बेटें' अशा एकाच नांवानें ओळखण्यांत येतें. हे चारी देश प्रथम निरनिराळेच होते; परंतु इ. स. १२८२ चे सुमारास इंग्लंडच्या पहिल्या एडवर्ड राजानें वेल्श लोकांवर स्वारी करून तो सबंध प्रांत इंग्लंडच्या सत्तेखालीं आणिला. या जयाची आठवण म्हणूनच कीं काय, इंग्लंडच्या राजाच्या थोरल्या मुलाला 'प्रिन्स ऑफ् वेल्स्' असें म्हणण्याचा तेव्हांपासून प्रघात सुरू झाला. वेल्स व इंग्लंड जवळ जवळ असून त्यांचे दरम्यान डोंगर वगैरे अडथळेहि फारसे नसल्यामुळें इंग्लंडच्या राजांना वेल्स प्रांत लवकर घेतां आला. परंतु स्कॉटलंड हा अतिशय डोंगराळ मुलूख असल्यामुळें कितीतरी दिवस त्यानें इंग्लंडच्या राजांना दाद दिली नाहीं. इंग्लंडनें स्वाऱ्या कराव्यात, थोडासा मुलूख जिंकावा, परंतु पुन्हा कांहीं दिवसांनीं तो स्वतंत्र व्हावा असें कितीतरी दिवस चाललें होतें. शेवटीं १८ वे शतकाचे प्रारंभीं स्कॉट्लंडचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठीं इंग्लंडनें त्याच्याशीं तह करून त्याला बगलेंत मारलें; व अशा रीतीनें इंग्लंड, वेल्स् व स्कॉट्लंड हें एक राष्ट्र झालें. आयर्लंडहि एकदां इंग्लंडच्या ताब्यांत पूर्णपणें आलें होतें; परंतु त्या दोघांचें सामाजिक व धार्मिक बाबतींत कधींच न जुळल्यामुळें व प्रत्येकाच्या मनोवृत्तीहि अगदीं निराळ्या असल्यामुळें आयर्लंडचे पूर्णपणें स्वतंत्र होण्याचे प्रयत्न एकसारखे सुरू आहेत; व त्यांत त्यांना बरेंचसें यशहि आलें आहे. 'ब्रिटिश बेटें' या नांवांत आयर्लंडचा अंतर्भाव होत असूनहि कधीं कधीं बोलतांना 'ग्रेटब्रिटन व आयर्लंड' अशा निरनिराळ्या नांवांचा उपयोग करतात; व अशा रीतीनें आयर्लंडचें स्वातंत्र्य सूचित केलें जातें. इंग्लंड, आयर्लंड व स्कॉटलंड हीं एके काळीं

निरनिराळीं असून पुढें तीं एक झालीं हें दाखविण्याकरितां ब्रिटिश निशाणावर पांढरा, तांबडा व निळा अशा तिन्ही रंगांचे पट्टे असतात, व त्याला 'यूनिअन् जॅक' असें म्हणतात. साम्राज्यांत मोडणाऱ्या सर्व देशांवर हेंच निशाण फडकत असतें.

सोळाव्या शतकाचे अखेरपर्यंत ब्रिटिश राज्य ब्रिटिश बेटांपुरतेंच मर्यादित होतें; परंतु वाढत्या लोकसंख्येला व व्यापाराला वाव करून देण्याकरितां कांहीं धाडसी लोक मायदेशांतून भराभर बाहेर पडले, व जगांत जेथें जेथें वाट मिळेल तेथें तेथें गेले. कांहींनीं व्यापाराला सुरुवात करून संपत्तीबरोबरच राज्येंहि कमावलीं, कांहींनीं वसाहती थाटल्या, व कांहींनीं धर्मप्रसार करून लोकांना आपल्या अंकित केलें. अशा प्रकारें हिंदुस्थान, कॅनडा, ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका वगैरे देश हलके हलके ब्रिटिश अंमलाखालीं येऊं लागून ब्रिटिश राज्याचें रूपांतर ब्रिटिश साम्राज्यांत झालें, व इंग्लंडच्या राजाला 'अधिराज' (एंपरर) अशी आणखी एक बहुमानाची पदवी प्राप्त झाली.

वर शिकंदर म्हणून जो एक बादशहा सांगितला त्यानें आपलें साम्राज्य केवळ तरवारीचे जोरावर म्हणजे लोकांचा लढाईत पराभव करून मिळविलें; परंतु ब्रिटिश साम्राज्य कांहीं अशा प्रकारें निव्वळ तरवारीनें मिळविलेलें नाहीं. साम्राज्यांतील कांहीं देश त्यांनीं लढाया करून मिळविले असल्याचें आपणांस इतिहासांत दिसेल. उदाहरणार्थ रॉबर्ट क्लाइव्हनें प्लासीची लढाई मारून हिंदुस्थानांतील बंगाल प्रांत मिळविला, तर जनरल वूल्फनें त्याच वेळीं क्वेबेकच्या लढाईत यश मिळवून उत्तर अमेरिकेंतील कॅनडा प्रांत मिळविला. लॉर्ड रॉबर्टस्नें दक्षिण आफ्रिकेंत युद्ध करून तो देश काबीज केला, तर लॉर्ड किचनेरनें ईजिप्तचा भाग बळकाविला.

असें जरी असलें तरी ब्रिटिश लोकांनीं लढायांपेक्षां वसाहती करूनच जास्त भाग मिळविला आहे. सर फ्रान्सिस ड्रेक, सर वॉल्टर रॅले वगैरेनीं अमेरिकेच्या किनाऱ्याभोंवतीं सफरी मारून लहान लहान वसाहतींना सुरुवात केली, तर कॅप्टन कुक नांवाच्या खलाशानें न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिआ वगैरे देश शोधून काढून व तेथें वसाहती स्थापून, ते देश ब्रिटिश निशाणाखालीं आणले. लढायांनीं व वसाहतींनीं मिळविलेले देश व ब्रिटिश बेटें यांत व्यापार व दळणवळण चालू करून ब्रिटिश साम्राज्याला एकवट करण्याचे कामीं ब्रिटिश व्यापारी लोकांचीहि फार मोठी मदत झाली आहे. हिंदुस्थानचीच गोष्ट घ्या ना. इंग्लंडमध्यें 'ईस्ट इंडिआ कंपनी' नांवाची एक व्यापारी मंडळी स्थापून, तिच्यातर्फे व्यापार करण्याकरितां म्हणूनच प्रथम ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत आले; व पुढें राज्य मिळालें तेंहि बरेच दिवस या मंडळीचे नांवानेंच चाले. या मंडळीलाच हिंदुस्थानचे इतिहासांत कंपनी सरकार असें म्हटलें आहे. ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं अशा प्रकारें ब्रिटिश व्यापार व राज्य पसरविलें, तर सर विल्यम विलबरफोर्स, डॉक्टर लिव्हिंगस्टन, कॅप्टन गॉर्डन वगैरे मिशनरी लोकांनीं आफ्रिका, अमेरिका इत्यादि देशांतील गरीब, अशिक्षित भोळ्याभाबड्या लोकांना निरनिराळ्या उपयांनीं ख्रिस्ती धर्मांत आणून आपलेसे करून घेतले.

अशा रीतीनें ब्रिटिश साम्राज्य हें एका मांणसानें, एके वेळीं, व एकाच तऱ्हेनें निर्माण केलें नसून तें उत्पन्न करण्यांत, वाढविण्यांत व टिकविण्यांत अनेकांनीं, अनेक प्रसंगीं, व अनेक प्रकारांनीं भाग घेतला आहे. आज तीनशें वर्षें हें साम्राज्य सारखें वाढत असल्यामुळें आतां त्याची वाढ खुंटून त्याच्या अस्ताला सुरुवात होणार कीं काय अशी कांहीं लोकांना फार भीति वाटत

आहे; आणि त्याचें प्रत्यंतर म्हणून ते असें सांगतात कीं साम्राज्यांतील बहुतेक देशांचे मनांत 'इंग्लंडलाच येवढें प्राधान्य कां असावें, सर्वांचा दर्जा पूर्णपणें सारखा कां असूं नये' अशा प्रकारचे प्रश्न उत्पन्न होत असून साम्राज्यापासून विभक्त होण्याचे दिशेनें त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. साम्राज्याचे हल्लींचे सर्व घटक स्वतंत्र होण्यानेंच साम्राज्याची खरी व उच्चतर एकी होणार कीं काय, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. परंतु तो प्रश्न पुढचा असल्यामुळें त्याचा विचार आतांच करण्याचें कारण नाहीं.

विचाराकरितां प्रश्न

प्रकरण १ लें

१ आपले देशांत तर सूर्य रोज संध्याकाळीं मावळतो; मग ब्रिटिश साम्राज्यांत सूर्य कधींच कसा मावळत नाहीं ?

२ ब्रिटिश साम्राज्याला मुकुटाची उपमा देतात, ती कां ? साम्राज्य–मुकुटांतील कांहीं महत्त्वाचीं रत्नें सांगा.

३ ब्रिटिश तख्ताला तरवारीपेक्षां तागडीचाच आधार जास्त आहे असें म्हणतात याचा अर्थ काय ? तरवार व तागडी यांशिवाय आणखी कशाकशाची मदत ब्रिटिश साम्राज्याला झाली आहे !

४. ब्रिटिश साम्राज्यांतलि इतर देश कोणकोणत्या बाबतींत परस्परांवर अवलंबून आहेत ?

५ ब्रिटिश बेटांना 'संयुक्त राज्य' असें म्हणतात तें कां ? तें केव्हां व कसें 'संयुक्त' झालें ? 'संयुक्त प्रांत' व 'संयुक्त संस्थानें' अशीं दुसरीं नांवें आपण ऐकतों, तीं कोणाचीं ?

प्रकरण २ रें

विलायतेचा मार्ग व त्यावरील गमती

ब्रिटिश राज्याचें रूपांतर साम्राज्यांत कसें झालें, व तें बनविण्याला कोणीं कोणीं कसा कसा हातभार लावला हें आपण पाहिलें. सर्व

साम्राज्य ब्रिटिश बेटांतूनच उत्क्रांत झालें असल्यामुळें साम्राज्यांतील इतर देशांचा विचार करणेपूर्वीं ब्रिटिश बेटांचा विचार करणें योग्य होईल. करितां आपण आतां तिकडेच वळूं.

इंग्लंड देश व ब्रिटिश बेटें हीं खरोखरच 'सातां समुद्रांपलीकडे' असून मुंबईपासून तीं सुमारें सहा हजार मैलांवर आहेत; तथापि बोटीनें जावयास पुरे पंधरा दिवस देखील लागत नाहींत. आपल्या कोंकणच्या बोटींपेक्षां इंग्लंडकडे जाणाऱ्या बोटी किती तरी मोठ्या, ऐसपैस, जलद जाणाऱ्या व सोयीच्या असतात. त्यांत कोणकोणत्या सोयी असतात हें तुम्ही माझ्या 'आमची दिवाळी' या पुस्तकांत अगोदरच वाचलें असेल. बोटीच्या मालकाला या सर्व सोयी करण्याला बराच खर्च येतो, व म्हणून प्रवाशांना भाडेंहि बरेंच--अदमासें रु. ६००--द्यावें लागतें. ज्याप्रमाणें आगगाड्या G. I. P. R., S. M. R., B. B. C. I. इत्यादि निरनिराळ्या कंपन्यांच्या असतात त्याप्रमाणें या बोटीहि निरनिराळ्या कंपन्यांच्या असतात. पी. अँड ओ. कंपनीच्या बोटा दर शनिवारीं मुंबईहून निघतात. विलायतला निघतांना करावयाची तयारी, बोटीवरील निरनिराळ्या जागा, तेथील खाण्यापिण्याच्या व खेळण्यासवरण्याच्या सोयी बोटीवरील दिनचर्या, मुंबई सोडल्यापासून लंडन येईपर्यंत वाटेंत लागणारीं निरनिराळीं महत्त्वाचीं ठिकाणें व प्रेक्षणीय स्थळें इत्यादिसंबंधींची सर्व माहिती सौ० गंगूबाई पटवर्धन यांनीं ५--६ वर्षांपूर्वीं 'चित्रमय जगत्' या मासिकांत प्रसिद्ध केली होती. सौ० गंगूबाई या स्वतः इंग्लंडला जाऊन आल्या असल्यामुळें त्यांनीं दिलेली माहिती नुसती ऐकून किंवा वाचून दिलेली नसून प्रत्यक्ष पाहून सांगितलेली आहे; आणि म्हणून ती फारच मनोरंजक झाली आहे. पुढें दिलेला मजकूर त्यांतूनच घेतला आहे.

" मुंबईचा किनारा सोडल्यापासून चार दिवस जमीन ती कशी दिसली नाहीं. मार्च ९ च्या ब्रेकफस्ट मेनूच्या (न्याहरीच्या पदार्थांची यादी) मागें 'आज संध्याकाळीं बोट एडन बंदरास पोंचेल' असें लिहिलेलें पाहून मनास फार आनंद झाला. एडन हें फार विलक्षण बंदर आहे. तें ज्या डोंगरावर आहे तो ज्वालामुखीच्या लाव्ह्याचा बनला असून अदमासें दीड हजार फूट तरी उंच असावा. खुद्द गांव बंदरापासून १५–२० मैल लांब असून बंदरावर कचेऱ्यांच्या इमारतींशिवाय इतर घरें नाहींतच म्हटलें तरी चालेल; कारण तेथें उन्हाळा भयंकर असून वर्षाचे काठीं एकादी सर पडली तरी नशीबच समजावयाचें! कधीं कधीं दोन दोन तीन तीन वर्षेंहि पावसावांचून जातात! पिण्याचें पाणीहि समुद्राच्या खाऱ्या पाण्याची वाफ करून करतात. असें असूनहि जहाजांना उभें राहण्याकरितां निवाऱ्याची जागा, कोळसा भरण्याचें ठिकाण, व आरबी समुद्रांतील इंग्रज लोकांचें एक मोठें माऱ्याचें नाकें या दृष्टीनें या बंदराला अतिशय महत्त्व आलें आहे. शिवाय पूर्व आफ्रिकेकडे जाणारा मार्गहि येथूनच फुटत असल्यामुळें या ठिकाणची माणसांची व मालाची चढउतारहि बरीच मोठी आहे. गांवांत पार्शी सोमाली, नीग्रो, ज्यू वगैरे सर्व वर्णांचे व सर्व जातींचे लोक असलेले दिसले.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आम्हांला पेरिम बंदर लागलें या बंदराचें 'Gate of Tears' (अश्रूंचा दरवाजा) हें नांव ऐकून येथून लागणाऱ्या वाईट वाटेची चांगलीच कल्पना आली. तांबडा समुद्र सर्व जगांत अतिशय उष्ण असा त्याचा बभ्रा असल्यामुळें आमची बोट त्यांत शिरतांच भयंकर उकाडा होणार असें वाटलें होतें; पण या वेळीं उकाडा होण्याऐवजीं थंडीच


वाजूं लागली होती ! 'तांबडा समुद्र' हें नांव या समुद्रास कां देण्यांत आलें हें मला पुष्कळ दिवस कोडें पडलें होतें; कदाचित् पाणी तांबूस असेल असा माझा तर्क होता. परंतु तो खोटा ठरला; कारण या समुद्राचें पाणी निळसरच आहे. दूर किनाऱ्यावर तांबड्या दगडाचे व तांबूस रंगाचे डोंगर दिसतात म्हणून तर त्यास 'तांबडा समुद्र' म्हणत नसतील ना ? याचे दोहों बाजूंस वालुकामय प्रदेश असल्यामुळें व त्यावरून येणाऱ्या वाऱ्याबरोबर कढत झळ येत असल्यामुळें या समुद्रांत नेहमीं खरोखरच अतिशय उकाडा होतो. या वेळीं थंडी वाजली हा केवळ अपवाद होय. दुर्बिणींतून पाहात असतांना समुद्राच्या दोन्ही बाजूंना मधून मधून अरबस्तानचा व आफ्रिकेचा किनारा दिसत असे. लांबूनहि तेथील घरांच्या दगडी भिंती व चुन्याचीं धाबीं दिसत होतीं. दगडी भिंती घर आंतून थंड रहावें म्हणून असतात; परंतु धाबीं कां अशी शंका मनांत आली. ....अशा प्रकारें तांबडा समुद्र ओलांडून सुएजला पोंचण्यास आम्हांला चार दिवस लागले.

सुएझचें बंदर मुंबई बंदरापेक्षां बरेंच लहान पण टुमदार आहे. बंदर वर्तुलाकार असून त्याच्या एका बाजूस तांबडे उघडे डोंगर, दुसऱ्या बाजूस तांबड्या रेतीची जमीन, व इतर दोन बाजूंस बंदराच्या इमारती, तेलाच्या वखारी वगैरे दिसतात. खुद्द गांवांत पांच-पन्नास इमारती असतील नसतील. झाडें वगैरे कांहीं दिसलें नाहीं; पण रस्ते रेखीव असून त्यांवरून सायकली मोटारी व घोड्यांच्या गाड्या हिंडत होत्या. किनाऱ्यापासून २५ हातांचे अंतरानें बोट जात होती. सर्व किनाऱ्याभर मधून मधून तरते पूल असून, लोकांना त्यांवरून होड्यां-तून व बोटींतून चढतां उतरतां येतें. सर्व रहदारी कालव्यांवरून बोटींनीं चालते.

कारंटाईन बोर्डाचे लोक गेल्याबरोबर पोस्टाची बोट आली. तींतून परत मुंबईस जावें असें वाटलें ! नंतर अनेक लहान लहान होड्यांतून नाना तऱ्हेच्या मण्यांच्या माळा, गालीचे, कांहीं मुसलमानी पद्धतीची मेवामिठाई, सुएझ शहराच्या प्रमुख इमारतींचे व प्रेक्षणीय स्थळांचे फोटो इ० माल घेऊन कांहीं इजिप्शिअन् व्यापारी बोटीपाशीं आले; व आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजींत इंग्रज गिऱ्हाइकांशीं सवदा करूं लागले. 'लेडी, फोर शिलिंग् वन् टेक, नाईस; मेनी कलर ! यू वॉट् धिस् ? हाऊ मच्, वन् शिलिंग ? नो लेडी टू गिव्ह' अशा प्रकारें जोरांत सवदा चाललेला ऐकून हसूं आलें, व आपलेकडील इंग्रजी पहिले इयत्तेंतील मुलांची आठवण झाली. कांहीं मंडळी सुएझला उतरून कायरोवरून आगगाडीनें पोर्ट सैदला जाणार होती.

पंधरा-वीस मिनिटांत आम्ही सुएझचे कालव्यांत शिरलों. येथें बोट फारच संथ म्हणजे ताशीं सुमारें चार मैल चालत होती. कारण कालव्याच्या दोहों अंगांच्या भिंतींचीं तोंडें लहान लहान दगडांनीं बांधून काढिलीं असलीं तरी बोट फार वेगानें चालल्यास पाण्याच्या जोरानें दोहों बाजूंचे बंधारे फुटण्याची बरीच भीति असते. कालवा सुमारें १०० मैल लांब असून २५०–३०० फूट रुंद आहे. तो खणण्यास १८५९ मध्यें सुरुवात होऊन तो पुरा होण्यास १० वर्षें व १५ कोट रुपये लागले असें म्हणतात. पण त्यामुळें आफ्रिका खंडाचा लांबचा वळसा टळून दीड महिन्याऐवजीं अवघ्या दीड आठवड्यांत इंग्लंडला जातां येतां येऊं लागलें हा केवढा फायदा झाला आहे ! अरबस्तानच्या बाजूला पांढरा वालुकायम ओसाड प्रदेश पसरलेला होता. पण ईजिप्तच्या बाजूला मधून मधून शेतें व हिरवळ भाग नजरेस पडत होते. सबंध कालवाभर ठराविक अंतरावर घरें बांधून त्यांतून

कालव्याच्या रक्षणाची व दुरुस्तीची व्यवस्था केली आहे. आगगाडीला जशीं स्टेशनें तशीं कालव्याला हीं घरें. कालव्यांत लहान लहान बोटी सारख्या फिरत असून कालव्यांत सांचणारी वाळू काढून टाकून पाण्याची उंची कायम ठेवणें हें त्यांचें मुख्य काम असतें. कालवा अरुंद असल्यामुळें ठिकठिकाणीं अधिक रुंदीचा भाग मुद्दाम राखून ठेवण्यांत आला आहे, त्यास 'साइडिंग्'म्हणतात. एकाच वेळीं दोन बोटी या कालव्यांत शिरल्यास एकीस दुसरी जाईपर्यंत या ठिकाणीं थांबविण्यांत येतें. या प्रकारच्या साइडिंगाशिवाय कालवा आणखीहि दोन तीन ठिकाणीं बराच रुंद केलेला दिसला. चौकशी करतांना असें समजलें कीं ज्या दोन तीन सरोवरांच्यामुळें इंजिनेर लेसेप्स् यांस कालव्याची



सुएझचा कालवा

मूळ कल्पना सुचली तीं हीं सरोवरें होत. कालव्यांतून बाहेर पडून

पोर्ट सय्यदला पोंचण्यास सकाळचे सात वाजले. म्हणजे येवढ्याश्या अंतराला तेरा-चवदा तास लागले !

पोर्ट सय्यदला बोट बराच वेळ उभी असल्यामुळें, आम्ही गांवांत जाऊन आलों. बंदरावर ईजिप्तच्या कापसाचे मोठमोठे गठ्ठे इंग्लंडच्या बोटीवर चढविण्यासाठीं तयार ठेवलेले दिसले. कायरोला जसा 'वर्णसंकर' दिसला तसा येथें नसून बहुतेक लोक तुर्की मुसलमानच दिसले. बाजारांत फळफळावळ व मांसमच्छर एकाच दुकानांत ठेवल्यामुळें फळें घेण्याचें मनांत असूनहि इच्छा होईना. गांव बराच मोठा—सुमारें साठ-पासष्ट हजार वस्तीचा—असून कालवा झाल्यापासून तो विशेष भरभराटला आहे. येथें वस्ती तुर्कांची, अंमल इजिप्शिअन् सरकारचा, कारभार इंग्रजांचा, बाजार फ्रेंचांचा, व भाषा कोणाचीच एकाची नाहीं असा विचित्र प्रकार आहे. दीडला बोट सुरू होऊन आम्ही एकदांचे भूमध्य समुद्रांत शिरलों. बोट शिरत असतां, कॅनॉलच्या बांधावरील लेसेप्सूचा पुतळा अगदीं जवळ व स्पष्ट दिसत होता. लेसेप्सूचें दिव्य धाडस पाहून मन भरून आलें, व त्याच्या आणि एकंदर युरोपिअन् लोकांच्या महत्त्वाकांक्षा, उद्योग, उत्साह, धाडस इत्यादि गुणांबद्दल आदर वाटूं लागला. या लेसेप्सूची गोष्ट मुलांना अगदीं सांगण्यासारखी आहे. मूळच्या संयोगिभूमीचा कालवा करून पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यानें ही केवढी मोठी क्रांति करून ठेविली आहे !

भूमध्य समुद्रांत शिरतांच कांहीं कालपर्यंत त्याचा उत्तर व दक्षिण किनारा दिसत असल्यामुळें एकाच वेळीं यूरोप व आफ्रिका खंड पाहण्याचें श्रेय मिळून भूमध्यसमुद्राचें भौगोलिक महत्त्व मनावर प्रथमतःच प्रत्यक्षपणें पटतें. ह्या समुद्राचे सभोंवार खरोखरच जमीन असल्यामुळें त्याचें 'भूमध्यसमुद्र' हें नांव सार्थ झालें आहे. स्पेन, फ्रान्स,

ग्रीस, ईजिप्त, एशियामायनर इत्यादि अत्यंत जुने, अत्यंत वैभवसंपन्न, व इतिहासप्रसिद्ध देश याच्या किनाऱ्या-किनाऱ्यानें वसले असल्यामुळें व त्यांचें सर्व दळणवळण व व्यापार याच समुद्राचे मध्यस्थीनें चालत असल्यामुळें या समुद्राला हजारों वर्षांपूर्वींपासून अतिशय महत्त्व प्राप्त झालें आहे. हिंदुस्थान देश, व केप ऑफ् गुड होपकडून हिंदुस्थानला जाण्याचा मार्ग ह्यांचा शोध लागून सर्व व्यापार तिकडे ओढला गेला, तेव्हां मात्र कांहीं शतकें भूमध्यसमुद्रांतील दळणवळण कमी होऊन त्याचें महत्त्वहि कमी झालें होतें; परंतु १८७० सालीं सुएझचा कालवा तयार झाल्याबरोबर हिंदुस्थान व पूर्वेकडील इतर देश यांच्याशीं चालणारा व्यापार व रहदारी पुनः याच समुद्रांतून व्हावयास लागून त्याचें गेलेलें वैभव त्यास पुनः प्राप्त झालें. कडक उष्णतेमुळें या समुद्राचें जितकें पाणी आटतें तितकें त्यास पुनः नद्यांच्या रूपानें परत मिळत नसल्यामुळें हा समुद्र फार उथळ व खारट असल्याचें सांगतात. तसेंच येथें आपल्या-कडीलप्रमाणें उन्हाळ्याचे शेवटीं शेवटीं पाऊस न पडतां तो भर थंडीच्या दिवसांत पडतो; व त्यामुळें याच्या किनाऱ्यावर दमट हिंवाळा व कोरडा उन्हाळा असा चमत्कारिक प्रकार हवेसंबंधीं दृष्टीस पडतो. ही हवा मोठी जोमदार असून माणसांप्रमाणें वन-स्पतींनाहि ती फार मानवते असें म्हणतात.


सोळा मार्चला इटलीचा दक्षिण किनारा दिसूं लागला. रात्रीची वेळ असल्यामुळें दिव्यांच्या ओळींशिवाय दुसरें कांहीं दिसलें नाहीं. थोड्या वेळानें डाव्या बाजूस सिसिलीकडील दिवे दिसूं लागले. 'भूमध्य समुद्रांतील एडन' म्हणून प्रसिद्ध असलेलें प्रेक्षणीय स्थळ माल्टा हेंहि दिसेल असें वाटलें होतें; परंतु तसें झालें

नाहीं ! तें सुएझ व जिब्राल्टर यांच्या दरम्यानचें महत्त्वाचें लष्करी ठिकाण व व्यापाराची पेठ असल्यामुळें तें हुकलें म्हणून वाईट वाटलें. स्ट्रॉंबोली बेट व त्यावरील ज्वालामुखी रात्रीं साडेआक-राला दिसणार असें कळल्यावरून तोंपर्यंत जागण्याचा बेत करून अंथरुणावर वाचीत पडलें; परंतु डोळे आपोआप मिटले ते सकाळीं सहाला उघडले !

रात्रीं स्ट्रॉंबोली कोणीं पाहिलें का म्हणून सकाळीं विचारलें तों सर्वांनीं हो म्हणून सांगितलें. कॅप्टन्‌नें मुद्दाम बोट जवळून नेली, व रात्र असल्यानें ज्वालामुखींतून बाहेर पडणारा तप्तरस व धूर चांगला पहा-ण्यास मिळाला इत्यादि वर्णन ऐकून फार वाईट वाटलें. ता. १७ला सायं-काळीं ५च्या सुमारास सार्डिनिआ व कॉर्सिका या बेटांचे किनारे दोन्ही बाजूंकडून दिसूं लागले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मार्सेल्स् येणार म्हणून सामानाची सर्व आवराआवर केली, व आमच्याबरोबर मार्सेल्सला न उतरतां जिब्राल्टरमार्गें जाऊन एकदम इंग्लंडला उतरणाऱ्या उतारूंचा निरोप घेतला. आपणहि तिकडून गेलों असतों तर फार दिवस ऐकत असलेला जिब्राल्टरचा किल्ला व स्पेनचा किनारा दिसला असता, व आपल्याला बोटीवरच्या सोबत्यांना इतक्यांतच सोडावें लागलें नसतें असा विचार येऊन वाईट वाटत होतें. परंतु त्यामुळें बराच मोठा वळसा पडून आणखी सहा दिवस बोटींतच काढावे लागतील असाहि दुसरा विचार मनांत येऊन एकंदरींत बरेंच वाटलें.

तारीख आठराला सकाळीं साडेसातचे सुमारास आमची बोट एकदांची मार्से बंदरांत पोंचली; व आमचा तेरा दिवसांचा जल-प्रवास संपला ! जमिनीवर पहिलें पाऊल टाकतांना फारच आनंद झाला. कोलंबसाला अमेरिका खंडाच्या किनाऱ्यावर पाय ठेवतांनाहि इतका झाला नसेल ! 'मार्से' हें एकादें निराळें बंदर नसून ज्याला

आपण तिकडे 'मार्सेल्स' असें म्हणतों तेंच हें बंदर. बरेचसे फ्रेंच उच्चार आपण करतों त्यापेक्षां अगदीं निराळे आहेत. बंदर फारच सुंदर व मोठें दिसलें. तें डोंगराच्या पायथ्याशीं वसलेलें असल्यानें बोटीवरून शहरांतील रस्ते व त्यावरील ट्रॅमगाड्या, आगगाड्या वगैरेसर्व स्पष्ट दिसत होतें. क्यूमध्यें-म्हणजे एका मागें एक उभे राहून पाळीप्रमाणेंच जाण्यास एक तासभर लागला, व पासपोर्ट दाखवून एकदांचे बंदराबाहेर पडलों. गांव डोंगराचे उतारावर असल्यामुळें सर्व उतारभर सुंदर इमारतींच्या रांगा पसरलेल्या दिसतात. वर डोंगराचे शिरोभागीं 'नोत्र डाम'चें देऊळ आहे. सर्व शहराचें रक्षण करणारी देवता त्यांत वास करीत असून तिच्या कृपाछत्राखालीं सर्व व्यवहार सुरळीत चालतात असा येथील रहिवाशांचा पूर्ण विश्वास आहे. मार्सेच्या कोणत्याहि भागांत आपण असलों, तरी हें देऊळ दृष्टीस पडल्याशिवाय राहात नाहीं. रस्त्यावरून



जिब्राल्टरकडून जातांना घालावा लागणारा वळसा

जातांना अवघ्या पांच मिनिटांत कितीतरी निरनिराळ्या देशांचे खलाशी दिसले, व कितीतरी निरनिराळ्या भाषा कानावरून गेल्या. भूमध्यसमुद्रासारखा अत्यंत रहदारीचा समुद्र, व मार्सेसारखें अत्यंत महत्त्वाचें व गजबजलेलें बंदर; मग लोकांना व भाषांना काय कमी ! हें बंदर अगदींच ऱ्होनच्या मुखाशीं नसलें तरी तें ऱ्होन-खोऱ्याच्या तोंडाशींच असल्यामुळें त्या सुपीक खोऱ्यांत पिकणाऱ्या सर्व पिकांची निर्यात याच बंदरांतून होते. तसेंच पर-देशांतून येणारा सर्व माल येथेंच उतरून नंतर तो फ्रान्स, इटली इत्यादि देशांत जातो. शहरांतून हिंडतांना ऑलिव्हचें तेल गाळ-ण्याचे व साबण करण्याचे पुष्कळच कारखाने लागले. हवेंत जिकडे तिकडे तेलकट भपकारा मारीत होता. मुख्य मुख्य बागा, रस्ते, व इमारती पाहून संध्याकाळच्या साडेसातच्या गाडीनें 'पॅरि' (पॅरिस) गांठण्याचा आम्ही बेत केला. गाडींत बसल्यावर रात्रीं अंधेरामुळें बाहेरचें फारसें कांहीं दिसलें नाहीं. तथापि बराचसा भाग डोंगराळ असावा असें वाटलें. उजेड-ल्यावर पाहिलेला प्रदेश मात्र बराचसा सपाट व सुपीक दिसला. मार्गावर जागोजाग गहूं, मका वगैरेंचीं शेतें, व ऑलिव्ह, द्राक्षें, तुती आणि इतर फळें यांचे मळे बरेचसे दिसले. शेतें सलग असून त्यांत कुंपणें बांध वगैरे कांहीं दिसलें नाहीं. शेतांवरील शेतकऱ्यांचीं घरें आधुनिक पद्धतीचीं बांधलेलीं असून लहान पण टुमदार दिसलीं. प्रत्येक घरापुढें लहानशीच पण एक बाग असून तिच्यांत नाना रंगांचीं सुंदर फुलें डुलत होतीं. एकंदरींत फ्रेंच शेतकरीसुद्धां बरेच रंगेल, शौकी, व सौंदर्याची आवड असलेले असे दिसले. प्रत्येक स्टेशनवर कॉफीगृहें असून त्यांना गिऱ्हाइकहि फार मोठें दिसलें. सकाळची वेळ असूनहि हवा फारशी थंड नव्हती. आपले-

कडीलप्रमाणेंच, परंतु जास्त उत्साहवर्धक व तजेलदार होती. दहाचे सुमारास पॅरी शहरांतील घरें वगैरे दिसूं लागून साडेदहाचे सुमारास आमची गाडी पॅरीचे स्टेशनांत शिरली.

पॅरी हें शहर फारच सुंदर असून येथें लूव्हरचा चित्रसंग्रह, नेपोलिऑंचे कबरस्थान, आर्च ऑफ् ट्राएंफू, एफेल् टॉवर, राजवाडा ऑपेरा हाउस, वगैरे कितीतरी ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. परंतु तीं सर्व पाहावयाचीं म्हणजे निदान पंधरा-वीस दिवस तरी हवेत. शहरांतून हिंडतांना एकदोन गोष्टी मात्र विशेष लक्षांत आल्या. रस्त्यावरून जाणारी-येणारी प्रत्येक व्यक्ति व वाहन आपले-कडीलप्रमाणें डावे बाजूनें न जातां आपल्या उजव्या बाजूनें जात-येत होती. इंग्लंड सोडून सर्व यूरोपभर हीच पद्धति आहे असें म्हणतात. दुसरें असें कीं, फ्रेंच लोक खाण्यापिण्याचे अतिशय भोक्ते असून रस्तोरस्तीं चहूंकडे मोठमोठीं सुंदर रेस्टॉरंट्स (उपाहार-गृहें) दिसतात. उपाहारगृहांचे बाहेरचे बाजूंस रस्त्यांवर झाडांचे थंडगार सावलींत खुर्च्या-टेबलें मांडून त्यांवर कॉफी, दारू, वगैरे पेयें घेण्याचा प्रघात फार दिसला. एकंदरींत ते लोक स्वभावानें फार आनंदी व रंगेल दिसले. सबंध राष्ट्र संपन्न व हवापाणीहि उत्तम याचा हा स्वाभाविक परिणाम असावा. तसेंच ते तऱ्हेतऱ्हेच्या पोषाखांचेहि मोठे शौकी दिसले; तरी त्यांचे वागण्यांत छचोरपणा किंवा स्वभावांत तुसडेपणा दिसत नसून त्यांची बोलण्याचालण्याची पद्धति मोठी खानदानीची, सभ्य, व दिलदार अशी दिसली. पॅरी-पासून केलेला पोंचेतों अवघ्या तीनचार तासांतल्या प्रवासांत किती-तरी फ्रेंच स्त्रियांची व माझी ओळख झाली. प्रथम प्रथम मी परकी, त्या बड्या असें वाटून मीच डब्याच्या एका कोपऱ्यांत मुकाट्यानें बसलें होतें. परंतु त्यांनाच तें कसेंसें वाटून त्याच माझ्याशीं

बोला-चालायाला येत. इंग्रज स्त्रियांनीं असें कधींहि केलें नसतें. इंग्लंडमध्यें दोन अनोळखी माणसांची ओळख करून देण्यास दोघांच्याहि ओळखीचा तिसरा मनुष्य लागतोच लागतो. तसें येथें दिसलें नाहीं.

पॅरी ते कॅलेपर्यंतचा प्रदेश मार्से ते पॅरीचे मानानें बराचसा सपाट दिसला. कॅलेला उतरून तासा-दीडतासांत आम्ही इंग्लिश खाडी ओलांडली, आणि डोव्हरला येऊन पोंचलों. इंग्लिश खाडी अवघी एकवीस मैलच आहे; परंतु दर्या खवळलेला असल्यामुळें तेवढ्यांतले तेवढ्यांतसुद्धां बोटीचा प्रवास फार दगदगीचा होतो; आणि म्हणून पाण्याखालून एक बोगदा काढून तेथून आगगाडी नेण्याचें बरेच दिवस घाटत आहे. डोव्हरला उतरल्यावर पासपोर्ट व बरोबरचें सामान अगदीं कसोशीनें तपासण्यांत आलें; न जाणों कांहीं परदेशी माल कर चुकवून मी तेथें घेऊन जाईन ! डोव्हरपासून पुनः आगगाडीचा प्रवास सुरू होऊन दीड-दोन तासांत लंडनचें व्हिक्टोरिआ स्टेशन आलें; व अशा प्रकारें मुंबई सोडल्यापासून बरोबर सोळावे दिवशीं मी माझ्या उद्दिष्ट स्थळीं येऊन पोंचलें."

पत्रांतील हा उतारा बराच लांब झाला आहे, नाहीं? पण त्यामुळें हिंदुस्थान ते इंग्लंडपर्यंतच्या एकंदर प्रवासाची कल्पना जितक्या यथार्थपणें येऊं शकली, तितकी सर्व प्रवासाचें वर्णन मींच थोडक्यांत केलें असतें तर आली नसती. हिंदुस्थानपासून खुष्कीनें व विमानांनीं इंग्लंडपर्यंत करावयाच्या प्रवासाची हकीगतहि तितकीच मनोरंजक आहे. परंतु ती मीच सांगत बसत नाहीं. तुम्ही आपल्या शिक्षकांना अवश्य विचारा.

इतका वेळ आपण फक्त मार्गांतीलच गमती पाहिल्या. अजून खुद्द लंडन व ब्रिटिश बेटें हीं तर पाहावयाचीं आहेतच.

विचाराकरितां प्रश्न

प्रकरण २ रें

१ ब्रिटिश बेटें सातां समुद्रांपलीकडे आहेत असें म्हटलें आहे; हे सात समुद्र कोणते ? ते खरोखर सात आहेत काय ? ते सर्व समुद्र तरी आहेत काय ?

२ हिंदुस्थानांतून इंग्लंडला जावयाचें आहे; कोणकोणत्या मार्गांनीं जातां येईल ? हल्लींचा विशेष रूढ असलेला मार्ग कोणता ?

३ एक प्रवासी खुष्कीचे मार्गानें जातो; दुसरा जलमार्गानें जातो; तिसरा आकाश-मार्गानें जातो. कोणास कमी वेळ लागेल ? कोणास कमी खर्च लागेल ? कोणाला जास्त प्रदेश पाहावयास सांपडेल ?

४ हिंदुस्थानांतून इंग्लंडला चालू मार्गानें जातांना कोणतीं बंदरें लागतील ? त्या त्या बंदरांतून विशेषतः कोणते लोक व कोणता माल तुमच्या बोटीवर चढेल ?

५ 'अश्रूंचा दरवाजा' 'भूमध्य समुद्रांतिल एडन्' हीं टोपण नांवें कोणाचीं ? त्यांना तीं नांवें कितपत लागू पडतात ? 'तांबडा समुद्र' व 'भूमध्य समुद्र' हीं नांवें कितपत सार्थ आहेत ?

६ सुएझच्या कालव्याच्या रचनेची समजूत पडेल असा एक नकाशा काढा. तो कालवा कोणीं, केव्हां, व कशाकरितां बांधला ? अशाच प्रकारचा दुसरा एकादा प्रसिद्ध कालवा तुम्हांस माहीत असल्यास त्याची माहिती सांगा.

७ गंगूबाई पटवर्धन यांच्या पत्राचा जो उतारा वर दिला आहे त्यावरून फ्रान्स देशासंबंधीं काय काय माहिती तुम्हांला झाली ?

८ भूमध्य समुद्रासंबंधीं कांहीं विशेष गोष्टी सांगा. 'मध्यंतरीं त्यांचें महत्त्व बरेंचसें कमी झालें होतें; परंतु पुन्हा तें त्यास प्राप्त झालें' असें म्हणतात. कोणत्या गोष्टींनीं महत्त्व कमी झालें, व पुनः प्राप्त झालें !

९ विलायतेला जाणारे कांहीं प्रवासी मार्सेला उतरतात. कांहीं थेटपर्यंत बोटींतूनच जातात, असें कां ?

१० मुंबई ते डोव्हरपर्यंतच्या प्रवासांत तुम्हांला विशेष मजेदार वाटलेल्या तीनचार गोष्टी सांगा.

प्रकरण ३ रें

लंडन

लंडनसारखें आश्चर्यकारक ठिकाण जगांत दुसरें कोणतेंहि नसेल. आपली मुंबई, किंवा फ्रान्सचें पॅरिस, अगर अमेरिकेंतील न्यूयॉर्क वगैरे शहरें आपापल्या परीनें महत्त्वाचीं व प्रसिद्ध आहेतच. परंतु लंडनची गोष्ट कांहीं औरच आहे. एकतर तें जगांतील सर्वांत मोठ्या साम्राज्याची खुद्द राजधानी. दुसरें असें कीं, जगांतील सर्व शहरांत तें मोठें आहे. त्याचा विस्तार इतका मोठा आहे कीं, त्याच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत आगगाडीनें जातांना सुमारें १०० स्टेशनें लागून जायला किती तरी तास लागतात! त्यांतील नुसते रस्तेच तीस हजारांवर भरतील असें सांगतात. या एकट्या शहरांत जितके लोक राहतात तितके एकाद्या सबंध जिल्ह्यांतहि राहात नाहींत. ऐंशी लक्ष–म्हणजे मुंबईच्या सुमारें सातपट–लोक येथें राहतात! इतके लोक येथें राहतात तरी कोणकोणते? कांहीं व्यापारी, तर कांहीं कारखानदार; कांहीं शेतकरी तर कांहीं गिरण्यांतील मजूर; कांहीं सैन्यांतील शिपाई तर कांहीं सरकारी इतर नोकरचाकर; कांहीं जहाजांवरचे खलाशी तर कांहीं आगगाड्यांवरील कामकरी; यांशिवाय जगांतील इतर देशांतून शिकण्याकरितां, प्रवासाकरितां, मजा मारणेकरितां, व्यापाराकरितां वगैरे कितीतरी लोक येथें येऊन राहिलेले असतात. तसेंच साम्राज्यांतील प्रत्येक देशाच्या वकिलाची वकिलात व त्याच्या कचेरींतील नोकरचाकर यांचीहि भर यांत पडते. एक वर्षभर जरी लंडनमध्यें राहिलें तरीसुद्धां तेथल्या सर्व महत्त्वाच्या इमारती, राजवाडे, बाजार, बागबगीचे, गोद्या, पूल, खेळण्याच्या जागा,

कारखाने, शाळा, कॉलेजें, वाचनालयें, इस्पितळें, आगगाड्यांचीं स्टेशनें, नाटकगृहें, पदार्थसंग्रहालयें, चित्रसंग्रहालयें, छापखाने वगैरे गोष्टी पाहून होणार नाहींत !

लंडनची मोठी लोकसंख्या, त्याचा अवाढव्य विस्तार, व दांडगा व्यापार हीं लक्षांत घेतां तेथें वाहतुकीचीं साधनें खूपच असलीं पाहिजेत हें उघड आहे. ह्यांपैकीं मुख्य साधन आगगाड्या—रस्त्यां-वरून जाणाऱ्या व रस्त्याखालून जाणाऱ्या—हें असून अशा शेंकडों गाड्या लंडनला रात्रंदिवस ये-जा करीत आहेत. लंडनला निर-निराळ्या बाजूंनीं आगगाड्यांचे १०-१२ रस्ते तरी येऊन मिळाले आहेत. त्यांपैकीं ग्रेट वेस्टर्न रेल्वे (पश्चिम रस्ता), लंडन-मिड्लंड स्कॉटिश् रेल्वे (मध्य इंग्लंडमधून स्कॉटलंडकडे जाणारा रस्ता), लंडन-नॉर्थ-ईस्टर्न रेल्वे (ईशान्य रस्ता), सदर्न रेल्वे (दक्षिण रस्ता) हे विशेष मुख्य आहेत. ते लंडनपासून निघून ग्रेट ब्रिटन-च्या चारी कोंपऱ्यांपर्यंत जाऊन पोंचले आहेत.


लंडन जसें अतिशय मोठें शहर व आगगाड्यांचें केंद्र आहे तसेंच तें अतिशय मोठें बंदरहि आहे. टेम्सच्या मुखापासून थेट खुद्द लंडन शहरापर्यंत पांचपंचवीस मैल हें बंदर पसरलेलें असून तेथें मोठमोठीं जहाजें नांगरून पडलेलीं असतात. दर्यापासून शहराचे किनाऱ्याकिनाऱ्यानें एक फेरफटका मारला तर कितीतरी ठळक ठळक गोष्टी नजरेस पडतात. या पहा, कितीतरी मोठमोठ्या तेलाच्या टांक्या येथें आहेत. गिरण्या, कारखाने, आगगाड्या, मोटारी वगैरेंना लागणारें रॉकेल, पेट्रोल, स्पिरिट वगैरेंचा सांठा एकट्या लंडन-पुरताच करायाचा म्हटला तरी, तो केवढा करावयास पाहिजे ! आणि हे सर्व पदार्थ ज्वालाग्राही म्हणजे लवकर पेट घेणारे असल्यामुळें, त्यांचा सांठा गांवांत करणें शक्यच नाहीं. नाहींतर तीनशें वर्षां-

पूर्वी जशी सबंध लंडनची राखरांगोळी झाली तशी दरसाल व्हावयाची! या पहा चुनखडीच्या खाणी, व त्यांच्याच शेजारीं काढलेल्या सीमेंटच्या फॅक्टऱ्या. या खाणींतली चुनखडी व टेम्स नदीमधील सालोसाल उपसून काढावा लागणारा गाळ हीं दोन्ही भाजूनच सीमेंट तयार करतात. हे पहा स्वीडन-नॉर्वेहून आलेल्या लांकडाच्या लगद्याचे गठ्ठे; याला पल्प म्हणतात. या लगद्याचा कागद तयार करण्याच्या गिरण्या लंडनमध्यें बऱ्याच असून या कागदांवरच हजारों वर्तमानपत्रांच्या लक्षावधि प्रती सकाळ-संध्याकाळ निघत असतात. लंडनमधला मनुष्य एरवीं कितीहि गरीब असो, त्याला सकाळच्या न्याहरीबरोबर वर्तमानपत्र हें लागतेंच लागतें. हे पाहा इकडे तोफा-बंदुकांचे कारखाने. सर्व ब्रिटिश सैन्याला लागणाऱ्या तोफा-बंदुका येथेंच तयार होतात. ही पहा ग्रीनिचची वेधशाळा. सर्व जगांतील घड्याळें येथूनच लावलीं जातात. तसेंच, ग्रीनिच वरील रेखांशच मूळ रेखांश किंवा शून्य रेखांश मानून जगावरील पूर्वपश्चिम अंतरें मोजण्यांत येतात. येथील दुर्बीण व घड्याळ फारच अजस्र आहेत असें म्हणतात. घड्याळांत सेकंदाचेहि लहान लहान भाग व ऋतु वगैरे इतर गोष्टीहि दाखविल्या आहेत. ही वेधशाळा गांवाबाहेर कां बांधली असावी याचें कारण तुम्ही ओळखिलें असेलच. अंतरिक्षाचें निरीक्षण निर्वेध रीतीनें करतां यावें म्हणून वेधशाळेभोंवतालचा बराचसा टापू मोकळा असावा लागतो. शिवाय शहरांतील रहदारीनें जमीन हदरून त्याचा परिणाम एकंदर हवा व वेधशाळेंतील नाजूक यंत्रें यांवरहि झाल्याशिवाय राहात नसेल. या पहा गोद्या. यांत जगाच्या निरनिराळ्या भागांतून येणाऱ्या मोठमोठ्या बोटी नांगरून पडलेल्या असून त्यांतून माल भरण्या-उतरण्याचें काम सारखें चालू असतें. त्यांपैकीं कांहीं बोटी कॅनडा,

ऑस्ट्रेलिया वगैरे पश्चिमेकडील देशांतून गहूं घेऊन आल्या असतील, तर कांहीं चीन, हिंदुस्थान वगैरे पूर्वेकडील देशांतून चहा घेऊन आल्या असतील. कांहींतून जवळच्या डेन्मार्कचें लोणी, फुलें, फळें, भाजी-पाला, अंडीं, मांस वगैरे आलें असेल, तर कांहींतून न्यूझीलंड, दक्षिण अमेरिका, दक्षिण आफ्रिका वगैरे दूरच्या देशांतून गाईबैलांचें मांस आलें असेल. कांहींनीं कॅनडा, स्वीडन्-नॉर्वे, फिन्लंड, रशिया वगैरे देशांतून इंग्लंडच्या जहाजांना व घरांना लागणारें लांकूड आणलें असेल, तर कांहींनीं आसपासच्या भागांतून इंग्लंडमधलाच कोळसा आणला असेल. पाहिलेंत, एका लंडनच्या गरजा भागविण्याकरितां कितीतरी देशांतून कितीतरी प्रकारचा माल येऊन येथें बंदरांत पडला आहे! लंडनला लागणारा माल परदेशांतून आणणारीं जहाजें जशीं या गोद्यांत दृष्टीस पडतात, तशींच लंडनमध्यें तयार होणारा माल परदेशीं नेणारीं जहाजेंहि येथें दृष्टीस पडतील. हें पहा कांहींत कापड भरलें आहे, तर कांहींत कोळसा सांठविला आहे. कांहींत लोखंड व लोखंडी यंत्रें आहेत,तर कांहींत चिनीमातीचीं भांडीं भरलीं आहेत. एवंच काय कीं या जहाजांतून सर्व प्रकारचा माल नेण्याआणण्याचा धूमधडका सारखा चालू आहे.

लंडन नुसतें बंदरच असून तेथें मालाची नुसती ने-आणच होते असें नाहीं; तर तेथें कितीतरी प्रकारचा माल तयार होतो. लांकडी, लोखंडी, कांतडी कागदी व कापडी सामानाचे कितीतरी लहान-सान कारखाने येथें आहेत. तसेंच तें जगांतील एक फार मोठी व्यापाराची पेठ असून, सर्व जगांतील मोठमोठे व्यापारी सौदे तेथें चालतात. लंडनचा 'सिटी' म्हणून जो एक भाग आहे तेथें ऑफिसें व बँकांशिवाय दुसरें कांहींच नसून सौदे करणें व झालेल्या सौद्यांचे पैसे वटविणें हीं कामें अहोरात्र चालू असतात. सबंध

जगाच्या व्यापाराचें तें केंद्र असून ब्रिटिश साम्राज्यांतील देशांचेच गुमास्ते व पेढ्या तेथें आहेत असें नसून अमेरिका, जपान, जर्मनी, फ्रान्स वगैरे स्वतंत्र देशांतील गुमास्ते व त्यांच्या पेढ्याहि तेथें आहेत. 'बँक ऑफ इंग्लंड' म्हणून जी एक बँक आहे तेथें तर रोज क्रोडोगणिक रुपयांची उलाढाल होत असून तिच्या शाखा जगांतील सर्व शहरांतून पसरलेल्या आहेत! खालील चित्र या बँकेचेंच आहे.



बँक ऑफ् इंग्लंड

लंडन हें अशा प्रकारें सर्व दृष्टींनींच अतिशय मोठें शहर असल्यामुळें आपणांला तें सगळें पाहतां येणें शक्य नाहीं; आणि म्हणून आपण त्या नादाला लागूं नये हेंच बरें. लंडनची वस्ती टेम्स नदीच्या दोन्ही कांठांनीं पसरलेली असून एका भागांतून दुसऱ्या भागांत जाणेकरितां नदीवर पंधरा-वीस प्रचंड पूल बांधले आहेत. या पुलांखालून कितीतरी माणसें लहान लहान, हलक्या

व रंगीबेरंगी होड्यांतून हवा खाण्याकरितां नदींतून खालीं-वर जात-येत असतात. अशाच एका होडींतून आपणहि कांहीं वेळ जरा फेरफटका मारूं; व भोंवतालीं काय काय मजा दिसते ती पाहूं.


हा पहिला पूल लागला. याला 'टॉवर ब्रिज्' म्हणतात. या ठिकाणीं लंडनचा पूर्वीचा तुरुंग आहे. पुलावरून पहा ट्रॅम्स्, बसेस्, टॅक्सी, मोटारी वगैरे गाड्यांची केवढी रहदारी लागली आहे. येवढी गर्दी असली तरी गोंधळ मुळी तरी आहे का ? पोलीसच्या हाताबरहुकूम सर्वजण आपापल्या मार्गानें निमूटपणें जाताहेत. पोलीसाच्या हाताचा दरारा नसता, तर एका क्षणांतच किती खून झाले असते देवाला माहीत ! पोलीसचा हात आडवा पडल्याबरोबर मोठा लॉर्ड असो नाहींतर आणखी कोणी बडा अधिकारी असो त्याची गाडी थांबलीच पाहिजे. तसेंच सर्वांनीं आपापल्या डाव्या बाजूनें गेलेंच पाहिजे. नाहीं म्हणावयास महात्मा गांधींच्या गाडीला मात्र वाटेल त्या बाजूनें जाण्याचा विशेष अधिकार देण्यांत आला होता.

पण हें काय ? ही घंटा झाल्याबरोबर सबंध पूल दुभंगून नदी मोकळी कशी झाली ? बरोबर आहे. खालून जाणाऱ्या या मोठ्या जहाजाला वाट करून देण्याकरितां अशी व्यवस्था केली आहे. केवढें हें यंत्राचें सामर्थ्य ! एका क्षणांत येवढ्या अजस्र पुलाचे दोन भाग होऊन जहाज गेल्याबरोबर ते पुनः जरासंधाच्या शरीराप्रमाणें एके ठिकाणीं जुडले गेले !

ही पाहा आतां आपली होडी दुसऱ्या एका पुलाखालीं आली. या पुलाला 'लंडनब्रिज्' म्हणतात. दोन हजार वर्षांपूर्वीची टेम्स नदी उतरून जाण्याची पहिली जागा हीच असून लंडन शहर वसण्याला येथूनच सुरुवात झाली असें म्हणतात. पाहिलेंत लंडन शहर किती जुनें आहे? त्याच्या इतकीं जुनीं गांवें युरोपमध्यें फार

क्वचितच सांपडतात. इंग्रजांना आपल्या जुन्या लंडनचा अभिमान कां बरें वाटूं नये? उताराचें एक ठिकाण म्हणून जाणारा-येणारांचे तळ पडण्यास सुरुवात झाली. तळासाठीं दुकानें आलीं. दुकांनाची पेठ झाली. पेठेचें भोंवतालच्या प्रांतांतील मुख्य गांव बनलें. उद्योगधंदे वाढून दुसरीं नवीं गांवें निर्माण झालीं तरी जुन्या गांवाचाच अभिमान वाटून त्याचीच भरभराट होऊं लागली. आशिया, यूरोप या जुन्या खंडांचे मानानें पाहतां, इंग्लंड व लंडन प्रथम प्रथम अगदींच एका बाजूला पडत; परंतु १४९७ मध्यें कोलंबसानें इंग्लंडच्या दुसऱ्या बाजूला असलेलें अमेरिका खंड शोधून काढल्याबरोबर लंडन एकदम नव्याजुन्या जगाचे मध्यभागीं आपोआप आलें! अशा क्रमानें लंडनची भरभराट होऊन त्याला आजचें वैभवाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. प्रत्येक मोठें शहर अशाच कांहीं कारणांकारणांनीं वाढलेलें असतें.

पण आतां प्रत्येक लहानसान पुलाशीं न थांबतां, आपण जरा जोरानें पुढें झटकूं या. हा पहा एक बडा पूल आला. याला 'वेस्टमिनिस्टर ब्रिज्' म्हणतात. होडींतून उतरून जरा वरच्या बाजूला चला. ही जवळची भव्य इमारत व तिच्यावरील उंच उंच मनोरे पहा. ज्या मनोऱ्यावर निशाण फडकतें आहे, त्याच्याखालील एका भव्य दिवाणखान्यांत बसून ब्रिटिश बेटांतील निवडक व मुख्य मुख्य लोक राज्यासंबंधींचे कायदेकानू करतात. पार्लमेंट म्हणून म्हणतात तें हेंच. येथें फक्त ब्रिटिश बेटांपुरतेच कायदे होतात असें नसून सबंध साम्राज्याच्या राजकारणाचा विचार येथें चालतो. म्हणूनच हिंदुस्थानला द्यावयाच्या नवीन हक्कांचा विचारहि येथेंच गोलमेज परिषद भरवून चालू होता. केवढें हें महत्त्वाचें ठिकाण! रस्त्याच्या पलीकडे तें पाहा आणखी एक महत्त्वाचें ठिकाण. पण रस्ता ओलांडून न जातां



टेम्स नदीवरील पार्लमेंटची भव्य इमारत.

(कळसावरील ब्रिटिश राष्ट्राचें निशाण –'युनिअन जॅक '– पहा.)

आपण या रस्त्याखालच्या वाटेनें जाऊं. नाहींतर मधेंच कोठें तरी चेंगरूं ! एक प्रवासी म्हणतो नेपल्स् पाहावें व मग मरावें. परंतु पुष्कळांना लंडन पाहतां पाहतांच मरण येतें ! आपलीहि स्थिति तशीच व्हावयाची ! अशा प्रकारच्या रस्त्याखालूनच्या वाटा लंडन-मध्यें बऱ्याच ठिकाणीं आहेत. आगगाड्यांकरितांहि अशा प्रकारचे जमिनीखालून मार्ग काढले असून त्या मार्गांनीं जाणाऱ्या आगगा-ड्यांना ट्यूब किंवा अंडर ग्राउंड म्हणतात, हें तुम्हांला माहीत असेलच.

केवढी ही भव्य इमारत !हिला वेस्टमिनिस्टर ॲबे म्हणतात. हें एक फार मोठें व अतिशय जुनें असें देऊळ आहे. त्याला देऊळ म्हटलें खरें, पण त्यांत तुम्हांला कोणत्याहि देवाची किंवा देवीची मूर्ति सांपडणार नाहीं. कारण आपण हिंदुलोक मूर्तींची जशी पूजा करतों तशी क्रिस्ती लोक करीत नाहींत. ते फक्त परमेश्वराची प्रार्थनाच करतात. आणि म्हणून त्यांच्या देवळांना प्रार्थनामंदिरें म्हणणेंच योग्य होईल. धर्माची दीक्षा देणें, विवाहसंस्कार उरकणें, राज्याभिषेक करणें, मेलेल्यांचा अंत्यविधि करणें वगैरे धार्मिक कृत्यें असल्या प्रार्थना-मंदिरांतूनच होतात. याहि ठिकाणीं इतर गोष्टी होत असतीलच; परंतु येथील विशेष गोष्ट म्हटली म्हणजे ही कीं, आजपर्यंत इंग्लंडच्या गादीवर बसलेल्या सर्व राजांचे राज्याभिषेक येथेंच झाले असून येथेंच कितीतरी प्रसिद्ध व्यक्तींचीं थडगीं आहेत. प्रत्येक थडग्यावर त्या त्या व्यक्तीचा पुतळा उभा केला असून त्यावर तिचें थोडक्यांत चरित्र दिलें आहे. पिट्, फॉक्स्, ग्लॅडस्टन्, बोनरलॉ, नेल्सन्, न्यूटन्, डार्विन्, केल्विन्, मिल्टन्, शेक्स्पिअर, वर्डस्वर्थ, टेनिसन्, लिव्हिंग्स्टन्, लॉरेन्स् नाइटिंगेल, डिकन्स्, थॅकरे, रस्किन्, मेकॉले, ऐर्व्हिंग् वगैरे सर्व थोर थोर व्यक्तींचे पुतळे

इंग्लंडच्या उज्ज्वल इतिहासाची साक्ष देण्याकरितांच जणूं येथें उभे आहेत ! हें पाहून ब्रिटिश लोकांना किती अभिमान व धन्यता वाटत असेल ! कोणी हुशार मुत्सद्दी तर कोणी शूर योद्धे ! कोणी शास्त्रज्ञ तर कोणी संशोधक ! कोणी कवि तर काणी कांदबरीकार ! कोणी लेखक तर कोणी इतिहासकार ! कोणी नाटककार तर कोणी नट ! कोणी धर्मप्रचारक तर कोणी धर्मात्मे ! तसेंच सर्व राजांचें व या सर्व विभूतींचें एकदम स्मरण होऊन सबंध इतिहासच्या इतिहास त्यांच्या डोळ्यांपुढें उभा राहात असेल! आपलेकडेहि असें एकादें स्फूर्तिदायक ठिकाण असतें तर काय बहार झाली असती ! आपल्याला इतिहास नाहीं असें नाहीं. आपलेकडेहि शिवाजी, अकबर, रणजित वगैरे सारखे राजे होऊन गेले आहेत, तर तुकाराम, रामदास, नानक, चैतन्य, कबीर, विवेकानंद वगैरेसारखे साधुसंत व धर्मप्रवर्तक होऊन गेले आहेत. रानडे, दादाभाई नौरोजी, गोखले, टिळक, लजपतराय, नेहरू, दास वगैरेसारखे राजकारणी पुरुष होऊन गेले; तर आगरकर, राममोहनराय, श्रद्धानंद वगैरेसारखे समाजसुधारक होऊन गेले. हरि नारायण, बंकिमचंद्र, त्रिपाठी वगैरेसारखे कादंबरीकार होऊन गेले, तर चिपळूणकर, परांजपे वगैरे सारखे लेखक होऊन गेले. ज्ञानेश्वर, वामन, मोरोपंत, केशवसुत, गडकरी, कांत, तोरो दत्त वगैरेसारखे कवि व कवयित्री होऊन गेल्या, तर राजवाडे, खरे वगैरेसारखे इतिहाससंशोधक होऊन गेले. रहिमत खां, अल्लादिया, वखले वगैरेसारखे गायक होऊन गेले, तर राजा रविवर्म्यासारखे चित्रकार होऊन गेले. सारांश काय, कीं आपलेकडेहि थोर विभूतींची वाण नाहीं. परंतु वेस्टमिनिस्टर ॲबेसारखें एकादें ठिकाण नसल्यामुळें या सर्व विभूतींची आठवण ताजी राहात नाहीं येवढेंच.

हा पहा समोरच केवढा भव्य व सुंदर रस्ता आहे तो. या रस्त्यानें गेल्यावर जो एक मोठा चौक लागतो त्याला ट्रफाल्गर स्क्वेअर असें म्हणतात. शें-सवाशें वर्षांपूर्वी फ्रान्स देशांत निपोलिअँ म्हणून जो एक शूर, पराक्रमी, व महत्त्वाकांक्षी राजा होऊन गेला त्यानें इंग्लंडवर स्वारी केली असतां, नेल्सन् नांवाच्या इंग्रज सेनापतीनें त्याचा ट्रफाल्गर येथें पराभव केला. अर्थात् आपल्या लाडक्या नेल्सन्बद्दल इंग्रज लोकांना भारी प्रेम व आदर वाटत असून एका शें-दीडशें फूट उंचीच्या दगडी स्तंभावर त्याचा एक मोठा पुतळा या चौकांत उभा केला आहे. चला, आपण आतां एक बस् करून हाईड पार्क म्हणून एक मोठें उद्यान आहे तिकडे जाऊं. लंडन्मध्यें असलीं उद्यानें बरींच असून एक दोन उद्यानांत मुंबईतील राणीच्या बागेंतल्याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचे पशुपक्षी व इतर चमत्कारिक पदार्थहि पाहणेकरितां ठेविले आहेत. वाटेवरील बकिंग्हॅम राजवाडा पाहण्यास मिळाला असता तर काय बहार झाली असती! येवढ्या मोठ्या राजाचा राजवाडा तो ! त्यांत सौंदर्याला व ऐश्वर्याला काय कमी? पण तो आपल्यासारख्यांस कसा दिसणार? आणि खरें पाहिलें तर आपलेंहि तो पाहिल्यावांचून थोडेंच अडतें आहे ! द्राक्षें आंबट म्हणून द्या नाद सोडून झालें ! राजेसाहेबांचा हा एकच राजवाडा नसून त्यांचे आणखीहि पांच-सहा राजवाडे आहेत असें म्हणतात.

हं, हें पहा हाईड पार्क आलें. अबब ! केवढें मोठें थोरलें हें मैदान! येथें कितीतरी माणसें संध्याकाळीं हवा खाणेकरितां व खेळण्याकरितां आलीं आहेत ! लंडन्मधलें हवा खाण्याचें हें एकच ठिकाण नसून अशा मोकळ्या जागा ठिकठिकाणीं राखून ठेविल्या आहेत. लंडन हें इतकें गजबजलेलें शहर आहे कीं, तेथील लोकांना

अशा मोकळ्या जागीं जाऊन कांहीं वेळ तरी बसतां आलें नसतें तर शहरांतील कोंदट व धुरकट हवेमुळें त्यांची प्रकृति निरोगी राहिली नसती. अशा जागा जागजागीं आहेत म्हणून तर लंडन्च्या लोकांना मोकळी शुद्ध हवा मिळूं शकते. अशा जागा म्हणजे लंडनचीं जणूं कांहीं फुफ्फुसेंच होत! गवत पहा कसें मऊ, बारीक व सपाट आहे. येथें फारशीं झाडें किंवा फुलें नसलीं तरी फुलांपेक्षांहि सुंदर अशीं कितीतरी मुलें भोंवतालीं खेळताहेत! तीं पहा कशीं गुटगुटीत, चपळ व खेळकर दिसताहेत. त्यांचे ते गाजरांसारखे लाल गोरे चेहरे, निळसर डोळे, व पिंगट केंस किती मजेदार दिसताहेत! गुलामांना पहा मोठ्या माणसांपासून दूर जाऊन मोकळेपणानें खेळावेंसें वाटत आहे. नाहींतर आपलेकडील मुलें! आईचे कडेवरून हलणार म्हणून नाहींत. कांहीं झोंपाळ्यावर झोंके घेत आहेत तर कांहीं फळ्यांवरून धाडधाड खालीं येत आहेत; कांहीं सी-सॉचा खेळ खेळत आहेत, तर कांहीं दोऱ्यांवरून उड्या मारीत आहेत. कांहीं लोखंडी कड्या फिरवीत आहेत, तर कांहीं नुसतेच हातवारे करून नाचताहेत. कांहीं त्या समोरच्या तलावांत कांठांकांठांनींच नावा सोडीत आहेत, तर कांहीं पोहत आहेत.

इकडील मोठ्या मुलांना आपलेकडील मुलांप्रमाणें म्हाताऱ्या माणसांसारखें नुसतें फिरणें आवडत नसून ते जास्त जोराचा व मेहनतीचा एकादा खेळच अधिक पसंत करितात. क्रिकेट, हॉकी, फूटबॉल, बेसबॉल वगैरे जे खेळ आपलेकडे शहरांतून खेळतात तेच तेहि खेळतात. परंतु शाळेंतील मोठ्या मुलांना फूटबॉल फार आवडतो. फूटबॉलचे सामने सुरू झाले म्हणजे हजारों माणसें ते पाहाण्याकरितां जमतात. कधीं कधीं मोठमोठे अधिकारी व कधींतर राजघराण्यांतील मंडळीहि असले सामने पाहाण्याकरितां

जातात. मोठ्या जमावासमोर व अशा बड्या अधिकाऱ्यांदेखत खेळावयाला मुलांना किती चुरस वाटत असेल ! आपलेकडे क्रिकेट फक्त पावसाळ्यांतच खेळतात; कारण त्या दिवसांत आकाशांत ढग येत असल्यामुळें फारसें ऊन नसतें. शिवाय मधून मधून येणाऱ्या पावसाच्या सरींनीं एकंदर पटांगण हिरवें व मऊ राहतें. ब्रिटिश बेटांत फारसें ऊन केव्हांच नसलें, व बाराहि महिने थोडाथोडा पाऊस पडत असला तरी बाराहि महिने क्रिकेट खेळतां येत नाहीं. कारण ऑक्टोबर, नोव्हेंबर मध्यें धुकें असतें; तर डिसेंबर, जानुआरी, फेब्रुआरी या महिन्यांत आतिशय थंडी व बर्फ असतें; आणि मार्च, एप्रिलमध्यें भयंकर वारा सुटतो. अशाप्रकारें धुकें, बर्फ, थंडी, वारा इत्यादींचे हंगाम आलटून पालटून सुरू असल्यामुळें क्रिकेटसारखा दोन-दोन तीन-तीन दिवसांचा खेळ खेळणें फारसें शक्य नसतें; आणि म्हणून क्रिकेटपेक्षां फूटबॉल्, हॉकी वगैरेसारखे थोड्या वेळांत आटोपणारे खेळच तिकडील मुलांना जास्त आवडतात. मोठ्या माणसांनाहि उघड्या मैदानावरचे खेळ खेळण्यांत कांहीं कमीपणा वाटत नाहीं. टेनिस्, गोल्फ्, पोलो, हे मोठ्या माणसांचे खास खेळ होत. टेनिसचा तर इंग्रज लोकांना इतका शोक आहे कीं, ते कोण-त्याहि देशांत जावोत, तेथें ते टेनिसचा एकादा तरी क्लब काढतीलच. आणि असें म्हणतात कीं, इतर खेळ जरी देशादेशापुरतेच असले तरी, टेनिस् हा खेळ मात्र जगांतील बहुतेक देशांत खेळतात. इकडे ऋतुमानाप्रमाणें जशा इतर गोष्टी बदलतात तसे खेळहि बदलतात. थंडीचे दिवसांत जिकडे तिकडे बर्फमय होत असल्या-मुळें त्या दिवसांतील खेळहि बर्फावरचेच असतात. टबॉगनिंग्, स्केटिंग् वगैरे खेळ अशाप्रकारचेच असून त्यांत बर्फावरून घसरत घसरत जाण्याची किंवा पळण्याची अतिशय मजा असते. परंतु जर

फळीवरून किंवा लांकडी जोड्यांवरून घसरतांना तोल सुटला तर बरीक चांगलीच हापटी मिळून बरीच दुखापत होते.

मोठ्या मुलांचा आणखी एक विशेष खेळ म्हणजे बोटींच्या शर्यती. टेम्स नदीवर अशा अनेक शर्यती मोठ्या चुरशीनें होतात; आणि ऑक्सफर्ड् व केंब्रिज् येथील विद्यार्थ्यांच्या वार्षिक शर्यती होतात तेव्हां तर कांहीं विचारायासच नको ! लोकांचे थवेच्या थवे त्या पाहाण्याकरितां टेम्सच्या दुतर्फा उभे असतात. लहानपणापासून असल्या शर्यतींना उत्तेजन मिळतें म्हणून तर मोठेपणीं समुद्रावर लांबलांब सफरी करावयाला किंवा जहाजांवर झुंजावयाला त्यांना भीति वाटत नाहीं. शिवाय इंग्लंड हें स्वतः बेट असल्यामुळें व भोंवतालींहि बरीचशीं बेटेंच असल्यामुळें जरा बाहेर पडावयाचें म्हटल्यास समुद्रांतूनच जावें-यावें लागतें. तसेंच इंग्लंडच्या कितीतरी लोकांचा धंदा मच्छेमारीचा असल्यामुळें त्यांचा समुद्राशीं अतिशय संबंध येतो. अर्थात् या सर्वांला चांगल्या रीतीनें होडचा चालवितां येणें व पोहतां येणें अत्यंत जरूरीचें आहे. म्हणूनच होडयांच्या शर्यतीप्रमाणें पोहण्याच्या शर्यतीहि तिकडे फार लागतात. प्रत्येक शाळेंत व खेळांच्या इतर ठिकाणींहि पोहण्यास शिकविण्याची सोय केलेली असून इकडील बहुतेक मुलांमुलींना थोडें फार पोहतां येतेंच. टेम्स् नदी पोहून जाण्यांत तेथील मुलांमुलींना आतां कांहींच वाटत नसून त्यांच्यापैकीं कांहीं धाडशी मुलांमुलींची महत्त्वाकांक्षा आतां इंग्लिश खाडी ओलांडून जाण्याची आहे ! ही खाडी लहानसान नसून चांगली २१ मैल रुंद आहे; शिवाय तिच्या पाण्याला जोर विशेष असून तींत बरेच वेळां वादळेंहि होतात ! इंग्रज लोक किती धाडशी व महत्त्वाकांक्षी आहेत खरे ?

मुलांमुलींची महत्त्वाकांक्षा समुद्र ओलांडायाची आहे तर


मोठ्या माणसांची महत्त्वाकांक्षा निरनिराळे महासागर ओलांडून दूरच्या देशांना विमानांतून जाण्याची आहे. आणि याहि बाबतीं-तलें शिक्षण देण्याची व्यवस्था तिकडे होत आहे. क्रॉयडन् म्हणून जें ठिकाण आहे, तें विमानांचें स्टेशन म्हणून प्रसिद्ध असून तेथून विमानांतून बसून इकडे तिकडे जातां येतें. सुरुवातीला कितीतरी विमानें मध्यंतरींच फुटल्यामुळें माणसें समुद्रांत बुडून किंवा जमि-नीवर हापटून मेलीं आहेत. परंतु इंग्रज लोकांनीं कच न खातां आपले प्रयत्न तसेच चालू ठेविले आहेत; व आतां कांहीं ठिकाणीं ते विमानांतून बिनधोक जाऊं येऊं लागले आहेत. हिंदुस्थानांतील डाकहि हल्लीं विमानांतून नेण्या-आणण्याची व्यवस्था झाली असून थोड्याच दिवसांत माणसांची ये-जाहि विमानांतूनच सुरू होईल; व मग तेरा दिवसांचे ऐवजीं अवघ्या पांच-सहा दिवसांतच आप-णांला इंग्लंडला जातां येईल ! आगगाड्या व आगबोटी यांच्याच आश्चर्यांत आपण अद्याप आहोंत तों तिकडे त्यांना विमानांतहि कांहीं विशेषसें उरलें नाहीं !

पण ही पहा इकडे एक बाई आपल्या लहान मुलाला 'प्राम्' (हात-गाडी) मध्यें घालून इकडेच येत आहे. पोराचा पोशाख तर पहा. त्याचे ते मऊ बूट, गरम मोजे, लोकरीचा सूट, रंगीबेरंगी फिती,--सर्व कांहीं मजेदार दिसतें आहे. आपल्याकडेहि शहरांत राहाणाऱ्या श्रीमंत लोकांत व पारशांसारख्या पुढारलेल्या जातींत असला गरम व अंगभर पोशाख घालण्याची चाल पडूं लागली आहे. आपलेकडील हवा उष्ण असल्यामुळें असल्या पोशाखाची आपणांस वास्तविक फारशी जरूरी नाहीं. परंतु इंग्लंडची हवा थंड व पावसाळी असल्या-मुळें, त्यांना खरोखरच लोंकरीच्या गरम कपड्यांची जरूरी आहे. शिवाय लोंकरीची पैदासहि तिकडे मुबलक होत असून लोंकरीचें

कापड व कपडे करण्याच्या गिरण्याहि पुष्कळ असल्यामुळें त्यांनीं लोंकरीचे कपडे घालणेंच योग्य आहे. हे कपडे स्वस्त असतात असें मात्र नाहीं. उलट आपलेकडे लालिमली, धारीवाल वगैरे गिरण्यांतून होणाऱ्या गरम कापडापेक्षां इंग्लिश गरम कापड बरेंच महाग असतें. परंतु तिकडील थंड हवेच्या योगानें व घाम वगैरे फारसा येत नसल्यामुळें तें कापड टिकतें जास्त; व अशा रीतीनें तिकडील गरम कपडे शेवटीं स्वस्तच पडतात. या थंड हवेचा फायदा कितीतरी लहानसान बाबतींत तिकडील लोकांना मिळतो. खूप काम करवणें, खूप भूक लागणें, घाम येत नसल्यामुळें कपडे स्वच्छ राहणें व टिकणें, रस्त्यांत धूळ कमी उडणें, डांस, ढेंकूण वगैरे न होणें—असे एक ना दोन-शेंकडों फायदे या थंड हवेचे आहेत. अर्थात् फायद्यांबरोबरच कांहीं तोटेहि आहेतच.

त्या बाईच्या खांद्यावर एक रेन-कोटहि आहे. कारण नेम काय सांगावा ? आतां ऊन आहे, पण थोड्याच वेळांत पावसास सुरुवात होऊन पोर भिजावयाचें ! ब्रिटिश बेटांची हवा अतिशय लहरी असून केव्हां उघडीक पडेल, केव्हां पाऊस पडेल, केव्हां थंडी पडेल, केव्हां उष्णता चढेल, केव्हां ऊन पडेल, केव्हां काळोख पडेल याचा कांहीं नेम सांगवत नाहीं ! आणि म्हणूनच ते लोक हवेसंबंधीं अतिशय हळवे असतात. वर्तमानपत्रांतून किंवा खाजगी संभाषणांतून हवापाण्यासंबंधीं बोलणें निघणें हें स्वाभाविक होऊन बसलें आहे. पुष्कळशा घरांतून हवा, पाऊस व उष्णता मोजण्याकरितां थर्मामीटर, बॅरोमीटर व रेनगेज हीं यंत्रें ठेवलेलीं असून, सकाळीं उठल्याबरोबर तीं पाहणें व हवेसंबंधीं भविष्यें वर्तविणें हें अगदीं ठराविक होऊन गेलें असतें. तसेंच गुड्-मॉर्नींग्, गुड्-ईव्हिनिंग्, गुड्-नाईट् वगैरे शब्द-प्रयोगहि इकडे या दृष्टीनें योग्य असे वाटतात.

इंग्लिश लोकांच्या नित्याच्या खाण्यांत येणारीं फळें



१ ग्रेप्स, २ चेरीज, ३ ऑरेंज, ४ पीच, ५ प्लम्स्, ६ पेअर, ७ ॲपल्, ८ स्ट्रॉबेरीज.

पुढील पानावर या सर्व फळांचें वर्णन दिलें आहे तें वाचा.

(१) मनुष्याचे आहारांत फळांचें फार महत्त्व आहे असें म्हणतात. कोणत्या दृष्टीनें ?

(२) ब्रिटिश बेटांत कोणकोणत्या देशांतून फळें येतात ? तीं मार्गांत नासूं नयेत म्हणून काय व्यवस्था केली असते?

(३) हिंदुस्थानांतील कोणतीं फळें तिकडे होतात ? कोणतीं होत नाहींत ? कां ?

(४) ब्रिटिश बेटांतील फळांचा मोसम कोणता ? बाकीच्या दिवसांत तीं ते कोठून मिळवितात ?

(५) खाण्यास पुरून उरलेल्या फळांचा विनियोग कसा करतात ?

आपल्या बाहुलीला थंडी वाजूं नये म्हणून तें पोर किती जपतें आहे पहा. शेजारींच एक कुत्र्याचें पिलूं बसलें आहे. समोरच्या बाजूला एक खेळांतलें विमान व एक मोटारगाडी पडली असून कोपऱ्यांत एक चाकोलेट्चा डबा दिसतो आहे. इंग्रज मुलें कोठेंहि जावोत, त्यांचीं बाहुलीं, कुत्रीं, खेळणीं, खाऊचे डबे हीं त्यांच्यापाशीं असावयाचींच; घरीं तर तीं सर्व काळ त्यांच्याशीं खेळतातच; परंतु शाळेंताहि त्यांना बहुतेक वेळ खुशाल खेळूं देतात. मला वाटतें तुम्हांला असल्या शाळा फारच आवडतील ! हीं सर्व खेळणीं तसेंच चाकोलेट्सारखे मेवामिठाईचे पदार्थ इंग्लंडांत इतके होतात कीं, ते तेथील लोकांना पुरेसे पडतात येवढेंच नव्हे, तर दुसऱ्या देशांतील लोकांना सुद्धां ते ते पाठवूं शकतात.

चला, आपण आतां परत फिरूं, व कोंपऱ्यावरच्या फळवाल्याकडून कांहीं फळें विकत घेऊं. तीं पहा ॲपल्स, पेअर्स, प्लम्स, चेरीज, स्ट्राबेरीज, रास्बेरीज, गूजबेरीज वगैरे कितीतरी फळें तेथें स्वच्छ पुसून व नेटनेटकीं लावून ठेविलीं आहेत. या ॲपल्स्मध्यें व आपल्या सफरचंदमध्यें कांहींच फरक दिसत नाहीं. पेअर्स मात्र वरून पेरूसारखींच दिसलीं तरी त्यांत पेरूसारख्या टणक बिया लागणार नाहींत. हीं प्लम्स् वरून जरा जरा हिरव्या जरदाळूसारखीं दिसतात; पण आकारानें मात्र तीं बरींच मोठीं आहेत. चेरीज व तांबडी करवंदें यांतहि बराच सारखेपणा आहे. स्ट्राबेरीज रंगाच्या व खडबडीतपणाच्या बाबतींत थोडीशीं तुतींसारखीं दिसतात नाहीं बरें ? जूनपासून पुढें पांच-सहा महिने या सर्व फळांचा मोसम असतो; परंतु हवा जात्याच थंड असल्यामुळें व बर्फांत घालून फळें टिकविण्याची युक्ति निघाल्यामुळें हीं सर्व फळें नेहमींहि मिळूं शकतात. बहुतेक फळें ताजींच खावयाचीं असतात. परंतु

पेअर्स व ॲपल्स यांचीं द्राक्षासवाप्रमाणें आसवेंहि करतात. आपलेकडील फळांप्रमाणें या फळांचेहि मुरंबे, पाक वगैरे करतात. त्याला ते जॅम्, मार्मलेड वगैरे म्हणतात. आपण जसा भाकरीबरोबर गुळंबा किंवा पोळीबरोबर मुरंबा घेतों, तसा ते पावाबरोबर जॅम् घेतात. शिवाय साखरेच्या पाकांत किंवा सिरप्मध्यें हीं फळें घालून व बरणीचें तोंड अगदीं बंद करून ठेवल्यास पुष्कळ दिवस तीं जशींच्या तशीं टिकूं शकतात; आणि म्हणून तीं दूरदूरच्या देशांतहि विकण्याकरितां पाठवितां येतात.

चला; फारच दमलां असलां तर आपण या रेस्टॉरांमध्यें जाऊं. नुसत्या खाण्यापिण्याच्या जागांना इकडे रेस्टॉरां म्हणतात. राहाण्याच्या व जेवण्याच्या जागांना मात्र होटेल म्हणतात. रेस्टॉरांमध्यें जाऊन चहा वगैरे घेणें इकडे कमीपणाचें समजत नाहींत. उलट तें आवश्यकच असतें. कारण उद्योग-धंद्याच्या जागा, बाजारपेठा, शाळा, ऑफिसें वगैरे ठिकाणें व राहण्याच्या जागा एकमेकांपासून इतक्या दूर दूर असतात कीं, मधल्या वेळीं घरीं जाऊन खाऊन येणें शक्यच नसतें; आणि म्हणून सर्व सार्वजनिक जागांचे आसपास उपाहारगृहें भरपूर असतात. येवढेंच नव्हे, तर सर्व सार्वजनिक समारंभांतून किंवा सभांतून खाण्यापिण्याची व्यवस्था करण्याची चाल इकडे असून तीच चाल आतां आपलेकडेहि येत चालली आहे. ही इकडील लोकांची लंच्ची म्हणजे मधल्या वेळच्या फराळाची वेळ असून रेस्टॉरांत मासे, मांस, बटाटे, सॅलड्,पुडिंग् वगैरे सर्व पदार्थ आतां तयार असतील. परंतु यांपैकीं आपणांला कांहींच चालण्यासारखें नसल्यामुळें चहा, बिस्किटें, केक्स् अशा पदार्थांवरच आपणांस भागवावें लागेल. चहाहि अतिशय सौम्य व कधींकधीं तर कोराच पिण्याची चाल असल्यामुळें, तोहि तुम्हांला

फारसा आवडणार नाहीं; आणि तो हिंदुस्थान, चीन वगैरेसारख्या दूरच्या देशांतून येथें येत असल्यामुळें आपलेकडीलपेक्षां जरा महाग-हि मिळेल. केक्स् व बिस्किटें मात्र फारच चांगलीं व तऱ्हेतऱ्हेचीं मिळतील. कारण इंग्लंड हें गव्हाचें व विशेषतः गव्हाच्या पदार्थांचें आगर आहे. आपलेकडे हंट्ले-पामर्सचीं, किंवा पीक्, फ्रीन्, जेकब् वगैरे कंपन्यांचीं जीं बिस्किटें येतात तीं येथीलच.

आतांपर्यंत आपण मोठ्या रस्त्यावरच्याच गोष्टी पाहिल्या. लहान-सान रस्ते, त्यांवरील घरें, व त्यांत राहणाऱ्या मध्यमवर्गाच्या लोकांची सर्वसाधारण राहणी यांची माहिती तर आपणांस अद्याप कांहींच झाली नाहीं. आणि आपल्या दृष्टीनें तीच माहिती तर खरी महत्त्वाची. तसेंच एकाद्या शाळेचीहि माहिती तुम्हांला ऐका-वीशी वाटत असेल; म्हणून आतां आपण हा मोठा रस्ता सोडून जरा राहण्याच्या वस्तींत जाऊं. हें पहा या रस्त्याला कसलीशी ' लेन ' म्हणजे गल्ली म्हटलें आहे; परंतु गल्ली म्हटलें म्हणजे जसा चिखलानें माखलेला किंवा धुळीनें भरलेला, मोऱ्या नाल्यांची घाण सुटलेला, गटारें बुजलेला, किंवा केराची पेटी वाहून जात असलेला असा एकादा अरुंद व लहानसा रस्ता डोळ्यांपुढें येतो तसा प्रकार या गल्लीचा दिसत नाहीं. रस्ता डांबराचा केलेला असून त्यांत धूळ वगैरे दिसत नाहीं. डांबर मुबलक व स्वस्त, आणि हवा थंड व पावसाळी असल्यामुळें इकडील सर्वच रस्ते असे राहात असतील. सर्व घरें रांगेंत असून प्रत्येकावर घरनंबर व स्वतःचें विशिष्ट नांव ह्यांच्या पाट्या आहेत. प्रत्येक घरापुढें थोडीशी तरी मोकळी जागा असून प्रत्येकाला एक फाकट आहे. घरांच्या भिंती आपले कडीलप्रमाणें दगडी नसून लाल विटांच्या आहेत. इकडील प्रांतांत टणक दगड नाहीं, शिवाय कडक ऊन नसल्यामुळें दगडी

भिंतींची आवश्यकताहि नाहीं. दुसरें असें कीं, कडक थंडीचें निवारण कोळशाच्या भट्ट्यांनीं किंवा गरम पाण्याच्या नळ्यांनीं उष्णता उत्पन्न करून करतां येतें. मुख्य फाकटाशिवाय प्रत्येक घराला दुसरें एक लहानसें फाकट आहे, त्याला ते ' ट्रेडर्स् गेट् ' म्हणजे दुकानदाराचें फाकट असें म्हणतात. कारण कोळसा, दूध, भाजी, अंडीं वगैरे रोज दुकानांतून आणावयाच्या सर्व जिनसा येथें मालकानें स्वतः बाजारांत जाऊन आणावयाच्या नसतात, तर दुकानदारानेंच मालकिणीच्या चिठीप्रमाणें किंवा फोनवरून पाठविलेल्या निरोपाप्रमाणें आपल्या नोकरामार्फत त्या पाठवावयाच्या असतात. आणि या सर्व जिनसा मोठ्या पहांटेस दाराशीं येऊन पडलेल्या असतात. वाटच्या वाटसरूंना किंवा चोरांपोरांना कोणालाहि त्या चोरण्याची इच्छा होत नाहीं; असल्या बाबतींत तिकडील लोक बरेच प्रामाणिक असतात यांत शंकाच नाहीं. कोळशाकरितां एक स्वतंत्र तळघर केलेलें असून हमालानें त्यांत कोळसा ओतला कीं, तो थेट शेगडीपाशीं जाऊन पोंचावा अशी व्यवस्था केलेली असते. बाहेर थंडी अतिशय असल्यामुळें घराचे दरवाजे नेहमीं बंदच असतात. हांक मारणारा आपलेकडीलप्रमाणें मालकाचे नांवानें मोठमोठ्यानें हांका मारीत सुटत नाहीं; किंवा कडीहि दारावर खडखडावीत नाहीं; तर दरवाजावर असलेली विजेची घंटा किंवा नॉकर (ठोठावण्याकरितां केलला दांडा) वाजवून आपण आल्याची वर्दी देतो.

या घरांना आपलेकडीलप्रमाणें हवा खाण्याकरितां सज्जे किंवा गॅलऱ्या तर नाहींतच, उलट उजेडाकरितां केलेल्या तावदानी खिडक्याहि पडद्यांनीं झांकून घ्याव्या लागतात. सबंध ब्रिटिश बेटांत हवा खाण्याचीं ठिकाणें हिंदुस्थानांतल्याप्रमाणें डोंगरावरील थंड ठिकाणें नाहींत, तर समुद्रकिनाऱ्यावरील उबदार ठिकाणें होत. सर्व

घरें बाहेरून अगदीं निस्तेज, भकास व एका सांच्याचीं दिसतात. बाहेरून झकास रंग असणें तेथील धुरकट हवेमुळें शक्यच नसतें. येथील घरांची एक विशेष गोष्ट ही आहे कीं, त्यांत प्रत्येक कामाकरितां स्वतंत्र जागा असते. आपलेकडीलप्रमाणें स्वयंपाकघरांतच जेवण, व दिवाणखान्यांतच अभ्यासाची किंवा निजावयाची जागा अशी स्थिति नसते. तसेंच पुरुषांप्रमाणें बायकांना व मुलांनाहि ज्याच्या त्याच्या स्वतंत्र जागा असतात; त्यामुळें प्रत्येकाला आपल्या सर्व वस्तु एके ठिकाणीं व व्यवस्थेनें ठेवतां येतात; व त्या संभाळण्याची जबाबदारीहि त्यावरच पडते. घरांत आपलेकडीलप्रमाणें कोनाडे, खुंट्या, खिळे, शिंकीं हींहि दिसणार नाहींत. सर्व जिनसांना कपाटें, मंडप्या किंवा स्टँड्स असतात. जमिनी फरशीच्या किंवा लांकडी फळ्यांच्या केलेल्या असून त्यांवर सतरंज्या पसरलेल्या असतात; व त्यांवर टेबलें, खुर्च्या, कोच, पलंग वगैरे लांकडी सामान मांडलेलें असतें. वरून आपलेकडीलप्रमाणें कडीपाट किंवा पटई नसून सीमेंटचा कोबा केलेला असतो. भिंतींना निरनिराळ्या रंगांचे व नक्षीचे कागद चिकटविलेले असून त्यांचा रंग सामानाच्या रंगाशीं जुळेल अशी निवड केलेली असते. हें कागद लावण्याचें काम थोड्या वेळांत, कमी खर्चांत, व घरचेघरीं करतां येण्यासारखें असून, कागदामुळें कदाचित् ऊबहि राहात असावी. आपलेकडे भिंतींवरील कागद उष्णतेनें निखळतात; पण तिकडे तसें होत नाहीं. थंडीचे दिवसांत घरांतील प्रत्येक खोली ऊबदार राहावी म्हणून भिंतींतच एक हार्थ (शेगडी) केली असून तिच्यांतील विस्तव विझू नये म्हणून तींत एकसारखा कोळसा घालावा लागतो. धूर घरभर होऊं नये, व परस्पर भिंतींतून छपराबाहेर पडावा म्हणून एक धुराडें केलेलें असून घरोघर या धुम्या पेटल्या

म्हणजे मोठी मजा दिसते. कधीं कधीं कोळशाऐवजीं भिंतींतील नळांतून गरम पाण्याचे प्रवाह सोडून किंवा विजेच्या स्टोव्हनें उष्णता आणिली जाते. याच स्टोव्हवर शेगडीचेंहि काम भागतें.

हिंदुस्थानांत आलेले इंग्रज लोक सामान्यतः श्रीमंत दिसले व त्यांजपाशीं नोकरचाकर असले तरी, खुद्द इंग्लंडमधील बहुतेक लोक आपलेप्रमाणेंच मध्यम व गरीब वर्गांतले असून त्याना नोकर-चाकर ठेवण्याची फारशी ऐपत नसते. मात्र येवढें खरें कीं, त्यांचें सरासरी उत्पन्न जास्त व सर्वसामान्य राहणी वरच्या दर्जाची असते. तिकडील मनुष्य कितीहि गरीब असो, त्याची जागा व तिच्यांतील सामानसुमान आपलेकडील श्रीमंत माणसाचे जागेपेक्षां व त्याच्या सामानासुमानापेक्षां चांगलें असतें. तसेंच टापटीप, स्वच्छता, व शोभा यांची आवडहि त्या लोकांना जास्त असते; आणि विशेष हें कीं, ही स्वच्छता वगैरे ठेवण्याचें काम घरांतील मालकीण स्वतः करीत असते. सकाळीं सातचे सुमारास (तिकडच्या हवेच्या मानानें हें लवकरच आहे) उठून दाराबाहेरचे जिन्नस ती बाई आंत आणते. नंतर ती केंस साफसूफ करते, व कपडे बदलून न्याहरीच्या तयारीला लागते. ती तयारी होईतों सर्व मुलें माणसें तोंड वगैरे धुऊन व कपडे करून खोलींतून बाहेर—डाइनिंग्—हॉल्मध्यें (जेवणाचे खोलींत)—जमतात. न्याहरीचे वेळीं आपलेकडीलप्रमाणें नुसता चहा किंवा फारतर बिस्किटें येवढेंच नसून त्यांत पॉरिज् (ओट शिजवून दूध व साखर घालून केलेला पदार्थ) टोस्ट्, जॅम्, अंडीं वगैरे पदार्थहि असतात. न्याहरी आटोपली म्हणजे साडेआठचे सुमारास मुलें शाळेंत, व यजमान उद्योगधंद्याला बाहेर पडतात; व घरधनीण घराच्या साफसुफीला लागते. हवा थंड असून घाम येत नसल्यामुळें रोज स्नान करण्याची तिकडे चाल नाहीं. तसेंच

धुण्याचे सर्व कपडे आठवड्यांतून एकदांच धुवावयाचे असल्यामुळें तिकडील स्त्रियांना आपलेकडील स्त्रियांप्रमाणें रोज धुणें धुवावें लागत नाहीं; तथापि बिछाने साफसूफ करून, व जमिनी, भिंती, खिडक्या, दारें, कपाटें, टेबलें, खुर्च्या वगैरे सर्व झाडून-पुसून लख्ख करीपर्यंत चांगला बाराचा सुमार होतो. पुरुष व मोठीं मुलें दुपारीं घरीं जेवण्यास येत नसल्यामुळें बायकांचा बारा ते चार पर्यंतचा वेळ मुलांचें व आपलें दुपारचें जेवण उरकणें, बाजारहाट करणें, शिवणें-टिपणें, लेखन-वाचन करणें, मुलांना शाळेंतून घरीं आणणें इत्यादि कामांत जातो. नतर संध्याकाळीं सहाचे सुमारास नवरा कामावरून परत आल्यावर मुख्य जेवण व्हावयाचें असल्यामुळें ती स्वयंपाकाला लागते. हें जेवण झाल्यानंतर मुलांबाळांची निजण्यासवरण्याची व्यवस्था करून नवरा-बायको कोठेंतरी फिरावयास व कधीं कधीं सिनेमा वगैरे पाहावयास बाहेर पडतात, किंवा घरीं आलेल्या इष्टमित्रांबरोबरच गप्पागोष्टी करतात; व शेवटीं आकरा-साडेआकराचे सुमारास पुनः कोको, कॉफी, किंवा बिअर्सारखें एकादें पेय घेऊन तीं झोपीं जातात.

इंग्रज लोकांच्या घरादारांची व एकंदर राहणीची माहिती जशी मनोरंजक आहे तशीच तेथील सर्वसामान्य शाळांची माहितीहि तुम्हांला मनोरंजक वाटेल. सहा ते पंधरा वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांमुलींनीं तेथें शाळेंत जावेंच लागतें.त्यामुळें प्रत्येक माणसाला साधारणपणें तरी लिहितां-वाचतां येऊन तो बराच समंजस होतो. याच्या उलट आपलेकडे शंभर माणसें घेतलीं तर त्यांपैकीं दहांना सुद्धां लिहितांवाचतां येत नाहीं. तिकडील शाळा दुबार असून वर्ग सकाळीं नवाला व दुपारीं दोनला भरतात. सुरुवातीसच बायबल्चा तास झाल्यावर बारापर्यंत इतर विषय चालतात. १२ ते २ पर्यंत

मधली सुटी असते. या सुटींत मुलांनीं फराळ करून विश्रांति घ्यावयाची असते. घरें शाळेपासून बरींच दूर असल्यामुळें मुलें घरीं जात नाहींत, तर बरोबर आणलेले पदार्थ शाळेंतच खातात, किंवा शेजारच्या होटेलांत जाऊन कांहीं तरी खातात. प्रत्येक शाळेंत वर्ग उबदार राहावेत व खाण्याला गरम पदार्थ मिळावेत म्हणून फार काळजी घेण्यांत येते. कांहीं शाळांतून दुपारच्या खाण्याची व्यवस्था शाळेकडूनच केलेली असते. दोन ते साडेचारपर्यंत वर्ग पुन: भरून अभ्यासाचे काम चालतें. भाषा, गणित, इतिहास, भूगोल इत्यादि विषयांइतकेंच लांकूडकाम, धातुकाम, मातकाम, चित्रकला वगैरे विषयांनाहि महत्त्व दिलें जातें. तसेंच मुलांचे नाक, डोळे, कान, केस, कातडी वगैरे स्वच्छ ठेवण्याकरितां व त्यांचीं मापें व वजनें घेण्याकरितां एका डॉक्टरची योजना केली असते. तसेंच पोहणें, ड्रिल व खेळ खेळणें याहि गोष्टी विशेष महत्त्वाच्या मानल्या जाऊन त्या प्रत्येक मुलाला येतीलच अशी व्यवस्था केलेली असते. शाळेंत स्नानाची व पोहण्याची कांहीं ना कांहीं सोय केलेलीच असते. तसेंच सिनेमा, किंवा निदान मॅजिक् लँटर्न् यांचीहि व्यवस्था बहुतेक शाळेंत असते. शाळा भरवस्तींत असल्यामुळें त्यांना जवळच मोठमोठीं पटांगणें मिळणें शक्य नसलें तर कांहीं शाळांच्या इमारतींवर कौलावरां-ऐवजीं मोठमोठ्या सीमेंटच्या गच्च्या केलेल्या असतात तेथें मुलें खेळूं शकतात.

लंडनमध्यें आतांपर्यंत पाहिलेल्या गोष्टींवरून सर्व सामान्य इंग्रज लोकांची राहणी, पोशाख, खाणेंपिणें, खेळ, करमणुकीचीं साधनें इत्यादीसंबंधीं थोडीशी कल्पना तुम्हांस आली असेल; परंतु ती थोडीच व निवळ वरवरचीच असणार यांत शंका नाहीं. तसेंच शहरी राहणी इतकी कृत्रिम तऱ्हेची

बनते कीं तिच्यावरून एकंदर देशाच्या स्वाभाविक परिस्थितीची म्हणजे तेथील जमीन, हवा, पाणी, पिकें वगैरेंची बरोबर कल्पना फारशी होत नाहीं. आणि म्हणून ब्रिटिश बेटांची खरी कल्पना करून घ्यावयाची असेल तर आपणांस ब्रिटिश बेटांतील निरनिराळ्या भागांची थोडीबहुत तरी माहिती मिळविली पाहिजे. चला तर आपण आतां त्याच मार्गाला लागूं.

विचाराकरितां प्रश्न

प्रकरण ३ रें

१ लंडनसारखें महत्त्वाचें व आश्चर्यकारक ठिकाण जगांत दुसरें कोणतेंच नाहीं असें म्हणतात. लंडनला कोणकोणत्या दृष्टींनीं महत्त्व आलें आहे? त्यांतील आश्चर्य करण्यासारख्या ३–४ गोष्टी सांगा.

२ गोदी किंवा डॉक् म्हणजे काय? त्या कशाकरितां बांधलेल्या असतात? गोद्यांचे 'कोरडी' व 'ओली' असे दोन प्रकार असतात. या दोन प्रकारच्या गोद्यांचे उपयोग काय?

३ बाजारपेठेंत कोणत्या ठिकाणाला विशेष महत्त्व येतें? जगाच्या व्यापारीपेठेंत कलकत्त्यापेक्षां मुंबईला व पॅरिस्‌पेक्षां लंडन्‌ला जास्त महत्त्व येण्याचीं कारणें काय?

४ विलायतेंत ऋतुमानाप्रमाणें खेळ व पोशाख बदलतात याचीं कांहीं ठळळ उदाहरणें द्या.

५ इंग्लिश घरांतील कोणत्या गोष्टी तुम्हांला विशेष आवडल्या? भिंती, खिडक्या व जमिनी यासंबंधीं विशेष काय सांगतां येईल?

६ आपण व इंग्लिश लोक यांमध्यें खालीं दिलेल्या चालीरीतींत जो फरक पडतो तो कितपत समर्थनीय आहे?

(अ) घरांत शिरतांना आपण जोडे वगैरे बाहेर काढून ठेवून टोपी वगैरे तसेंच आंत नेतो. उलट इंग्लिश लोक टोपी बाहेर काढून ठेवून जोडे तसेच आंत नेतात.

(आ) लवकर निजणें व लवकर उठणें हें आपण विशेष चांगलें समजतों. उलट उशीरा निजण्यांत व उशीरा उठण्यांत त्यांना कांहींच कमीपणा वाटत नाहीं.

(इ) आलेल्या पाहुण्यास प्रथम पाणी देण्याची आपणांत चाल आहे. उटल त्यांच्यांत चहाकॉफी वगैरे पेय प्रथम देतात.

(ई) आपण दारू पिणें निषिद्ध मानतों; उलट ते धार्मिक प्रसंगींहि ती घेतल्यावांचून राहात नाहींत.

(उ) रोज तीनदां नसलें तरी एकदां तरी आपण स्नान करतोंच करतों. उलट ते आठवड्यांतही तीनदां करीत नाहींत.

(ऊ) आपणांस घरांतील खेळ विशेष आवडतात तर त्यांना उघड्या हवेंतील विशेष आवडतात.

(ए) आपलेकडे मलेरिआसारखे आजार जास्त असतात, तर त्यांचे-कडे छातीचे व त्वचेचे रोग जास्त असतात.

७ इंग्लिश लोकांच्या स्वभावांतील कांहीं विशेष सांगून ते तसे बनण्याला कांहीं भौगोलिक कारणें असल्यास तीं द्या.

प्रकरण ४ थें

ब्रिटिश बेटांची भौगोलिक पाहाणी


ब्रिटिश साम्राज्य किती मोठें आहे याचें जसें आश्चर्य वाटतें, तसेंच खुद्द ब्रिटिश बेटें कितीं लहान आहेत याचेंहि आश्चर्य वाटतें. पान ५४ वरील नकाशाकडे पहा. एकंदर जगाचे मानानें तीं बेटें किती लहान दिसतात. साम्राज्यरूपी विराट पुरुषाच्या खांद्यावर ब्रिटिश बेटें एकाद्या तिळाप्रमाणें शोभतात असें एका मार्मिक लेखकानें म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे ! एकटच्या यूरोप खंडाशीं तुलना करतांनाहि तीं अगदीं सांदीकोपऱ्यांत पडलेलीं दिसतात. स्पेनच्या

राजानें एका मध्यमशा नकाशांतील ब्रिटिश बेटांवर आपली करंगळी टेकून इंग्लंडच्या वकिलाला हिणावून विचारलें होतें 'हा आमचा स्पेन देश पाहा. पण तुमचें इंग्लंड आतां कोठें आहे' ? सबंध मुंबई इलाखा तरी कशाला, नुसता राजपुताना देखील ब्रिटिश बेटांपेक्षां मोठा भरेल. त्यांची दक्षिणोत्तर जास्तींत जास्त लांबी फारतर सहाशें मैल भरेल ! आणि त्यांचा एकंदर घेर सिंधुनदापेक्षां कांहीं लांब येणार नाहीं ! ब्रिटिश बेटें इतकीं लहान असूनहि तीं येवढ्या मोठ्या साम्राज्याचें केंद्र बनावींत हें आश्चर्य नाहीं काय ? ब्रिटिश बेटांत अशी कोणती शक्ति आहे कीं सर्व पृथ्वीच्या क्षेत्रफळाचा चौथा हिस्सा व अखिल मानव जातीपैकीं एकचतुर्थांश लोक त्यांच्या हुकमतीखालीं असावेत ? ब्रिटिश लोकांची सुधारणा, त्यांचें शिक्षण, त्यांचा इतिहास, त्यांच्या सामाजिक चालीरीति, व विशेषतः त्यांच्यांत वेळोवेळीं होऊन गेलेले शूर, मुत्सद्दी, धाडशी, स्वार्थत्यागी लोक या सर्वांमुळें ब्रिटिश बेटांची येवढी भरभराट झाली आहे यांत शंका नाहीं. परंतु या सर्वांपेक्षांहि ज्या भौगोलिक परिस्थितीमुळें मनुष्यें व राष्ट्रें एका विशिष्ट तऱ्हेचीं बनत असतात ती भौगोलिक परिस्थितीहि ब्रिटिश बेटांच्या भराभराटीला कारणीभूत झाली आहे असें आपल्याला दिसून येईल. आणि म्हणून ही भौगोलिक परिस्थिति कोणती हें आपण आतां समजावून घेण्याचा प्रयत्न करूं.

ब्रिटिश बेटें हीं वास्तविक एक सलग बेट नसून तीं बरीचशीं लहान-मोठीं बेटें मिळून झालीं आहेत. त्यांपैकीं इंग्लंड् व स्कॉट्लंड् हें बेट सर्वांत मोठें व सलग असून त्याच्या पश्चिमेकडील आयर्लंड हें त्याच्या खालोखाल आहे. बाकीचीं अतिशय लहान असून कांहीं एकेकटीं तर कांहीं जोड अशीं आहेत.

ब्रिटिश बेटांचा किनारा हिंदुस्थानच्या किनाऱ्याहून फारच निराळ्या स्वरूपाचा आहे. हिंदुस्थानचा किनारा सरळच्या सरळ आहे. म्हणजे त्यावर आखातें, खाड्या, सामुद्रधुन्या फारश्या नाहींत; येथें हजारों गांवें अशीं आहेत कीं, त्यांचे आसपास शेंकडों मैलांत कोठेंहि समुद्र नसून तेथील कोट्यवधि लोकांनीं जन्मांत समुद्र एकदांहि पाहिला नसेल ! उलट ब्रिटिश बेटांचा किनारा इतका दंतुर म्हणजे नागमोडी आहे कीं, सर्व किनाऱ्याभर आखातें, खाड्या वगैरेंची नुसती रेलचेल झाली आहे ! ब्रिटिश बेटांतील प्रत्येक गांवाला समुद्र अगदीं जवळ —६० मैलांचे आंत—असून तेथील बहुतेक सर्व माणसांनीं समुद्र पाहिलेला असतो, व पाण्यांतून प्रवास केलेला असतो. या बाबतींत इंग्लंड व जपान यांत अतिशयच साम्य आहे. हिंदुस्थानच्या हजारों मैलांच्या किनाऱ्यावर कराची, मुंबई, कोलंबो, कलकत्ता, रंगून, अशीं अवघीं चार-पांचच मोठीं बंदरें सांपडतील; परंतु ब्रिटिश बेटांच्या येवढ्याशा किनाऱ्यावर कितीतरी मोठमोठीं बंदरें असून त्यांत केवढालीं अजस्र जहाजें निवाऱ्याकरतां नांगरून पडलेलीं किंवा धक्क्याशीं मालाची चढ-उतार होत असलेलीं दृष्टीस पडतील. हीं जहाजें हिंदुस्थानांतील जहाजांप्रमाणें नुसतीं समुद्र किनाऱ्यालगतच उभीं राहातात असें नाहीं; तर भरतीबरोबर नद्यांचे व खाड्यांचे तोंडांनीं आंत कितीतरी मैलपर्यंत तीं जाऊं शकतात. वास्तविक लंडन हें समुद्र किनाऱ्यापासून बरेंच दूर आहे; परंतु थेम्समधून किती तरी मोठीं जहाजें थेट लंडनपर्यंत जाऊं शकतात. फनेलासारख्या रुंद तोंडाच्या कितीतरी नद्या व खाड्या ब्रिटिश बेटांचे किनाऱ्यावर—विशेषत: पूर्व किनाऱ्यावर—दिसून येतील.

सोबतच्या नकाशांत जमिनीच्या उंचीप्रमाणेंच समुद्राच्या पाण्याची खोलीहि दाखविलेली आहे; त्यांत पाहिलें असतां आपणांला


उंच व सरवल प्रदेश
सरवल प्रदेश
अति उंच प्रदेश
उंच प्रदेश
समुद्र सपाटीच्या खाली ३०० फू
मैलाचें प्रमाण
० ५० १०० १५० २०० २५० ३०० ३५० ४००

असें दिसून येईल कीं, किनाऱ्यालगतचें पाणी कोठेंहि तीनशें फुटां-पेक्षां जास्त नसून तो बहुतेक भाग बराच उथळ आहे. असें सांगतात कीं ब्रिटिश बेटें हीं पहिल्यांदा सबंध यूरोप खंडाचाच एक सलग भाग होता; व कालांतरानें ज्या ठिकाणीं आतां उत्तर समुद्र आहे तो भाग मात्र खालीं खचला जाऊन ब्रिटिश बेटें युरोपखंडापासून अगदीं विभक्त अशीं दिसूं लागलीं. जमीनीचा भाग खचून त्या ठिकाणीं समुद्र निर्माण होणें, किंवा समुद्र नाहींसे होऊन त्या जागीं डोंगर उत्पन्न होणें या गोष्टी आपल्याला चमत्कारिक वाटल्या तरी पृथ्वीच्या एकंदर घडामोडींत त्या सहज होऊं शकतात! आकाशाला भिडणाऱ्या उंच हिमालयाचे जागीं पूर्वीं पाताळाचा ठाव काढणारा खोल दर्या असेल अशी कल्पना तरी करतां येते का? परंतु तशी स्थिति असल्याचें हिमालयांतील शंख, व शिंपाहि सांगतात! उत्तर व आयरिश समुद्र आणि इंग्लिश खाडी यांचें पाणी इतकें उथळ आहे कीं कांहीं युक्तीनें तें आतांपेक्षां ३-४ शें फूट आटवितां आलें तर ब्रिटिश बेटें व युरोप खंड यांचे दरम्यान एक सपाट मैदान उत्पन्न होईल, व सबंध रहदारी आतांप्रमाणें पाण्यांतून बोटींनीं न होतां जमिनीवरून आगगाड्यांनीं होऊं लागेल! ब्रिटिश बेटांचा किनारा व हिंदुस्थानचा किनारा यांत इतर बाबतींत बराचसा फरक असला तरी त्यांत एक मोठा सारखेपणा असा आहे कीं दोघांच्याहि किनाऱ्यालगतचें पाणी बरेंच उथळ आहे; आणि म्हणून दोहोंच्याहि किनाऱ्याकिनाऱ्यानें बरेच मासे सांपडतात. परंतु त्यांतल्यात्यांत ब्रिटिश बेटांभोंवतालच्या समुद्रांचें पाणी त्यांतील निरनिराळ्या प्रवाहांमुळें बरेंच हालतें व खेळतें असल्यामुळें त्या समुद्रांत हिंदी-महासागरापेक्षां जास्त मासे सांपडतात. उत्तर समुद्र म्हणजे माशांचें

एक अगरच होऊन बसला असून त्याच्या किनाऱ्यावरील कितीतरी लोक मच्छेमारीवरच आपला निर्वाह करीत आहेत.

उत्तर समुद्र जसा उथळ आहे तसाच तो अरुदहि आहे. ब्रिटिश किनाऱ्यापासून निघालेलें कोणतेंहि जहाज जरा जलद गेल्यास समोरच्या किनाऱ्यावरील नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड, वगैरे कोणत्याहि देशास अवघ्या २४ तासांत पोंचूं शकतें! इंग्लिश खाडी ओलांडावयाला तर पुरते तीन तासहि लागत नाहींत; शांततेच्या काळीं व्यापार व माणसांमाणसांमधील दळणवळण वाढविण्याचे कामीं अशा प्रकारच्या समुद्राचा फारच उपयोग होतो. उलट लढाईचे वेळींहि त्याचा खंदकाप्रमाणें रक्षणाचे कामीं उपयोग होतो. चांगलेंसें आरमार ठेवून येवढ्या पट्टयाचा बंदोबस्त केला कीं ब्रिटिश लोक कायमचे निर्धास्त! गेल्या महायुद्धांत जवळच फ्रान्स व बेलजम् यांमध्यें जर्मन तोफांनीं येवढा हलकल्लोळ उडविला असतां खुद्द इंग्लंडला त्याची कांहींच झळ लागली नाहीं! समुद्र निरनिराळे देश विलग करून जसें त्यांचें रक्षण करतो तसेंच तो ते जोडतोहि. डोंगरांचें मात्र असें नाहीं. त्यांच्या योगानें धामधुमीच्या वेळीं निरनिराळ्या देशांचें रक्षण होतें खरें; परंतु शांततेच्या वेळीं रक्षणाची आवश्यकता नसून उलट दळणवळणाचीच जेव्हां जरूरी असते तेव्हां डोंगरांचा उपयोग कांहींच होत नाहीं. आपल्या मध्यस्थीनें देशांदेशांत मैत्री घडवून आणण्याचे ऐवजीं ते शत्रूप्रमाणें आडवे मात्र पडतात! हिमालयामुळें हिंदुस्थानचें उत्तरेकडील देशांपासून रक्षण होतें खरें, परंतु त्याचेचमुळें हिंदुस्थान व उत्तरेकडील दुसरे देश यांमध्यें दळणवळण व सलोखा उत्पन्न होऊं शकत नाहीं, हा केवढा तोटा आहे?

नकाशांत दुसरी एक गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं, इंग्लंडमधील

बहुतेक मोठ्या नद्या—टेम्स्, हंबर, वॉश इत्यादि—पूर्वेकडे वाहात जाऊन उत्तर समुद्राला मिळतात. दक्षिणेकडे वाहणाऱ्या नद्या फारश्या नाहींतच. पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांमध्यें सेव्हर्न, मर्झी, क्लाइड या मोठ्या असून पश्चिमेकडे अमेरिकेशीं चालणारा व्यापार याच नद्यांचे मार्गानें होत असल्यामुळें त्यांस विशेष महत्त्व आलें आहे.

स्कॉट्लंडच्या पश्चिमेकडील व उत्तरेकडील किनाऱ्यांवर बरींचशीं बेटें व आखातें आहेत; परंतु स्कॉट्लंडचा हा भाग डोंगराळ असून त्यांत उत्पन्न फारसें होत नसल्यामुळें या आखातांना व्यापारी दृष्ट्या कांहींच महत्त्व नाहीं.

आयर्लंडच्या किनाऱ्यावरही आखातें वगैरे बरींच आहेत; परंतु त्याही देशाचा निर्यात व्यापार म्हणण्यासारखा नसल्यामुळें आयर्लंडचे किनाऱ्यावर कॉर्कखेरीजकरून फारशीं बंदरें नाहींत.


ब्रिटिश बेटांभोंवतालच्या समुद्रांसंबंधीं विचार करतांना आणखी एका बाबतीकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे; व ती म्हणजे त्यांची भरती-ओहटी.

इरावती व हुगळी ह्या नद्या सोडल्यास हिंदुस्थानांतील इतर नद्यांतून जहाजें भरतीचे पाण्यावर फारशीं आंत जाऊं शकत नाहींत. म्हणजे हिंदुस्थानांत भरती-ओहटीचा जहाजें हाकारण्याचे कामीं उपयोग होत नाहीं. परंतु ब्रिटिश बेटांचा किनारा उथळ असून समुद्राचे पाण्याला जोरहि बराच असल्यामुळें, भरतीचे वेळीं तेथील लाटा वीस वीस फूट उंच चढतात, व अशा प्रकारें दिवसांतून दोनदां नद्या व खाड्या यांतून पाणी पन्नास पन्नास मैलपर्यंत आंत जाऊं शकतें. अर्थात् पाण्याबरोबर जहाजांचाहि शिरकाव होतो.

भरती समुद्रकिनाऱ्यावरचीं मोठमोठीं जहाजें नदीमुखानें

थेट आंतपर्यंत नेऊं शकते, तर ओहोटी ही नद्यांतील सर्व खळमळ पार समुद्राकडे नेऊन त्यांचीं पात्रें व मुखें नेहमीं स्वच्छ व साफ ठेवते हिंदुस्थानांतील कितीतरी नद्यांचे मुखांशीं वाळू सांचून तीं चोंदल्यामुळें त्या कायमच्या निरुपयोगी होऊन बसल्या आहेत. अशी स्थिति ब्रिटिश बेटांतील नद्यांची सहसा दिसत नाहीं. गांवांतील सर्व घाण ओढे व नाले यांतून नदींत जाते, व समुद्राच्या भरती-ओहोटीमुळें नद्या धुतल्या जाऊन गांवातील एकंदर आरोग्यहि चांगल्या प्रकारचें राहतें.

ब्रिटिश बेटें विषुववृत्ताच्या उत्तरेस बरींच दूर—५० ते ६०



ब्रिटिश बेटांची मध्यवर्ति स्थिति

अक्षांशांच्या दरम्यान—असल्यामुळें तेथील हवा सौम्य प्रकारची

आहे; म्हणजे ती अतिशय उष्णहि नाहीं, किंवा अतिशय थंडाहि नाहीं. तसेंच त्यांच्या दोहों बाजूंस अमेरिका व यूरोप यासारखीं संपन्न व आधुनिक संस्कृतींत बऱ्याच वरच्या दर्जाला पोहोंचलेलीं खंडें असल्यामुळें ब्रिटिश बेटांना व्यापारी दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. तीं बेटें अमेरिका व यूरोप यांच्यामधील रहदारीच्या हमरस्त्यावरील व्यापाराचें एक नाकेंच होऊन बसलीं आहेत असें वरील नकाशावरून तुमचे लक्षांत सहज येईल.

भूपृष्ठरचनेच्या दृष्टीनें ब्रिटिश बेटांचा विचार करतांना आपण स्कॉट्लंड, इंग्लंड, व आयर्लंड् यांचा निरनिराळा विचार केलेला बरा. या तिहींमध्यें स्कॉटलंड, हा भाग अत्यंत डोंगराळ आहे; परंतु तेथील डोंगर फारसे उंच नसून त्यांतील जातींत जास्त उंच डोंगर सुद्धां आपल्या सह्याद्रीपेक्षां कमीच उंच भरेल! स्कॉटलंडचे उत्तर भागांत नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे अशी तिरपी ग्लेनमूर नांवाची एक मोठी दरी पसरली असून तिच्या दोहों बाजूंस अतिशय पहाडी व रूक्ष मुलूख पसरला आहे. तेथें कोळसा, चुनखडी माती वगैरे कांहींच नाहीं. झाडेंझुडपेंहि नसल्यामुळें डोंगर अगदीं उघडेबोडके दिसतात. उतारांवर अगदीं खुरटें व चरचरीत गवत मात्र उगवतें; त्यावर थोडींशीं गुरेंढोरें व शेळ्यामेंढ्या चारून धनगर आपली उपजीविका करतात. ह्याचे दक्षिणेकडील डोंगराळ भाग तितका नापीक नसून तेथील दऱ्याखोऱ्यांतून थोडीशी शेतीभातीहि होते; त्यामुळें; तेथें वस्ती बरीच आहे. याचेहि खालीं दक्षिणेस क्लाइड् व टे या नद्यांमधील पट्टा सुपीक असून शिवाय तेथें कोळशाच्या खाणीहि आहेत; म्हणून या भागांत पुष्कळशीं मोठीं शहरें वसलीं असून तीं कारखान्यांकरितां प्रसिद्ध आहेत. पश्चिमेकडील ग्लास्गो हें क्लाइड्चे मुखाशीं एक मोठें बंदर असून स्काट्लंडचा अमेरिकेशीं चालणारा

सर्व व्यापार याच बंदरांतून चालतो. स्कॉट्लंडमध्यें सर्वांत मोठें शहर हेंच आहे. पूर्व किनाऱ्यावरील एडिंबरो हें राजधानीचें शहर आहे. तें एका डोंगरी किल्याचे भोंवतीं वसलेलें असल्यामुळें फारच सुंदर दिसतें. तें शिक्षणाचें एक आगरच असून शाळा, कॉलेजें, इस्पितळें, पदार्थसंग्रहालयें, छापखाने, ग्रंथालयें वगैरे कितीतरी शैक्षणिक संस्था तेथें आहेत.

स्कॉटलंडचे मानानें इंग्लंडची उंची बरीच कमी आहे. त्याचा बहुतेक भाग सपाट मैदान असून मध्यंतरीं ज्या थोड्या टेकड्या आहेत त्यांतूनहि मधून मधून खिंडी व ओहोळ आहेत. पिनाइन् पर्वतांची रांग इंग्लंडच्या उत्तर टोंकापासून निघून दक्षिणेकडे अर्ध्या भागावर जाते तों तिला डिव्होनिअन् पर्वतांची पूर्वपश्चिम रांग आडवी येते. हेहि डोंगर म्हणण्यासारखे उंच नसले तरी ते अतिशय महत्त्वाचे आहेत; कारण इंग्लंडमधील कोळशाच्या व लोखंडाच्या बहुतेक खाणी याच दोन रांगांचे आसपास आहेत. पूर्वेकडील हंबर नदीचें मुख व पश्चिमेकडील ब्रिस्टल् चॅनल् यांना जोडील अशी एक सरळ रेषा काढल्यास त्या रेषेचे दक्षिणेकडील बहुतेक सर्व जमीन शाडू, चुनखडी व चिकणमाती यांची बनली आहे. त्यामुळें तींत जिकडे तिकडे शेतें व कुरणें आहेत. इंग्लंडमधील सर्व शेती याच भागांत असल्यामुळें बहुतेक सर्व वस्ती तेथेंच एकवटली आहे. लंडन्, ऑक्सफर्ड्, केंब्रिज् वगैरे शहरें याच भागांत आहेत.

सेव्हर्न नदीच्या पश्चिमेस वेल्सचा भाग लागतो. त्याच्या बहुतेक भागांत कंब्रिअन् पर्वत पसरला आहे; हा भाग जवळ जवळ माळरानच असल्यामुळें, वस्ती अगदीं तुरळक व तीहि धनगरांची आहे. दक्षिणेकडे ब्रिस्ट्ल् चॅनलच्या जवळच्या भागांत मात्र उत्तम प्रकारच्या कोळशाच्या खाणी असल्यामुळें, त्या भागांत अतिशय वस्ती

झाली आहे. कार्डिफ् व ब्रिस्ट्ल् हीं या भागांतील दोन महत्त्वाचीं बंदरें आहेत.

आयर्लंडची बांधणी कांहींशी स्काट्लंडप्रमाणें तर कांहींशीं इंग्लडप्रमाणें आहे. त्याचा किनारा—विशेषतः पश्चिम किनारा—स्कॉट्लंडच्या किनाऱ्याप्रमाणें दंतुर असून त्याच्या पश्चिम बाजूला पुष्कळशीं लहान लहान बेटें, आखातें व सामुद्रधुन्या आहेत. तसेंच येथें स्कॉट्लंडप्रमाणें डोंगरांच्या रांगा व मधून मधून सुंदर सरोवरेंहि आहेत. सभोंवार चारी बाजूंनीं डोंगर असल्यामुळें मधला भाग साहजिकच बशीप्रमाणें खोलगट बनला असून त्यांत बऱ्याचश्या नद्या वाहतात. नद्यांना जोडून मध्यंतरीं कांहीं कालवेहि काढले आहेत. मधून मधून मोठमोठे खांचखळगे झाले असून त्यांतील दलदलींत आज शेंकडों वर्षें झाडपाला, गवत, लव्हाळें वगैरे कुजून त्यापासून एक प्रकारचा रांधा तयार झाला आहे. हा रांधा उपसून वाळविला म्हणजे त्याचें राशीवारी 'पीट' बनतें. या पीटचा जळण्याचे कामीं चांगला उपयोग होत असल्यामुळें या भागांत जळाऊ लांकडें व कोळसा यांची वाण फारशी भासत नाहीं. अशाप्रकारें आयर्लंडमध्यें कुरणें दलदलीच्या जागा, सरोवरें, पर्वत वगैरे सर्व कांहीं आहे. तेथील बहुतेक लोक गुरेंढोरें पाळून व शेती करूनच आपली उपजीविका करतात. तेथें कारखाने वगैरे फारसे नाहींतच.

ब्रिटिश बेटांत नद्या किती, कोणत्या, त्या किती लांब आहेत, त्यांचे कांठीं कोणतीं शहरें व मुखांशीं कोणतीं बंदरें आहेत वगैरे गोष्टी नकाशावरून सहज समजण्यासारख्या आहेत. त्या नद्यांसंबंधीं सामान्यतः असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानांतील नद्यांचे मानानें त्या फारच लहान आहेत. इंग्लंड, स्कॉट्लंड व आयर्लंड यांमधील टेम्स्, टे, व शानन् या सर्वांत मोठ्या नद्या घेतल्या व त्यांच्या

लांबीची बेरीज केली तरीसुद्धां ती ५०० मैलांपेक्षां जास्त भरत नाहीं ! हिंदुस्थानांत फार मोठ्यांत न मोडणारी नर्मदा घेतली तरी ती एकटीहि या तिघींपेक्षां जास्त लांब आहे. तेथील नद्या इतक्या लहान असल्या तरी आपलेकडील नद्यांप्रमाणें त्या कधींहि आटत नाहींत. कारण ब्रिटिश बेटांतील उन्हाळा हिंदुस्थानांतील उन्हाळ्याइतका कडक नसतो. हिंदुस्थानांतील नद्यांचा एकाच तऱ्हेनें आपणांस उपयोग होतो; आणि तो म्हणजे शेतमळे किंवा बागाईत शिंपण्याकडे. परंतु ब्रिटिश बेटांत बाराहि महिने थोडथोडा पाऊस पडत असल्यामुळें बागाइताकरितां नद्यांवर अवलंबून बसावें लागत नाहीं. म्हणून पाणी शेतांत आणण्याऐवजीं जादा पाण्याचा शेतांतून निचरा करणें हेंच काम मुख्यतः नद्या करतात. तिकडील नद्यांसंबंधींची दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचीं मुखें. मोठमोठीं जहाजें भरतीचे पाण्याबरोबर आंतपर्यंत नेण्याचे कामीं या मुखांचा कसा उपयोग होतो हें आपण मागें पाहिलेंच आहे.

हिंदुस्थानांत विषुववृत्तापासून सर्वांत जास्त दूर असा प्रांत म्हणजे काश्मीर; परंतु ब्रिटिश बेटें तर काश्मीरचेहि उत्तरेस १५ अक्षांशांवर आहेत. यावरून तिकडे उष्णता अतिशय कमी असावयास पाहिजे होती. परंतु त्यांच्या पश्चिम अंगाचे समुद्रांत गल्फस्ट्रीम नांवाचा एक उष्ण प्रवाह वाहात असल्यामुळें थंडीचें एकंदर प्रमाण बरेंच कमी झालें आहे. तसेंच हिंदुस्थानांतील बहुतेक भाग समुद्रकिनाऱ्यापासून फारच दूर असल्यामुळें तेथें उन्हाळा व हिंवाळा यांतील हवेंत अतिशय मोठा फरक भासतो. याचें उलट ब्रिटिश बेटांतील कोणत्याहि भागापासून समुद्र फारसा दूर नसल्यामुळें तेथील उन्हाळी हवेंत व हिंवाळी हवेंत फारसा फरक कधींच पडत नाहीं. उन्हाळ्यांत अंगाला चटके बसून जीव हैराण होत नाहीं,

किंवा हिंवाळ्यांत थंडी कडक असली तरी तेथें युरोपांतील दुसऱ्या कांहीं भागांप्रामाणें महिनेन्‌महिने बर्फ पडलें आहे असें होत नाहीं.

उन्हाळ्यांतील किंवा हिंवाळ्यांतील हवामानांत जरी फारसा फरक पडत नाहीं, तरी रोजच्या हवेंत मात्र घटकोघटकीं बदल होतो. घटकेंत छान ऊन पडलेलें व आकाश अगदीं निरभ्र असावें, तों घटकेंत ढग येऊन पाऊस पडायालाहि सुरुवात व्हावी ! ऊन्ह, ढग, वारे, पाऊस, धुकें, बर्फ हीं केव्हां येतील व केव्हां जातील हें कांहींच निश्चित सांगतां येत नाहीं; आणि म्हणूनच उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा ह्या तिन्ही काळांत लागणारे कपडे, सर्व प्रकारचे बूट, टोप्या, काठ्या, छत्र्या, गरम कोट, रेनकोट, वगैरे सर्व कांहीं बाराहि महिने जय्यत ठेवावें लागतें. पुष्कळ वेळां बाहेर फिरावयास जातांना उन्हाकरितां घतलेल्या छत्रीचा उपयोग पाऊस निवारण्याचें कामीं होतो ! साहेब लोकांना निरनिराळ्या प्रकारचे व पुष्कळ कपडे लागतात, व आपलें थोड्याच व एकाच जातीच्या कपड्यांवर भागतें याचें कारण देशादेशांतील हवा हें होय.

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांना एकच चिंता असते; व ती ही कीं, 'पाऊसराजा' दगा देऊन 'बैल भुका' होणार नाहीं ना. ब्रिटिश बेटांतील शेतकऱ्यांचे डोळे पावसाकडे लागलेले नसतात; कारण तो पुरेसा पडावयाचाच. त्यांना काळजी वाटत असते ती उन्हासंबंधीं. ऊन चांगलें पडलें नाहीं, आणि ढग येऊन मळभ आलें कीं त्याचें सर्वच आटोपलें ! आपलेकडे पाऊस न पडल्यामुळें पिकें करपून मरतात, तर तिकडे तीं ऊन्ह न पडल्यामुळें गारठून ठार होतात.

ब्रिटिश बेटांच्या सभोंवतीं समुद्र असल्यामुळें, कोणत्याहि दिशेनें वारा आला, तरी तो आपले बरोबर नेहमींच वाफ घेऊन येतो; आणि आपली सर्व भिस्त जशी नैर्ऋत्येकडील मॉन्सून वाऱ्यांवरच असते

तशी तिकडे नसते. तथापि त्यांतल्यात्यांत पश्चिम व नैर्ऋत्य दिशांकडून अॅट्लांटिक मार्गें येणारे वारे आपलेबरोबर उष्णता व वाफ हीं दोन्हीहि घेऊन येत असल्यामुळें त्यांना जास्त महत्त्व प्राप्त झालें आहे. ब्रिटिश बेटांचा पश्चिमेकडील भाग या वाऱ्यांच्या तोंडाशींच येत असल्यामुळें त्याला इतर भागांचे मानानें केव्हांहि जास्त पाऊस मिळतो.

पाऊस आणणेचे कामीं या वाऱ्यांचा जसा जास्त उपयोग होतो तसाच त्यांचा ब्रिटिश बेटांची हवा हिंवाळ्यांत उबदार ठेवण्याचे कामींहि उपयोग होतो. वास्तविक ब्रिटिश बेटें व यूरोपमधील स्वीडन्, जर्मनी, दक्षिण रशिया हे सर्व देश ५० ते ६० अक्षांशांचे दरम्यान म्हणजे हवेच्या एकाच पट्ट्यांत आहेत. परंतु हे बाकीचे देश अट्लँटिक वरून येणाऱ्या वाऱ्याचे टापूंत येत नसल्यामुळें, आणि त्यांना समुद्रही ब्रिटिश बेटांइतका जवळ नसल्यामुळें, या देशांत हिंवाळ्यामध्यें थंडीचा जितका कडका पडतो तितका ब्रिटिश बेटांत पडत नाहीं. ब्रिटिश बेटांत पहिल्यांदांच गेलेल्या नवख्या हिंदी माणसाला तेथील हवेचें हें गौडबंगाल कांहींच समजत नाहीं. हिंदुस्थानांत कोणत्या दिवसांत कोणती हवा पडावयाची, व त्याकरितां काय तरतूद करावयाची हें अगदीं ठरलेलें असतें. अर्थात् तिकडेहि हिंवाळ्यांत उन्हाळ्यापेक्षां जास्त थंडी पडायाची, किंवा उन्हाळ्यांत हिंवाळ्यापेक्षां जास्त उष्णता असावयाची हें सामान्यतः ठरलेलें असतें. तथापि हिंवाळ्यांत कितीतरी दिवस चांगले उबदार व बर्फाशिवाय जातात, तर उन्हाळ्यांत कितीतरी वेळां आठवडा आठवडासुद्धां सूर्य फारसा वर आलेला दिसत नाहीं; व ढग जमा होऊन पाऊस पडावयाला लागतो. थोडक्यांत सांगायचें म्हणजे, ब्रिटिश बेटांतील हवामान हिंदुस्थानांतील हवामानाप्रमाणें

मॉन्सून वाऱ्यांवर अवलंबून नसून तें हवेच्या कमजास्त दाबावर व त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या वाऱ्यांवर अवलंबून असतें. आणि हवेचा हा दाब कमी आहे का जास्त आहे हें बॅरोमीटर यंत्रानें समजत असल्यामुळें पुष्कळशा घरांतून व सार्वजनिक जागांतून अशीं हवा मोजण्याचीं यंत्रें ठेविलेलीं असतात. घरांतून बाहेर पडतांना बॅरोमीटर पाहून व त्याप्रमाणें तरतूद करून पडावयाचें असा तेथील लोकांचा रिवाज असतो.

असल्या या बदलत्या हवेचा एक उपयोग तेथील लोकांच्या मनाला व शरीराला एक प्रकारची तरतरी व हुशारी आणण्याकडे होत असावा; तेथील लोकांना स्वीडन्, नॉर्वे, रशिया वगैरे शीतकटिबंधांतील देशांतल्या लोकांप्रमाणें अर्धें अधिक वर्ष थंडीनें कुडकुडत बसावें लागत नाहीं, किंवा हिंदुस्थान, ईजिप्त वगैरे उष्ण कटिबंधांतील देशांत राहणाऱ्या लोकांप्रमाणें उन्हानें हुश्श हुश्श करीत तगमगत पडावें लागत नाहीं. बदलणाऱ्या हवेनुरूप त्यांच्या रोजच्या जीवनक्रमांतहि बदल होत असतो; व त्यामुळें त्याच त्याच गोष्टींनीं येणारा कंटाळा व एकच एकपणा नाहींसा होऊन जीवितांत वैचित्र्य आणि म्हणूनच काव्य व आनंद हीं उत्पन्न होतात.

पूर्वीं एकेकाळीं ब्रिटिश बेटांत तेथील दमट हवेमुळें जिकडे तिकडे पाईन्, ओक, बीच वगैरे वृक्षांचीं मोठमोठीं जंगलें होतीं. परंतु आतां तीं पार तोडून टाकून बहुतेक जागा साफ करण्यांत आली आहे. हल्लीं शेंकडा ५ टक्के भागांत फारतर अशा प्रकारचीं झाडें लावण्यांत येतात. घरें, जहाजें, वगैरेंना लागणारें बहुतेक सर्व लांकूड परदेशांतून आणावें लागतें. हिंदुस्थान, ब्रह्मदेश वगैरे उष्ण कटिबंधांतील देशांत मनुष्याच्या जीविताला उपयोगी पडतील असे वनस्पति सहा-सात हजार फूट उंचीच्या प्रदेशावरहि होऊं शकतात;

परंतु ब्रिटिश बेटांतील पांच-सहाशें फुटांवरील प्रदेशहि भाजीपाला किंवा धान्यधून्य करण्याचे दृष्टीनें नालायक ठरतो; आणि म्हणून स्कॉट्लंड आयर्लंड व वेल्स यांतील मोठेमोठे भाग व इंग्लंडचाहि बराचसा भाग यांत गायरानें व कुरणें यांशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. हिंदुस्थानहि ब्रिटिश बेटांचे अक्षांशांमध्येंच असतें तर दक्षिण हिंदुस्थानच्या बहुतेक भागांतहि कांटेरी झुडपें, व चरबरीत गवत यांशिवाय दुसरें कांहींच उगवलें नसतें; व आतांप्रमाणें तो भाग धनधान्यसमृद्ध न राहून, तेथील लोकवस्तीहि बरीच कमी झाली असती. हिंदुस्थानांतील लोकसंख्या फार मोठी असल्यामुळें, व त्यांपैकीं बहुतेक लोक शाकाहारीच असल्यामुळें, बहुतेक जमीनींत मनुष्याला लागणारें शाकान्न–निरनिराळीं धान्यें, कंद, मुळें, फळें वगैरे–उत्पन्न करण्यांत येतें. परंतु ब्रिटिश बेटांतील लोक गाई, बैल, मेंढ्या, डुकरें वगैरे प्राण्यांचे मांसावर आपली बरीचशी उपजीविका करीत असल्यामुळें, बहुतेक जमीनींत मनुष्याला लागणारें धान्य उत्पन्न करण्यांऐवजीं त्या प्राण्यांना उपयोगी पडतील अशीं धान्यें व गवत ते उत्पन्न करतात. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे; म्हणजे आपणांला लागणारें सर्व प्रकारचें धान्य आपण येथेंच पिकवितों. परंतु ब्रिटिश बेटें हिंदुस्थानाप्रमाणें कृषिप्रधान नाहींत. इंग्लंड, स्कॉट्लंडमधील बऱ्याचशा शहरांतून लोक गिरण्या, कारखाने वगैरेंत काम करून आपली उपजीविका करतात; ब्रिटिश लोकांना लागणारीं सर्वप्रकारचीं धान्यें, भाजीपाला, व फळफळावळ हीं साम्राज्यांतील इतर भागांतून किंवा परदेशांतून येतात. हे सर्व पदार्थ त्या त्या देशांनीं ब्रिटिश बेटांना पाठविण्याचें बंद केल्यास ब्रिटिश लोकांची धडगत होणार नाहीं. आणि म्हणूनच गेल्या महायुद्धांत ब्रिटिश लोकांना हे पदार्थ मिळूं नयेत, व त्यांची

उपासमार होऊन ते आपल्याला शरण यावेत म्हणून जर्मनीनें हे पदार्थ आणणारीं जहाजें बुडविण्याचा सपाटा चालविला होता. ब्रह्मदेश ब्रिटिश बेटांना तांदूळ पुरवितो, तर उत्तर हिंदुस्थान गहूं पुरवितो; आसाम व सीलोन त्यांना चहा पाठवितात, तर कॅनडा व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें त्यांना गहूं व गुरें पाठवितात; वेस्ट इंडीज व जाव्हा त्यांना साखर देतात; तर इटली व फ्रान्स वगैरे भूमध्यसमुद्राचे कांठचे देश त्यांना फळें पुरवितात; फ्रान्स दारू पाठवितें, तर हॉलंड व देन्मार्क त्यांना अंडीं, लोणी, चीज, भाजीपाला वगैरे पदार्थांचा पुरवठा करतात. कितीतरी देश आपल्या खाण्यापिण्याची बडदास्त ठेवतात म्हणून ब्रिटिश बेटांतील अगदीं सामान्य माणसाला सुद्धां मोठा अभिमान वाटतो. या परावलंबी जीविताचा आपणां हिंदी माणसांना हल्लींच्या स्थितींत अभिमान न वाटतां उलट तें अपमानास्पदच वाटेल ही गोष्ट निराळी.

ब्रिटिश लोकांचा भर शेतीपेक्षां कारखाने व उद्योगधंदे यांवरच जास्त असला तरी शेतीकडे ते अगदींच दुर्लक्ष करतात असें नाहीं. ज्या ज्या भागांत शेती होऊं शकते त्या त्या भागाची निगा उत्तम प्रकारें ते राखतात. बहुतेक सर्व घरांना बागा असून त्यांत फुलझाडें, फळझाडें व भाजीपाला हीं लावलेलीं असतात. सर्व काळीं व सर्वत्र होणारें पीक म्हणजे गवत. त्याला लागणारी दमट हवा व पाऊस हीं तर तेथें बारमहा असतातच. कपाशी व भात यांना जसें धुकें बाधतें तसें तें गवताला बाधत नाहीं. शिवाय फारसें ऊन्ह नसलें तरी गवताचें कांहीं अडत नाहीं. ब्रिटिश बेटांत प्रत्यक्ष शेतीखालीं लागवडीस आणलेला भाग सोडला तर हिरवेंगार गवत सगळीकडे व सर्वकाळीं कसें दृष्टीस पडतें याचें हिंदी माणसाला मोठें नवल वाटतें. अन्नासाठीं ब्रिटिश लोक गवतावर

अवलंबून राहातात हें थोडेंसें थट्टेचें वाटेल; पण वस्तुस्थितीच तशी आहे. कारण गुरांढोरांचे व शेळ्यामेंढ्यांचे कळप या गवतावर पोसतात, व या प्राण्यांचे मांसावर, व दूध, लोणी वगैरे पौष्टिक पदार्थांवर ब्रिटिश लोक पोसले जातात.

गवताला अशा रीतानें अतिशय महत्त्व आल्यामुळें त्याची उत्तम प्रकारची पैदास करण्याकरितां ब्रिटिश लोकांचे शिकस्तीचे प्रयत्न चालतात. हिंदुस्थानांतील बैलाला दिवसभर फिरून जितकें चरायला मिळणार नाहीं, तितकें तिकडे एकाद्या लहानशा चौखंड्यांत मिळेल. गवत उत्तम असल्यामुळें त्यावर पोसणारीं जनावरेंहि जगांत उत्तम प्रतीचीं म्हणून नांवाजलेलीं असतात. तिकडील गाई हिंदुस्थानांतील गायींच्या चौपट पांचपट दूध देतात; व तिकडील मेंढ्याहि पुष्कळ व चांगल्या प्रकारची लोंकर देतात. नांगर, गाड्या वगैरे ओढण्याचें काम घोड्यांवरच सोंपविलें असल्यामुळें गायी-बैलांची इतर रीतीनेंहि आबाळ होत नाहीं.

ब्रिटिश बेटांतील हवा अतिशय थंड असल्यामुळें तेथें तांदूळ, मका, जोंधळा वगैरे पिकणें शक्यच नाहीं. इंग्लंडच्या पूर्वभागांतील हवा त्यांतल्यात्यांत उष्ण व कोरडी असल्यामुळें बहुतेक सर्व गहूं तेथेंच पिकतो. गुरांना चारा व माणसांना धान्य या दोन्ही दृष्टींनीं ओट या धान्याचा उपयोग होतो. बार्लीची दारू गाळतात. सर्व प्रकारची शेतजमीन धरली तरी सुद्धां ती ब्रिटिश बेटांच्या एकंदर जमीनीच्या एक पंचमांश भागापेक्षां जास्त भरणार नाहीं. प्रत्येक शेतांत बटाट्याचें पीक हें व्हावयाचेंच; कारण बहुतेक सर्व लोकांची गुजराण त्यावरच चालते. बटाटे व सलगम यांशिवाय इतर फळेंहि तिकडे बरींच होतात. वर्षांतील आठ महिने तीं ताजीं मिळूं शकतात. हिंवाळ्यांत तीं ताज़ीं मिळणें शक्य नसतें; पण त्याहि दिवसांत

तीं खावयाला मिळावीं म्हणून तीं साखरेच्या पाकांत पाकवून ठेवितात.

ब्रिटिश बेटें इतर देशांपासून काय काय घेतात हें आपण मागें पाहिलेंच. कोणताहि मनुष्य किंवा देश इतरांपासून नुसतें घेतच सुटेल, व स्वत: उलट कांहींच देत नसेल तर त्या मनुष्याचें किंवा देशाचें जगांत कधींच चालावयाचें नाहीं; म्हणून जो तो मनुष्य किंवा देश आपण इतरांपासून घेतों तितकें तरी इतरांना परत देण्याचा प्रयत्न करीत असतो. ब्रिटिश बेटें जगांतील इतर देशांपासून कच्चा माल घेतात, तर त्यांस उलट पक्का माल देतात. कच्च्या मालाचा पक्का माल करण्याकरितां यंत्रें व तीं चालविण्याकरितां शक्ति पाहिजे. यंत्रें लोखंडाचीं होतात, व तीं चालविण्याला लागणारी वाफ कोळशामुळें मिळते; आणि म्हणून लोखंड व कोळसा हे दोन पदार्थ ब्रिटिश बेटांत विपुल सांपडत असल्यामुळें तीं बेटें सबंध जगांत पक्क्या मालाचें सर्वांत मोठें आगर होऊन राहिलीं आहेत.

हिंदुस्थानांत १० पैकीं ७ लोक आपापल्या खेड्यांतून शेती करून उपजीविका करतात, तर ब्रिटिश बेटांत १० पैकीं ७ लोक शहरांतून राहतात; व तेथील कारखान्यांतून कामें करून उपजीविका करतात. हें स्थित्यंतर होण्याचीं दोनच कारणें, आणि तीं म्हणजे कोळसा व लोखंड हीं होत. हिंदुस्थानांत लोकवस्ती कोठें कोठें जास्त आहे हें पहावयाचें झाल्यास आपण नद्या व त्यांचीं सुपीक खोरीं यांकडे वळतों. ब्रिटिश बेटांत विशेष वस्ती कोठें आहे हें पाहण्याकरतां आपल्याला लोखंडाच्या व कोळशाच्या टापूंकडे पहावें लागेल. हिंदुस्थानांत पावसाच्या व पिकांच्या नकाशांना जास्त महत्त्व येतें, तर ब्रिटिश बेटांत कोळशाचा व लोखंडाचा प्रांत दाखविणाऱ्या नकाशांना जास्त महत्त्व आहे. त्यांतल्या त्यांत

कोळसाच जास्त महत्त्वाचा गणला जातो. कारण अशुद्ध लोखंड गाळून तें शुद्ध करण्याकरितां कोळसाच लागतो; आणि म्हणून ब्रिटिश लोक कोळशाला ' किंग् कोल ' किंवा 'अंगार राजा' अशी मोठी बहुमानाची पदवी देतात.

लाख-लाख टन कोळसा दरवर्षी पुरविणारे टापू ब्रिटिश बेटांत चांगले २०-२५ असतील; परंतु त्यांतल्यात्यांत साऊथ् वेल्स, नॉर्दंबर्लंड्, डरहॅम्, यॉर्कशर, नॉटिंगहॅमशर, लँकॅशर आणि लॅनॉर्क वगैरे पांच-सहा टापूंत १॥ ते ४॥ कोटी टनांचे दरम्यान कोळसा निघतो. या प्रत्येक टापूंत कापूस, लोंकर, रेशीम, तांबें, कांच, कांतडीं, कागद, रबर, रंग, लांकूड, वगैरेपैकीं कोणता ना कोणता कच्चा मालहि तेथल्या तेथेंच उत्पन्न करण्याची किंवा बाहेरून आणण्याची सोय केली असल्यानें कोळशाच्या खाणींभोंवतींच इतर गिरण्या, कारखाने व फॅक्टरी निघाल्या आहेत. आणि अर्थातच या सर्वांचेभोंवतीं तेथें काम करणारा मजूरवर्ग गोळा झाला आहे. अशा प्रकारें कोळशाचे टापू हेच सर्व उद्योगधंद्यांच्या जागा बनून तेच लोकवस्तीचीं केंद्रेंहि बनले आहेत. कोळसा कसा काढतात,कोणत्या टापूंत कोणता धंदा विशेष चालतो, त्या त्या टापूंत विशेष महत्त्वाचीं ठिकाणें कोणतीं, तेथील कामकरीवर्गाचा जीवनक्रम सामान्यतः कशा प्रकारचा असतो, यासंबंधींची माहिती पुढें येईलच. येथें येवढेंच सांगावयाचं होतें कीं, ब्रिटिश बेटें हीं मुख्यतः कारखान्यांचा व पक्का माल बनविणारा देश असून त्यांना आज जगांत जें महत्त्व आलें आहे त्याचें एक मुख्य कारण हें आहे.

ब्रिटिश बेटें हें फक्त पक्का माल तयार करणारें राष्ट्र आहे असें नसून तें व्यापारी राष्ट्रहि आहे. म्हणजे मालाची ने-आण करणारीं मोठमोठीं ज़हाजें त्यांच्यापाशीं जितकीं आहेत तितकीं इतर

कोणत्याहि देशापाशीं नाहींत. तसेंच ब्रिटिश किनाऱ्यावरील बंदरेंहि पुष्कळ असून तीं व्यापाराला सर्व प्रकारें सोइस्कर अशीं आहेत. हिंदुस्थानचा एवढा मोठा किनारा, परंतु त्यावर ५।६ बंदरांपेक्षां जास्त चांगलीं बंदरें नाहींत. उलट ब्रिटिश बेटांच्या येवढ्याशा किनाऱ्यावर कितीतरी बंदरें आहेत हें आपण मागें पाहिलेलें आहेच. त्यांपैकीं कांहीं नद्यांचे व खाड्यांचे तोंडांशीं, कांहीं आखातांचे कांठीं, व कांहीं अगदीं उघड्या समुद्रावर असून प्रत्येक बंदरावर मोठमोठ्या जहाजांना उभें राहण्यास पुरेल इतकें खोल पाणी, व वाऱ्यापासून निवारण होईल असा आडोसा आहे. शिवाय प्रत्येकाचे पाठीशीं परदेशीं पाठविण्यासारखा पक्का माल तयार करणारे कारखाने असून तोंडाशीं तो तो माल घेणारे देश आहेत. उदाहरणार्थ पूर्वकिनाऱ्यावरील बंदरें नॉर्वे, स्वीडन्, रशिया, जर्मनी, बेल्जम, हॉलंड वगैरे देशांशीं व्यापार करतात, तर दक्षिणकिनाऱ्यावरील बंदरें फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, वगैरेशीं व्यापार करतात. पहिल्यापहिल्यांदा जेव्हां ब्रिटिश बेटांचा सर्व व्यापार मुख्यतः यूरोप खंडाशींच चालत असे, तेव्हां या बंदरांना विशेष महत्त्व असे. परंतु पुढें हिंदुस्थान, चीन वगैरे देशांशीं दळणवळण सुरू होऊन त्यांच्यांशीं व्यापार वाढला, व विशेषतः पश्चिमेकडे अमेरिकाखंडाचा शोध लागला, तेव्हांपासून पश्चिम किनाऱ्यावरील बंदरें विशेष भरभराटीस आलीं. ब्रिस्टल्, कार्डिफ्, लिव्हरपूल, ग्लास्गो हीं अशा प्रकारचीं बंदरें होत. उत्तर किनाऱ्यावरील बंदरांना महत्त्व येणें शक्य नाहीं. एकतर त्यांच्यासमोर यूरोप, आशिया, अमेरिका यांच्यासारख्या व्यापारी पेठा नाहींत, व दुसरें असें कीं त्यांच्या पाठीशीं कच्चा माल पिकविणारे प्रांत नाहींत, किंवा पक्का माल बनविणारे कारखानेहि नाहींत. सर्व प्रांत डोंगराळ असल्यामुळें तेथें कांहीं पिकत


नाहीं, व डोंगरांतहि इतर डोंगरांतल्याप्रमाणें कोळशा-लोखंडाच्या खाणी नाहींत.

दक्षिण किनाऱ्यावर प्लिमथ्, साउदॅम्टन् व डोव्हर हीं विशेष महत्त्वाचीं आहेत. कारण तीं लंडन व युरोपमधील देशांना अत्यंत जवळचीं आहेत. शिवाय यूरोप व हिंदुस्थान यांचे दरम्यान ये-जा करणाऱ्या उतारूंची रहदारी व रोजच्या खाद्यपेयांची आयात याच बंदरांतून चालते. ब्रिस्टल् चॅनल्वर ब्रिस्टल् हें महत्त्वाचें असून संयुक्त संस्थानें, दक्षिण अमेरिका, वेस्ट् इंडिज् वगैरेशीं होणारा सर्व व्यापार या बंदरांतून चालतो. वेस्ट इंडिज्मधून तंबाखू, साखर, कोको, केळीं, वगैरे येणारे सर्व पदार्थ व उत्तर अमेरिका व अर्जेंटाईन्मधून येणारें धान्य याच बंदरांत प्रथम येतें. वेल्सूचे दक्षिण किनाऱ्यावर कार्डिफ् व स्वान्झी हीं बंदरें विशेष महत्त्वाचीं आहेत. कार्डिफ्च्या कोळशाचा धूर मुळींच होत नसल्यामुळें येथील कोळशाला जगांत अतिशय मोठी मागणी असते. स्वान्झी हें सर्व प्रकारच्या लोखंडी व जस्ती पत्र्यांबद्दल प्रसिद्ध असून ब्रिटिश बेटांतील तीनचतुर्थांश पत्रा त्या एकट्या गांवीं होतो. तसेंच स्वांझी येथें अशुद्ध तेल शुद्ध करण्याचे कारखानेहि पुष्कळ असल्यामुळें तेथें तेलाचा व्यापार बराच चालतो. मर्सीचे मुखावरील लिव्हर्पूल हें तर इंग्लंडच्या व्यापाराचा दिल्लीदरवाजाच होय.त्याच्या आसपास बरींचशीं शहरें व हजारों कारखाने आणि गिरण्या आहेत. कारखान्यांना लागणारा कच्चा माल—कापूस, लोंकर, कातडीं, लांकूड वगैरे—व माणसांना लागणारे खाण्याचे पदार्थ याच बंदरांतून येतात, व सूत, कापड, यंत्रें, मातीचीं भांडीं, सर्व प्रकारच्या कापडी व कांतडी जिनसा याच बंदरांतून बाहेर जातात. लिव्हर्पूल व मॅंचेस्टर यांमध्यें एक कालवा खणला असल्यामुळें मॅंचेस्टरला तयार होणारें

सर्व कापड याच बंदरांतून जातें. पश्चिम किनाऱ्यावर आणखी एक महत्त्वाचें बंदर म्हणजे ग्लास्गो. हें स्कॉट्लंडमधील अत्यंत सुपीक व लोकवस्तीच्या प्रदेशाचे तोंडीं असल्यामुळें त्या बंदरांतूनहि बराच मोठा व्यापार चालतो. स्कॉट्लंड्चे पूर्वकिनाऱ्यावर पर्थ व टे नद्यांचे मुखांशीं लीथ व डंडी हीं बंदरें आहेत. कलकत्त्याचा सर्व ताग डंडीलाच येत असून तागाचें सर्व कापड तेथें तयार होतें. वर उत्तरेस ॲबर्डीन् हें बंदर व्यापाराचे दृष्टीनें महत्त्वाचें नसलें तरी तेथें मासा इतका सांपडतो कीं, या बंदरांतून शेंकडों मच्छिमारी जहाजांची रहदारी सारखी सुरू असते. पूर्व किनाऱ्यावर टाईन्चे मुखाशीं असलेलें न्यूकॅसल् बरेंच मोठें बंदर असून तेथून जहाजांवारी कोळसा दररोज खुद्द लंडनला व पोर्टसय्यद, एडन्, कोलंबो वगैरे आपलेकडील बंदरांना येतो. हंबरच्या मुखावरचें हल् विशेषतः चरबी, तेल, वाख वगैरेच्या व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक गळिताचीं धान्यें येथेंच येऊन त्यांचें तेल व पेंड हीं बनतात. लोंकरीच्या कापडाचें आगर जें लीड्स् तें या बंदराला अगदीं जवळचें असल्यामुळें ऑस्ट्रेलियांतून येणारी लोंकर याच बंदरांतून येते, व लीडस्ला तयार झालेलें लोंकरीचें कापड याच बंदरांतून बाहेर जातें. पूर्वकिनाऱ्यावरील आणखी एक महत्त्वाचें बंदर म्हणजे खुद्द लंडन् हें होय. परंतु त्यासंबंधींची सर्व माहिती आपणांस अगोदर झालीच आहे.

आयर्लंडमध्यें पक्का माल बनविणाऱ्या कारखान्यांपेक्षां शेतीच जास्त असल्यामुळें त्याचा इतर परदेशांशीं फारसा व्यापार चालत नाहीं. परंतु खुद्द इंग्लंड व स्कॉट्लंड या देशांना लागणारीं सर्व गुरेंढोरें, डुकरें, लोणी, अंडीं, चीज वगैरे याच देशांतून जातात. हा सर्व माल ईशान्येकडील बेलफास्ट बंदरांतून तिकडे जातो. मोठ-

ब्रिटिश बेटांत दुसऱ्या देशांतून येणारा माल
खाण्यापिण्याचे पदार्थ




गहूं, चहा, साखर, लोणी, अंडीं, बटाटे, दारू, तांदूळ, गोमांस, कोको, डब्यांतून येणारें मांस, सागुती, मासे, सिगारेट, तंबाकू, डुकराचें मांस.

कच्चा माल



तेल, लोखंड, तांबें, शिसें, जस्त इत्यादि धातु, इमारतीलांकूड, लोकर वाख, हॉपचीं फुलें, रेशीम, कातडीं कापूस.


पक्का माल



मोठीं घड्याळें, कागद, बूट, टोप्या, लहान घड्याळें, माल, इतर किरकोळ माल औषधी व रासायनिक द्रव्यें.

ब्रिटिश बेटांतून परदेशीं जाणारा माल

पक्का माल



कापसाचें कापड, सूत, तागाचें कापड, यंत्रें, रूळ, पत्रे, लोखंडी भांडीं, चाकू-कात्र्या, औषधी व रासायनिक द्रव्यें, तोफा, बंदुका, सायकली, पुस्तकें, इतर किरकोळ.

कच्चा माल



मासे, कोळसा, लोकर.

मोठीं जहाजें बांधण्याचें कामहि याच बंदरांत चालतें. तसेंच बेल्जम्-मधील ताग व अंबाडी बेलफास्ट बंदरींच येत असून दोर, सोल, सुतळी वगैरे तागाचा माल येथें जितका होतो तितका जगांत दुसरीकडे कोठेंच होत नाहीं. आयर्लंड्ची राजधानी डब्लिन् हें त्याच्याच समोर असलेल्या लिव्हर्पूल बंदराशीं व्यापार करतें. दक्षिणचे बाजूला कॉर्क् हें बंदर असून अमेरिकेंतून येणाऱ्या डाकबोटी याच बंदराला लागतात. सर्व टपाल प्रथम येथें उतरून नंतर तें डब्लिन्ला जातें.

वरील बंदरांशिवाय आणखी शेंकडों बंदरें ब्रिटिश किनाऱ्यावर पसरलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं व्यापाराकरितां, कांहीं कारखान्यांकरितां, कांहीं मच्छिमारीकरितां, व कांहीं हवा खाण्याचीं व स्नानाचीं ठिकाणें म्हणून प्रसिद्ध आहेत; परंतु सर्वांचा विचार करणें शक्य व जरूरीचेंहि नसल्यामुळें फक्त महत्त्वामहत्त्वाच्या बंदरांचाच विचार आपण आतांपर्यंत केला.

ब्रिटिश बेटांतील आयात व निर्यात मालासंबंधीं उल्लेख वर वेळोवेळीं आलेलाच आहे. त्यासंबंधीं एकदम व स्पष्ट कल्पना यावीं म्हणून मागील पानांवर तो चित्ररूपानें दाखविला आहे. हिंदुस्थान खाण्याचे पदार्थ व इतर कच्चा माल परदेशीं पाठवून पक्का माल बाहेरदेशांहून आणवतें, तर ब्रिटिश बेटें पक्का माल बाहेर पाठवून खाण्याचे पदार्थ व पक्क्या मालाला लागणारा कच्चा माल बाहेरून आणवतात. अशा प्रकारें गहूं, मांस, मासे, फळफळावळ भाजीपाला, साखर, चहा, कॉफी, कोको, दारू, तंबाखू वगैरे रोज खाण्यापिण्याला लागणारे सर्व पदार्थ परदेशांतून येतात. तसेंच, कापूस, लोकर, ताग, रेशीम, लांकूड, कांतडीं, रबर व सोनें, रुपें, तांबें, कथील, निकल, मँगनीज वगैरे धातु हेहि पदार्थ परदेशांतूनच आणावे लागतात.

उलट कापूस, लोकर, ताग यांचें कापड व कपडे, सर्व प्रकारच्या धातूंच्या निरनिराळ्या जिनसा, एंजिनें, निरनिराळ्या प्रकारचीं लहान-मोठीं यंत्रें, लोखंडी व पोलादी जहाजें, केक्, बिस्किटें वगैरे गव्हाचे पदार्थ, निरनिराळीं मद्यें, व सर्वांत विशेष महत्त्वाचा पदार्थ म्हणजे कोळसा इत्यादि माल ब्रिटिश बेटांतून बाहेर रवाना होतो. हा सर्व माल जगांतील सर्व भागांत जातो, व तोहि इतक्या मोठ्या प्रमाणांत रवाना होतो कीं, व्यापारी व्यवहारांत ब्रिटिश बेटें कधीं ऋणको नसून तीं नेहमीं धनकोच असतात.

ब्रिटिश बेटांतील लोक, त्यांचे उद्योगधंदे, त्यांची दिनचर्या, त्यांचीं करमणुकीचीं साधनें, त्यांची राहणी वगैरे बाबी डोंगर, नद्या, हवापाणी, पिकें, बंदरें वगैरे गोष्टींपेक्षां बऱ्याच महत्त्वाच्या असल्यामुळें त्यांचा विचार याच भागांत न करतां पुढें स्वतंत्रपणें करणेंच बरें.

विचाराकरितां प्रश्न

प्रकरण ४ थें

१ हिंदुस्थान व ब्रिटिश बेटें यांच्या किनाऱ्यांची साम्य व फरक या दोन्ही दृष्टींनीं तुलना करा. किनारा दंतुर असण्यापासून देशाचे विशेष फायदे कोणते होतात ?

२ ब्रिटिश बेटें पूर्वीप्रमाणें युरोप खंडाला चिकटून राहिलीं असतीं तर त्याचा यूरोपांतील कोणकोणत्या देशांवर कसाकसा परिणाम झाला असता ?

३ अमेरिका खंडाचा शोध लागल्यापासून ब्रिटिश बेटांची भरभराट झाली असें म्हणतात, तें कसें ? अमेरिका खंड सांपडलें नव्हतें तेव्हां यूरोपांतील कोणत्या देशांना विशेष महत्त्व होतें ?

४ हिंदुस्थानांतील नद्या व ब्रिटिश बेटांतील नद्या यांची तुलना करा.

या दोन्ही देशांना होणारा नद्यांचा उपयोग एकाच प्रकारचा नसून तो अगदीं भिन्न प्रकारचा आहे असें म्हणतात, तें कसें ?

५ ब्रिटिश बेटें ज्या उत्तर अक्षांशांचे दरम्यान आहेत, त्याच अक्षांशांचे दरम्यान यूरोप खंडांत इतर कोणकोणते देश आहेत तें नकाशावर पहा. या सर्व देशांचें हवामान सारखेंच आहे काय ? फरक पडत असल्यास तो कोणता व कां पडतो हें सांगा.

६ इंग्लंडचा आग्नेय भाग व नैर्ऋत्य भाग, तसेंच वेल्सचा उत्तर व दक्षिण भाग हे परस्परांहून अगदीं भिन्न स्वरूपाचे आहेत असें म्हणतात. त्यांच्यांत कोणकोणत्या बाबतींत व कसाकसा फरक पडतो तें स्पष्ट करा.

७ महाराष्ट्रांतील डोंगर व इंग्लंडमधील डोंगर यांची तुलना करा. या दोन्ही देशांना त्यांच्यांतील डोंगरांचा कसाकसा उपयोग होतो ?

८ डोंगराळ भागांत राहणाऱ्या माणसांचा आयुष्यक्रम सपाट भागांत राहणाऱ्या माणसांच्या आयुष्यक्रमाहून अगदीं भिन्न असतो, हें स्कॉट्लंडचा उत्तरभाग व इंग्लंडचा पूर्वभाग यांत राहणाऱ्या माणसांचें उदाहरण घेऊन स्पष्ट करा.

९ हवा व हवामान यांत फरक काय ? इंग्लंडच्या हवामानांत फारसा फरक पडत नसला तरी हवेंत तो फार पडतो असें म्हणतात याचें कारण काय ? या फरकामुळें इंग्लिश लोकांचें काय नफा नुकसान झालें आहे ?

१० ब्रिटिश बेटांत बाराहि महिने थोडा थोडा पाऊस पडतो या गोष्टीचा परिणाम तेथील शेती, नद्या व लोकांची राहणी यांवर काय झाला आहे ? हिंदुस्थानांत चार महिन्यांत पडणारा पाऊसहि ब्रिटिश बेटांतल्याप्रमाणें वर्षभर विभागून पडता तर नफा-नुकसान काय झालें असतें ?

११ आपण शेतीला महत्त्व देतों, तर उलट ब्रिटिश लोक कुरणाळ जमिनीला व गायरानांना महत्त्व देतात. या फरकाचीं कारणें काय ? त्याचा परिणाम काय होतो ?

१२ ब्रिटिश लोकांच्या खाण्यापिण्यांत विशेषतः कोणते पदार्थ जास्त येतात ? ते ते कोठून आणवितात ? हे पदार्थ बाहेरून आणविण्यापेक्षां ते ते स्वतःच्या देशांतच जास्त प्रमाणांत कां पिकवीत नाहींत ?

१३ महाराष्ट्रांतील बहुतेक लोकवस्ती नद्यांच्या कांठांकांठांनीं झाली आहे,

तर इंग्लंडमध्यें ती डोंगरांच्या कडांकडांनीं झाली आहे; असा फरक कां? वस्तीच्या बाबतींत या दोन्ही देशांत आणखी कोणता फरक दृष्टीस पडतो?

१४ बंदरांत कोणकोणत्या सोई असल्या म्हणजे तें चांगलें आहे असें आपण म्हणतों? ब्रिटिश बेटांतील उत्तम अशीं पांच बंदरें सांगून त्यांसंबंधींच्या महत्त्वाच्या गोष्टी सांगा.

१५ खालील ठिकाणीं कोणते उद्योगधंदे विशेष चालतात, व त्या त्या ठिकाणीं तो तो धंदाच विशेष कां चालतो हें सांगा:—

ब्रिस्ट्ल्, शेफील्ड, लीड्स्, मँचेस्टर, स्वान्झी, बर्मिंग्‌हॅम्, डंडी, एडिंबरो, राम्स्‌गेट्, डोव्हर, ऑक्सफर्ड्.

प्रकरण ५ वें

ब्रिटिश मजूर

इंग्लिश लोक व त्यांची राहणी यासंबंधींची थोडीशी कल्पना आपण लंडनमध्यें फिरत असतां आपणांस आलेली आहे. परंतु त्याच वेळीं सांगितल्याप्रमाणें नुसत्या शहरी राहणीवरून देशाच्या सर्व भागांतील स्वाभाविक राहणीची कल्पना करणें फारसें बरोबर होणार नाहीं. म्हणून आपण आतां ब्रिटिश बेटांतील निरनिराळ्या भागांत जे लोक राहतात त्यांच्यासंबंधींची थोडीशी माहिती करून घेऊं.

ब्रिटिश बेटांत शेतकी, मजुरी, नौकरी, व्यापार, मच्छिमारी वगैरे निरनिराळे धंदे व ते ते धंदे करणारे लोक आहेत. आणि या सर्वच धंद्यांच्या उन्नतीवर ब्रिटिश बेटांची एकंदर भरभराट अवलंबून असल्यामुळें ते सर्वच धंदे आपापल्या परीनें महत्त्वाचे आहेत. एके वेळीं ब्रिटिश बेटांत शेतकी हाच प्रमुख धंदा समजला जाऊन शेतकरी वर्ग अतिशय महत्त्वाचा गणला जात असे. परंतु अलीकडे लोखंड व कोळसा यांची पैदास जास्त होऊन यंत्रांची

वाढ होऊं लागल्यापासून ब्रिटिश बेटांत कारखाने व ते चालविणारे मजूर यांनाच जगाचे दृष्टीनें जास्त महत्त्व येऊं लागलें आहे. आणि याचेंच गमक असें कीं, खेड्यांतील लोकसंख्या व घरगुती उद्योगधंदे दिवसेंदिवस कमी कमी होत जात असून तेथील सर्व लोक लंडन्, मँचेस्टर, लीड्स, बार्मिंगहॅम्, ग्लासगो यांसारख्या कारखान्यांच्या शहरांभोंवतीं गोळा होत आहेत. तसेंच या कारखान्यांत काम करणारा मजूरवर्ग आतां पूर्वीसारखा मागासलेला राहिला नसून उलट जास्त जास्तच पुढें येत चालला आहे. समाजांत तर त्याचा दर्जा वाढलाच आहे, परंतु राजकीय बाबतींतहि त्याला महत्त्व आलें असून पार्लमेंट व खुद्द मंत्रिमंडळ यांतहि मजुरांच्या प्रतिनिधींचेंच वजन वाढत आहे. हल्लींचे मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड व त्यांचे इतर सहकारी या मजूरवर्गांतील लोक आहेत.

कारखाने हेंच आपलें वैशिष्ट्य असें ओळखून ब्रिटिश लोक आपल्या पैशाचा व शक्तीचा ओघ शक्य तों शेतीकडून कारखान्यांकडे वळवीत आहेत. कारखान्यांप्रमाणेंच मालाची वाहतूक करणारीं जहाजें व दळणवळणाचे मार्गांवरील मुख्य बंदरें याहि गोष्टी ब्रिटिश लोकांच्या मालकीच्या असल्यामुळें गव्हासारखा कच्चा माल ब्रिटिश बेटांत भरपूर होत असूनहि तो दुसऱ्या देशांतून आणणें व गव्हाची पैदास कमी कमी करणें त्यांस परवडतें. भाजीपाला, दूध, अंडीं, इत्यादि पदार्थ मात्र लवकरच नासत असल्यामुळें ते दूर देशांतून आणणें शक्य नसतें; नाहींतर तेहि पदार्थ त्यांनीं तिकडूनच आणवून ब्रिटिश बेटांतील हीहि शेती कमी केली असती; व त्याऐवजीं कारखाने वाढविले असते. हे लौकर नासणारे पदार्थ बर्फांत घालून नेणें, किंवा विमानांतून आणणें अशा प्रकारचे प्रयोग जारीनें सुरू असून ते पूर्णपणें साधल्यास ब्रिटिश बेटांतील हेहि धंदे

बसून शेती अजिबात कमी होण्याचा बराच संभव आहे. अशा-प्रकारें शेतकरीवर्गाचें प्राबल्य कमी होत असून, उलट मजूरवर्गच जास्त जास्त पुढें येत असल्यामुळें त्या वर्गाची थोडीशी माहिती आपण प्रथम मिळवूं.

एक मजूर म्हटला कीं, यंत्रांनीं काम करणाऱ्या सर्व कामकरीवर्गांचा त्यांत अंतर्भाव होतो. ब्रिटिश बेटांत अशा प्रकारचे यंत्रांनीं चालणारे कारखाने हजारों प्रकारचे असले तरी, कापसाच्या व लोंकरीच्या गिरण्या कोळशाच्या व लोखंडाच्या खाणी, जहाजें बांधावयाच्या गोद्या, व लोखंडी पत्रे करण्याचे कारखाने हे विशेष महत्त्वाचे होत. खंडाळ्याच्या घाटांत पडणारें पावसाचें पाणी अडवून व तें लोखंडी नळांतून आणून त्याचे जोरावर खोपवलीस टाटा कंपनीनें एक विजेचा कारखाना काढला आहे; आणि मुंबईच्या ट्रामगाड्या, आगगाड्या, कांहीं गिरण्या व कारखाने हल्लीं या कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या विजेवरच चाल-तात. यूरोपांत स्वित्सर्लंड्, स्वीडन-नॉर्वे वगैरे देशांतहि अशा प्रकारचे विजेचे कारखाने बरेच असून तेथील इतर कारखानेंहि विजेचे जोरा-वरच चालतात. परंतु ब्रिटिश बेटांत वीज उत्पन्न करण्याची अशी सोय नसल्यामुळें तेथील बहुतेक कारखाने वाफेचे शक्तीवरच चालवावे लागतात. आणि म्हणून वाफ व यंत्रें वगैरे करण्याला लागणाऱ्या गोष्टी —कोळसा, लोखंड, पाणी इत्यादि—जेथें विपुलतेनें सांपडतात तेथेंच अशाप्रकारचे कारखाने उभारतां येतात. सबंध ब्रिटिश बेटांत अशी महत्त्वाची जागा म्हणजे, इंग्लंडच्या मधोमध पाठीच्या कण्यासारखा उभा पसरलेला ॲपेनाईन् पर्वत ही होय. कारण या पर्वतांत कोळसा व लोखंड हीं दोन्ही जागोजाग व अगदीं जवळ जवळ सांपडतात. म्हणून याच पर्वताचे अनुरोधानें सर्व मोठमोठे कारखाने असल्याचें आपल्या दृष्टीस पडेल. अर्थात् कोणत्या प्रकारचे कारखाने किंवा

गिरण्या कोठें असावयाच्या हें इतर स्थानिक परिस्थितीवर अवलंबून राहील; उदाहरणार्थ, यॉर्क्‌शरमधील कुरणाळ जमिनीवर लक्षावधि मेंढ्या पोसल्या जात असून त्यांवर दरवर्षी खंडोगणती लोंकर सांपडते. तेथेंच, ती स्वच्छ करावयास लागणारें वाहतें पाणी हजारों दऱ्यां-खोऱ्यांतून सारखे झुळझुळत असतें; व त्याच ठिकाणीं सुदैवानें ७/८ कोटि टन कोळसा दरवर्षी निघेल अशा मोठमोठ्या खाणी लागल्या असल्यामुळें एकंदर यॉर्क् परगणा सर्व जगांत लोंकरीच्या कापडाच्या कारखान्यांचे आगर म्हणून प्रसिद्धीस आला आहे. हीच स्थिति यॉर्क्‌शरला लागून असलेल्या पश्चिम किनाऱ्यावरील लँकेशरची आहे.हा सबंध परगणा व विशेषत: मँचेस्टर हें शहर सर्व जगांत कापसाच्या कापडाच्या गिरण्याविषयीं प्रसिद्ध आहे. कारण दीडकोटि टन कोळसा दरवर्षी निघेल इतक्या मोठ्या खाणी, अगदीं तलम धागासुद्धां तुटणार नाहीं अशा प्रकारची दमट हवा, कापड धुवायाला व रंगविण्याला लागणारें एक विशेष प्रकारचें भरपूर पाणी—इतक्या सर्व गोष्टी कापसाच्या कापडाला अनुकूल अशा जुळून आल्यामुळें, व ज्या लिव्हर्पूल बंदराला सबंध अमेरिकेचा कापूस उतरायाचा तें अगदीं नजीकच असल्यामुळें खुद्द लँकेशर्मध्यें कापसाचें एक बोंडहि पिकत नसतांना कापडाचे कारखाने मात्र या भागांत भरपूर आहेत. वेल्स्‌च्या दक्षिणकिनाऱ्याचे आसपासहि ४/५ कोटी टन कोळसा दरवर्षी निघतो. परंतु तेथें दुसरा कच्चा माल फारसा मोठ्या प्रमाणांत उत्पन्न होत नाहीं; शिवाय तेथील कोळसा बिनधुराचा असून त्याला आंचहि अतिशय असल्यामुळें त्यालाच बाहेरून जोराची मागणी असते; ह्या कारणांस्तव त्या किनाऱ्यावरील भागांत दुसऱ्या गिरण्या किंवा कारखाने फारसे नसून फक्त कार्डिफ् व ब्रिस्टल् या बंदरांनाच—तेथून कोळसा बाहेर जातो म्हणून—काय तें

महत्त्व आलें आहे. कोळसा सांपडतो तेथें बहुधा लोखंडहि सांपडतेंच. परंतु त्यांतल्यात्यांत इंग्लंड व स्कॉट्लंड यांचे दरम्यानचे भागांत दोहोंच्या फार मोठमोठ्या खाणी असून तेथेंच लोखंडी व पोलादी यंत्रें करण्याचे व जहाजें बांधण्याचे फार प्रचंड कारखाने आहेत. एडिंबरो, बार्मिंगहॅम्, ग्लास्गो वगैरे शहरें याच कारखान्यांकरितां प्रसिद्ध असून ग्लास्गो तर लोकसंख्येचे मानानें सबंध ब्रिटिश बेटांत लंडन्चे खालोखाल येतें.

आतांपर्यंत ब्रिटिश बेटांत अतिशय महत्त्वाचे कारखाने कोठें कोठें आहेत, व ते तेथेंच कां काढले गेले याची थोडीशी कल्पना तुम्हांला आली असेल. मजुरांची सर्व वस्ती याच कारखान्यांभोंवतीं पसरलेली आहे. मजूर म्हटला कीं, त्याची राहणी सामान्यतः सारखीच असावयाची; मग तो कापडाच्या गिरण्यांत काम करो, कोळशाच्या किंवा लोखंडाच्या खाणींत काम करो, किंवा जहाजें बांधावयाच्या गोद्यांत काम करो. सकाळीं उठणें, न्याहारी करणें, कारखान्यांत वक्तशीर जाऊन तेथील कामाचा विशेष पोशाख करणें, दीड-दोन पर्यंत लक्षपूर्वक काम करणें, मधल्या सुटींत कारखान्यांचे आसपास असलेल्या हॉटेलांत मोकळ्या मनानें फराळ करणें, फिरून संध्याकाळपर्यंत कसोशीनें काम करणें, घरीं थकून भागून आल्यावर नेहमींचे स्वच्छ कपडे घालून सुग्रास जेवणखाण करणें, नंतर बायकामुलांसह मजेनें कोठेंतरी फिरायाला किंवा एकादे वेळीं सिनेमाला वगैरे जाणें, व तेथून परत आल्यावर दहा-आकराचे सुमारास कॉफी, कोको वगैरे कढत पेय पिऊन स्वस्थ झोंपीं जाणें–अशाच स्वरूपाची बहुतेक मजुरांची दिनचर्या असते. दररोजचा एक ठराविक व तोच क्रम असला तरी, व कामेंहि अतिशय जिकीरीचीं, त्रासाचीं, व कांहीं कांहीं तर अतिशय अवजड

व धोक्याचीं असलीं तरी तिकडील मजूर सामान्यतः प्रकृतीनें निकोप, शरीरानें स्वच्छ, व मनानें उल्हासी दिसतो. आपलेकडील मजुरासारखा अगदीं निःसत्त्व व पिळून निघालेला दिसत नाहीं. काम करीत असतांना तो गलिच्छ दिसला तरी एरवीं त्याच्यांत व वकील, डॉक्टर, शिक्षक वगैरे इतर उच्च गणले जाणाऱ्या धंदेवाल्यांत फारसा फरक दिसत नाहीं. ते सर्व एकाच डब्यांतून प्रवास करतील, एकाच हॉटेल्मध्यें फराळ करतील, रात्रीं एकाच थिएटरांत सिनेमा पाहतील, संध्याकाळीं एकाच क्रीडांगणावर खेळतील, व रविवारीं सकाळीं एकाच देवळांत प्रार्थना करतील. अर्थात् इंग्रजलोक झाले म्हणून काय झालें? त्यांच्यांतहि श्रीमंत-गरीब, घरंदाज–उपऱ्या, मालक--मजूर, वगैरे सामाजिक भेदभाव पार गेला आहे असें नाहीं. उलट, फ्रेंच वगैरे लोकांपेक्षां ते एकप्रकारें फारच आढ्यतेनें वागणारे व जुन्या परंपरेला चिकटून राहाणारे आहेत; तथापि आपलेकडे कामकरी व इतर पांढरपेशे यांत जसें स्पष्ट अंतर दिसतें तसें त्यांच्यकडे दिसत नाहीं येवढेंच.

इकडील मजुरांचीं कामें आपलेकडील मजुरांसारखींच असलीं तरी त्यांना मिळणारी मजुरी इकडील मजुरांच्या मजुरीपेक्षां बरीच जास्त असते; त्यामुळें त्यांस पोटभर अन्न व अंगभर वस्त्र यांची ददात कधींच पडत नाहीं. तसेंच ते थोडेबहुत शिकलेसवरलेलेहि असल्यामुळें त्यांची एकंदर राहणी जास्त वरच्या दर्जाची व वृत्ति जास्त आनंदी अशी असते. त्यांचीं घरें आपलेकडील चाळींतील खुराड्यांसारखीं अगदीं लहान, कोंदट, गलिच्छ, व हिडिस नसून तीं बरींच प्रशस्त, सोयीचीं व नीटनेटकींहि असतात. प्रत्येक घरांत खुर्च्या, टेबलें, सतरंज्या, पलंग वगैरे लांकडी सामान तर असतेंच; परंतु कांहींकांहींतून तर पिआनो, ग्रामाफोन,पुस्तकें, ज्यांना


आपण चैनीच्या असें म्हणूं अशा गोष्टीहि दिसतात. सुट्टया, कामाचे तास, रजा, औषधपाण्याची व्यवस्था, म्हातारपणीं—किंवा कांहीं अपघात झाल्यास अगोदरही—पेन्शन इत्यादि कितीतरी सवलती त्यांस मिळत असल्यामुळें, त्यांची स्थिति आपलेकडील मजुरांपेक्षां जास्त चांगली आहे. तसेंच सबंध मजूर-वर्गांत एक प्रकारची संघटना झाली असून 'ट्रेड यूनियन्'सारख्या मजुरांच्या हिताकरितां झटणाऱ्या संस्था निर्माण झाल्या आहेत. त्यामुळें त्यांची शक्ति फार बळावली असून तिच्या जोरावर ते मालकांना आपलें म्हणणें कबूल करावयास लावतात आपलेकडील मजुरांची स्थिति तिकडील मजुरांच्या स्थितीपेक्षां कितीतरी बाबतींत निराळी आहे, नाहीं ?

चला, आपण आतां यॉर्कशरमधील एका कोळशाच्या खाणींत जाऊं, व तेथें काय काय गोष्टी चालतात तें पाहूं. आतां जो कोळसा आपणांस दिसणार आहे तो व आपण घरीं शेगड्यांत जो कोळसा घालतों तो एक नाहीं. शेगडींतील कोळसा लांकडें जाळून तयार केलेला असून त्याला लोणारी कोळसा असें म्हणतात. उलट आगगाड्यांचे एंजिनांत किंवा गिरण्यांच्या भट्टयांत जो कोळसा जाळतात तो दगडासारखा घट्ट असतो म्हणून त्यास आपण दगडी कोळसा असें म्हणतों. कोळशाचे खाणींत जातांना पूर्वीं डेव्हीस सेफ्टी लँप् नांवाचा एक विशिष्ट रचनेचा दिवा घेऊनच जावें लागत. असे; कारण दुसरे दिवे आंत घेऊन गेल्यास आंत असलेला वायु पेटून एकदम भडका उडेल. परंतु आतां त्याऐवजीं विजेचा दिवा घेऊनहि जातां येतें. हं. हा पहा एक पाळणा खालून वर आला आहे, त्यांत बसून आपण खालीं जाऊं. केवढ्यांत आपण जवळ जवळ एक मैल खोल तळाशीं आलों ? येथून सर्व बाजूंना बोगदे खोदलेले दिसताहेत. अरे वा !

बोगदे चांगले ऐसपैस असून आंतून विजेचे दिवेहि लावलेले आहेत ! या पहा कोळसे भरभरून टबांच्या गाड्या येताहेत. या गाड्या रुळांवरून येत असून त्यांना खेंचरें जोडलीं आहेत. हीं खेंचरें बाराहि महिने जमिनीच्या खालींच राहतात. यांना हवा मिळण्याची काय व्यवस्था केली आहे कोणास माहीत ! अरे, हा बोगदा आतां अगदीं निमूळता होत चालला असून यांत पुढें विजेचा उजेडहि दिसत नाहीं. हें पहा, येथें वरील कोळसा ढांसळून खालीं पडूं नये म्हणून वरच्या बाजूला मोठमोठे लांकडी टेंकू दिले आहेत. कधीं कधीं याच कामासाठीं लांकडी टेंकूंचे ऐवजीं कोळशाचेच आधार भोंवतालचा भाग खणून काढून शिल्लक ठेवतात. मजूर आपल्या टिकावानें फोडताहेत तो ढपळा पहा केवढा मोठा आहे ! जवळ जवळ तुमच्या कानाला लागेल. दुसरे कांहीं जण आपल्या हातोड्यांनीं एका मोठ्या खांडाची बारीक बारीक खांडकीं करून तीं फावड्यांनीं टबांत भरीत आहेत. जिकडे तिकडे कुदळी, टिकाव, हातोडे, फावडीं, यांचा खणखणाट उडाला आहे. छे, जसजसें आपण खालीं खालीं जात आहों तसतसें जास्तजास्तच उकडूं लागलें आहे. पण ही पहा या बाजूनें एक वाऱ्याची झुळूक कशी येते आहे. आगगाडीच्या बोगद्यांत मधून मधून भोंकसे ठेवून वारा आंत येईल अशी तजवीज केलेली असते; परंतु तसे भोंकसे येथें ठेवणें शक्य नसल्यामुळें मोठमोठ्या भात्यांच्या व पंख्यांच्या योगानें येथें हवा खेळविली आहे. त्याशिवाय काम करणारीं माणसें व खेंचरें जगणार तरी कशीं ? ही कर्कश शिटी कसली ? एका पाळीचीं माणसें बदलून दुसऱ्या पाळीचीं माणसें कामावर लागण्याची दिसते. हे मोठमोठे पंप खाणींतील पाणी बाजूला फेंकून देऊन खाण कोरडी

राखण्याचें काम करीत आहेत. म्हणून ठीक; नाहींतर पाणी सांचून बिचाऱ्यांना कोळसा फोडता येणार नाहीं.

चला, आतां आपण वर जाऊं या. हे इकडे आगगाडीचे डबे तयार असून त्यांत खालून टबांतून आणलेला कोळसा भरण्याचें काम चाललें आहे. हीं सर्वच कामें मोठीं ताकदीचीं दिसतात. त्या मजुरांचे दंड, छाती, पोटऱ्या पहा, कश्या भरीव, व पिळदार दिसताहेत. पण हें सर्वच आवार किती गलिच्छ मळकट, व उदास दिसत आहे. हवा कशी धुंद झाली आहे. आगगाडी बोगद्यांतून जात असतां कोळशाचे कण नाका-तोंडावाटें घशांत जाऊन जसें गुदमरल्यासारखें होतें तसेंच येथेंहि होत आहे.



अशा ठिकाणीं हे मजूर रोज कामें कशीं करीत असतील बरें ! कदाचित् ‘ रोज ’ करतात म्हणूनच संवयीनें त्यांचें त्यांना फारसें कांहीं वाटत नसेल; परंतु याचा त्यांचे जीवितावर

वाईट परिणाम झाल्यावांचून राहात नसेल खास! वरून आवार कसें भरीव दिसत आहे; पण आंत सर्व ठिकाणीं तें पोंकळ आहे. या एकाच खाणीचे खालीं जर आपणांस येवढी मोठी पोकळी दिसली, तर अश्या हजारों खाणींचेमुळें ब्रिटिश बेटांत कितीतरी जमीन पोकळ बनली असेल! ब्रिटिश बेटें दिवसेंदिवस पोकळ बनत चाललीं आहेत असें एकाद्यानें विनोदानें म्हटले तर तें एका अर्थी खरें आहे. कोळशानें थोडीबहुत जमीन पोकळ केली असेल हें खरें, परंतु जगाच्या एकंदर उत्पादनशक्तींत त्यानें कितीतरी भर घातली आहे. कोळसा सांपडला नव्हता तेव्हां मनुष्य आपल्या स्वतःच्या, व बैल, घोडे, हत्ती, वगैरे प्राण्यांच्या शक्तीनें सर्व कामें करीत असे. हातानें माग चालविणें; घोडे, बैल, वगैरे प्राण्यांनीं गाड्या, नांगर, घाणे वगैरे ओढणें; वाऱ्याच्या जोरावर जहाजें किंवा पवनचक्क्या चालविणें; व पाण्याच्या प्रवाहावर पाणचक्क्या फिरविणें हीं याचीं उदाहरणें होत. पाण्याच्या जोरावर वीज उत्पन्न करून मनुष्यानें आणखी एका शक्तीची भर घातली खरी; परंतु ब्रिटिश बेटांत तरी तिचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करतां येण्यासारखी परिस्थिति नसल्यामुळें बाकीच्या सर्व शक्तींपेक्षां जास्त सामर्थ्यवान् अशी एकादी शक्ति आज ब्रिटिश बेटांत काम करीत असेल तर ती वाफच होय; व या दृष्टीनें कोळशानें औद्योगिक बाबतींत फार मोठी क्रांति केली आहे असें म्हणावें लागतें.

मुलांनो, आतां आपण ज्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या त्यांपैकीं कांहीं वरील चित्रांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. खाणीचा दरवाजा, त्यांतून आंत गेलेले रूळ, भिंती ढांसळूं नयेत म्हणून त्यांना दिलेले लांकडी टेंकू वगैरे गोष्टी तुम्हांला या चित्रांत आतां सहज ओळखितां येतील नाहीं ?

औद्योगिकक्रांतीचें सर्व श्रेय एकट्या कोळशालाच देऊन चालावयाचें नाहीं. त्याचेंच भावंड (कारण ते दोघेहि बहुधा एकाच खाणींत जन्म पावतात) लोखंड यानें त्याच्याशीं भाऊबंदकी करून सहकार्य केलें नसतें तर कोळशाच्या शक्तीचा उपयोग कसा करता आला असता ? आणि म्हणून या औद्योगिक क्रांतीचें निम्में श्रेय लोखंडाला देणें रास्त होईल.

लोखंडाची खाण व विशेषतः तें शुद्ध करण्याची भट्टी पाहून कोळशाच्या खाणीइतकीच मजा वाटते. म्हणून आतां आपण एका लोखंडाच्या खाणींत जाऊं. ही खाण नॉर्‌दॅम्टन् परगण्यांत असून ती नुसत्या लोखंडाचीच आहे; म्हणजे येथें दुसऱ्या कांहीं खाणींतल्याप्रमाणें कोळशाच्या थरांतच लोखंडाच्या मातीचे थर लागलेले नाहींत. हे लोखंडी मातीचे थर पाहा. ते कोळशाच्या ढपल्यासारखेच दिसत आहेत, पण ते तितके खोल नसून अगदीं जमीनीसरसेच आहेत. शिवाय लोखंड मातींत मिसळलेलें असल्यामुळें या लोहमिश्रित मातीचे थर कोळशाच्या थरांइतके घट्ट व टणकहि नसतात. त्यामुळें कोळशाच्या खाणींत खोल जात असतां किंवा कोळशाचीं मोठमोठीं खांडकीं मजूर फोडीत असतांना पाहण्यांत जितकी मजा वाटते तितकी मजा लोखंडाच्या खाणींत वाटत नाहीं. परंतु लोखंड शुद्ध करण्याची रीति मात्र फारच मनोरंजक आहे; म्हणून आतां आपण असल्या एका भट्टीकडे जाऊं.

ही पाहा भट्टी किती प्रचंड आहे ती. तिच्यावरील ती कढईहि किती मोठी आहे ! तिचा तो वरचा वाटोळा भाग चांगला सत्तर-ऐंशी फूट उंच, व दहा-पंधरा फूट रुंद असेल. ती सबंध बाहेरून विटांनीं बांधून काढली असून आंतून तिला लोखंडी पत्र्याचें अस्तर लावलें आहे. मातींत मिसळलेलें लोखंड निराळें करण्याकरितां ह्या लोहमिश्रित मातीचा रस

वाईट परिणाम झाल्यावांचून राहात नसेल खास! वरून आवार कसें भरीव दिसत आहे; पण आंत सर्व ठिकाणीं तें पोंकळ आहे. या एकाच खाणीचे खालीं जर आपणांस येवढी मोठी पोकळी दिसली, तर अश्या हजारों खाणींचेमुळें ब्रिटिश बेटांत कितीतरी जमीन पोकळ बनली असेल! ब्रिटिश बेटें दिवसेंदिवस पोकळ बनत चाललीं आहेत असें एकाद्यानें विनोदानें म्हटले तर तें एका अर्थी खरें आहे. कोळशानें थोडीबहुत जमीन पोकळ केली असेल हें खरें, परंतु जगाच्या एकंदर उत्पादनशक्तींत त्यानें कितीतरी भर घातली आहे. कोळसा सांपडला नव्हता तेव्हां मनुष्य आपल्या स्वतःच्या, व बैल, घोडे, हत्ती, वगैरे प्राण्यांच्या शक्तीनें सर्व कामें करीत असे. हातानें माग चालविणें; घोडे, बैल, वगैरे प्राण्यांनीं गाड्या, नांगर, घाणे वगैरे ओढणें; वाऱ्याच्या जोरावर जहाजें किंवा पवनचक्क्या चालविणें; व पाण्याच्या प्रवाहावर पाणचक्क्या फिरविणें हीं याचीं उदाहरणें होत. पाण्याच्या जोरावर वीज उत्पन्न करून मनुष्यानें आणखी एका शक्तीची भर घातली खरी; परंतु ब्रिटिश बेटांत तरी तिचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करतां येण्यासारखी परिस्थिति नसल्यामुळें बाकीच्या सर्व शक्तींपेक्षां जास्त सामर्थ्यवान् अशी एकादी शक्ति आज ब्रिटिश बेटांत काम करीत असेल तर ती वाफच होय; व या दृष्टीनें कोळशानें औद्योगिक बाबतींत फार मोठी क्रांति केली आहे असें म्हणावें लागतें.

मुलांनो, आतां आपण ज्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या त्यांपैकीं कांहीं वरील चित्रांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. खाणीचा दरवाजा, त्यांतून आंत गेलेले रूळ, भिंती ढांसळूं नयेत म्हणून त्यांना दिलेले लांकडी टेंकू वगैरे गोष्टी तुम्हांला या चित्रांत आतां सहज ओळखितां येतील नाहीं?

औद्योगिकक्रांतीचें सर्व श्रेय एकट्या कोळशालाच देऊन चालावयाचें नाहीं. त्याचेंच भावंड (कारण ते दोघेहि बहुधा एकाच खाणींत जन्म पावतात) लोखंड यानें त्याच्याशीं भाऊबंदकी करून सहकार्य केलें नसतें तर कोळशाच्या शक्तीचा उपयोग कसा करता आला असता ? आणि म्हणून या औद्योगिक क्रांतीचें निम्में श्रेय लोखंडाला देणें रास्त होईल.

लोखंडाची खाण व विशेषतः तें शुद्ध करण्याची भट्टी पाहून कोळशाच्या खाणीइतकीच मजा वाटते. म्हणून आतां आपण एका लोखंडाच्या खाणींत जाऊं. ही खाण नॉर्दम्टन् परगण्यांत असून ती नुसत्या लोखंडाचीच आहे; म्हणजे येथें दुसऱ्या कांहीं खाणींतल्याप्रमाणें कोळशाच्या थरांतच लोखंडाच्या मातीचे थर लागलेले नाहींत. हे लोखंडी मातीचे थर पाहा. ते कोळशाच्या ढपल्यासारखेच दिसत आहेत, पण ते तितके खोल नसून अगदीं जमीनीसरसेच आहेत. शिवाय लोखंड मातींत मिसळलेलें असल्यामुळें या लोहमिश्रित मातीचे थर कोळशाच्या थरांइतके घट्ट व टणकहि नसतात. त्यामुळें कोळशाच्या खाणींत खोल जात असतां किंवा कोळशाचीं मोठमोठीं खांडकीं मजूर फोडीत असतांना पाहण्यांत जितकी मजा वाटते तितकी मजा लोखंडाच्या खाणींत वाटत नाहीं. परंतु लोखंड शुद्ध करण्याची रीति मात्र फारच मनोरंजक आहे; म्हणून आतां आपण असल्या एका भट्टीकडे जाऊं.

ही पाहा भट्टी किती प्रचंड आहे ती. तिच्यावरील ती कढईहि किती मोठी आहे ! तिचा तो वरचा वाटोळा भाग चांगला सत्तर-ऐंशी फूट उंच, व दहा-पंधरा फूट रुंद असेल. ती सबंध बाहेरून विटांनीं बांधून काढली असून आंतून तिला लोखंडी पत्र्याचें अस्तर लावलें आहे. मातींत मिसळलेलें लोखंड निराळें करण्याकरितां ह्या लोहमिश्रित मातीचा रस

करून तो गाळावा लागतो. हा रस लौकर व्हावा, व गाळण्याचें कामहि सुकर व्हावें म्हणून मातींत चुनखडी व कोळसा मिसळतात, आणि नंतर ती माती कढईत टाकतात. हें सबंध मिश्रण वितळविण्यासाठीं कढईचे खालीं एक मोठें चुलाण केलेलें असून तें अहोरात्र जळत असतें. हें पाहा चुलाण कसें रसरशीत पेटलें आहे!

सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं दगडी कोळसा सांपडला नव्हता तेव्हां चुलाणांत जळण म्हणून लांकडेंच घालावीं लागत असत; व त्या वेळीं या भट्ट्या आतांप्रमाणें कोळशाचे खाणींशेजारीं न बांधतां मोठमोठ्या जंगलांजवळ बांधीत. परंतु लांकडाची आंच दगडी कोळशाच्या आंचेपेक्षां फारच कमी असल्यामुळें थोड्याशा दगडी कोळशानें जें काम व्हावयाचें तें भाराभर लांकडांनींहि होत नाहीं; म्हणून कोळसा सांपडूं लागल्याबरोबर लांकडांऐवजीं कोळशाचाच उपयोग करणें फायदेशीर होऊं लागलें. जेथें कोळसा व लोखंड एके ठिकाणींच सांपडतात तेथें कांहीं प्रश्नच नसतो. परंतु जेथें कोळसा व लोखंड हीं दूरदूर सांपडतात तेथें भट्ट्याच कोळशाचे खाणींशेजारीं बांधून लोखंडाची माती तिकडे वाहून नेणें परवडतें; कारण दगडी कोळसा या लोहमिश्रित मातीपेक्षां जड असून शिवाय तो मातीच्या दुप्पट तिप्पट लागतो.

हे पाहा मिश्रणाचे डबे भट्टीचे अगदीं जवळ आणून सोडले आहेत. ती यारी सबंध डबाच्या डबा त्या उंच कट्टयापर्यंत उचलून तेथून कढईत उपडा करीत आहे. हें इकडे मिश्रण कढईत कढत असून शुद्ध लोखंड (तें मिश्रणापेक्षां जड असल्यामुळें) खालीं सांचत आहे, व मातीची मळी साखरेच्या मळीसारखी वर तरंगत आहे. हा पाहा लोखंडाचा रस एका वाळूनें भरलेल्या खांचेंत सोडलेला असून तेथें तो निवाल्यामुळें त्याचे मोठमोठे घट्ट खडे बनले आहेत. अशा

प्रकारच्या लोखंडाला 'पिग् आयर्न्' असें म्हणतात. असल्या लोखंडाचा व डुकराचा काय संबंध आहे कोणास ठाऊक! कदाचित् तें दिसायला डुकराप्रमाणें मळकट, खडबडीत व ओबडधोबड दिसतें म्हणून तर त्यास हें नांव मिळालें नसेल ना? हें पाहा पिग् आयर्न् कढवून तें आणखी शुद्ध केलें आहे. तें पातळ आहे तोंच तें निरनिराळ्या सांचांत ओतून त्याचे आपणांस पाहिजेत ते निरनिराळे पदार्थ तयार करतां येतात. अशा प्रकारच्या लोखंडालाच आपण ओतीव लोखंड म्हणतो. नेहमींच्या वापरांतले ओबडधोबड पदार्थ, तसेंच नळ, गज व यंत्रांचे निरनिराळे भाग याचेच केलेले असतात. परंतु हें लोखंड तितकेंसें शुद्ध झालें नसल्यामुळें तें ठिसूळ असतें, व जरासें ठोकलें किंवा खालीं पडलें कीं तें फुटण्याचा संभव असतो; म्हणून ओतीव लोखंडहि पुनः भट्टींत घालून खूपसें हालवून बाहेर काढलें व मोठमोठ्या हातोड्यांनीं तें खूप जोरानें ठोकलें म्हणजे तें चपटें बनतें. या चपटया लोखंडावरून मोठमोठे पोलादी रूळ फिरविले म्हणजे तें अगदीं पिळून निघतें, व अशा प्रकारें त्यांतील सर्व शिल्लक मळ नाहींसा होऊन तें अगदीं शुद्ध बनतें. यालाच आपण पोलाद म्हणतों. हे पाहा इकडे पोलादी पत्रे तयार होऊन पडले आहेत. लोखंडाला पोलाद होण्याला इतक्या अवस्थांतून जावें लागलें, व शब्दशः इतकी तपश्चर्या करावी लागली.

मघाशीं आपण कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या मजुरांची स्थिति पाहिली. त्यांना सबंध दिवस बिनहवेच्या भुयारांत राहावें लागतें म्हणून आपणाला त्यांची कींव आली. लोखंडाच्या कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांना मोकळी हवा मिळाली तरी बिचाऱ्यांना सारखें विस्तवापाशीं काम करावें लागतें. त्यांना नुसत्या धगीचाच त्रास होतो असें नसून ठिणग्या, निखारे यांनींहि त्यांचें अंग भाजतें. बाहेर

लोक थंडीनें काकडत असले तरी या बिचाऱ्यांना आंत आगीनें करपून किंवा होरपळून जाण्याची पाळी येते! ते काळ्या करपलेल्या व उघड्या अंगानें काम करीत असतां त्यांचेकडे पाहवत सुद्धां नाहीं.

कोळशाच्या खाणी व लोखंडाचे कारखाने ब्रिटिश बेटांत निरनिराळ्या ठिकाणीं आहेत; परंतु लोंकरीच्या गिरण्या जशा यॉर्कशरमध्यें विशेष, किंवा कापडाच्या गिरण्या लँकेशरमध्यें विशेष तश्या कोळशाच्या व लोखंडाच्या खाणीहि इंग्लंडचे मध्यभागीं स्ट्राफर्डशरमध्यें विशेष आहेत. फॅक्टरींच्या धुरानें व कोळशाच्या कणांनीं तो सबंध भाग इतका काळा झाला आहे कीं त्याला 'ब्लॅक् कंट्री' (काळें वावर) असेंच म्हणतात. रात्रीच्या अंधारांत कारखान्याच्या बंबांतून बाहेर पडणाऱ्या आगीच्या लोळांनीं आकाश तांबडें, नारिंगी, शेंदरी दिसतें तेव्हां एकंदर देखावा फारच भयाण दिसतो! जणूं कांहीं स्मशानांत चिताच पेटून राहिल्या आहेत. तेथील बहुतेक गांवांत लोखंडाचे कारखाने आहेतच; तथापि बर्मिंगूहॅम् व शेफील्ड हीं शहरें सर्व जगांत लोखंडी व पोलादी वस्तूंबद्दल प्रसिद्ध आहेत. बर्मिंगूहॅम्ला टांचण्या, सुया, स्क्रू, खिळे, साखळदंड, भांडीं नळ, तोफा, एंजिनें, गर्डर्स् (लोखंडी तुळया), सायकली वगैरे हजारों लहानमोठ्या लोखंडी वस्तु तयार होतात. शेफील्डला धार लावण्याचे दगडहि उत्तम सांपडत असल्यामुळें तें सर्व प्रकारच्या तीक्ष्ण पोलादी हत्यारांबद्दल आज तीनचारशें वर्षें प्रसिद्ध आहे.

वरील पदार्थांशिवाय पोलादाचा व लोखंडाचा अतिशय मोठा उपयोग जहाजें बांधण्याचे कामीं होतो. पूर्वीं लहानमोठीं सर्वच जहाजें लांकडाचीं बांधीत; परंतु आतां बहुतेक मोठीं जहाजें—मग तीं मालाचीं असोत किंवा लढाईचीं असोत—लोखं-

डाचीं व पोलादाचीं करतात. प्रत्येक जहाजाला हजारों टन पोलाद लागतें. या मानानें या सर्वांना एकंदर किती टन लोखंड व पोलाद लागत असेल याची कल्पना करतां येईल. जहाजें बांधण्याला जागा अशी पाहिजे, कीं तिच्या शेजारींच लोखंडाच्या व कोळशाच्या खाणी असून शिवाय बंदरांत समुद्राचें पाणी चढण्याउतरण्याची सोयहि पाहिजे. तशीच ती निवाऱ्याचीहि पाहिजे. नाहींतर जहाजांची बांधणी पुरी होण्यापूर्वींच तीं वाहून जावयाचीं, किंवा फुटावयाचीं ! या सर्व दृष्टींनीं पाहतां इंग्लंडच्या अगदीं उत्तरेकडचे किनाऱ्यावरील न्यूकॅसल्, संडर्लंड्, बॅरो हीं बंदरें बरींच सोयीचीं आहेत. स्कॉट्लंड्मधील ग्लास्गो तर जहाजें बांधण्याचें जगांतील मुख्य ठिकाण म्हणून नांवाजलेलें आहे. जहाज बांधणें हें फार खर्चाचें व चिकट काम आहे. दोनदोन हजार तीनतीन हजार माणसें वर्ष दीड वर्ष खपतील तेव्हां एक जहाज बांधून व्हावयाचें. सबंध सांगाडा प्रथम पोलादी तुळयांचा करावयाचा; नंतर तो पोलादी पत्र्यांनींच मढवून काढावयाचा हीं दोन कामें विशेष महत्त्वाचीं असून, तीं चालू असतांना सबंध बंदर त्या खणखणाटानें हदरून जातें. त्याच वेळीं एंजिनिअर्स मुख्य एंजिन् व इतर यंत्रें बसवीत असतात; व सुतार तक्तपोशी, मजले, कठडे, खिडक्या, खोल्या वगैरे लांकडी काम करीत असतात. अशा रीतीनें सर्व प्रकारचे कारागीर या एका कामांत वर्षन्वर्ष गुंतून राहतात.

वरील सर्व धंद्यांवर उपजीविका करणारे १५।२० लाख मजूर तरी ब्रिटिश बेटांत असावेत; व म्हणूनच या धंद्यांविषयीं व ते करणाऱ्या मजूरवर्गासंबंधीं आपण इतका विचार केला.

विचाराकरितां प्रश्न

प्रकरण ५ वें

१ ब्रिटिश बेटांतील शेतकरीवर्ग व मजूरवर्ग यांपैकीं कोणत्या वर्गाला विशेष महत्त्व येत चाललें आहे ? तसें होण्याचीं काय कारणें असावींत ?

२ ब्रिटिश बेटांत महत्त्वाचे कारखाने कोणते आहेत ? ते कोठें कोठें आहेत ? ते त्या त्या ठिकाणींच असण्याचीं कांहीं विशेष कारणें असल्यास सांगा.

३ कोळशाचे खाणींत व लोखंडाचे भट्टींत काम करणाऱ्या मजुरांच्या दिनचर्येचें वर्णन करा. तुम्हांला कोणत्या प्रकारच्या मजुरांचा आयुष्यक्रम जास्त सुखाचा वाटतो ? कां ?

४ कोळशाच्या खाणीचें वर्णन करा. कोळसा खाणींतून वर कसा आणतात ? तेथें हवा आंत आणण्याची व पाणी बाहेर काढण्याची काय व्यवस्था केलेली असते ?

५ कोळशाचा शोध हा जगांतील एक महत्त्वाचा शोध समजतात तो कां ? असाच आणखी एखादा महत्त्वाचा शोध सांगा.

६ यंत्रसामुग्री चालविण्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारची शक्ति लागते. अशा कोणकोणत्या शक्तींवर जगांतील कारखाने चालले आहेत ?

७ कोळसा किती प्रकारचा असतो ? प्रत्येक प्रकारचा कोळसा कसा कसा बनतो ? इंग्लंडमध्यें कोळशाला 'किंग् कोल' असें म्हणतात तें कां ?

८ इंग्लंड व वेल्स यांच्या कोणत्या भागांत सर्वांत जास्त व उत्तम प्रकारचा कोळसा मिळतो ? हिंदुस्थानांत ब्रिटिश बेटांतून येणारा कोळसा प्रामुख्यानें कोणत्या भागांतून येतो ?

९ ओतीव लोखंड, घडीव लोखंड व पोलाद यांत फरक काय ? यांपैकीं प्रत्येक प्रकारच्या लोखंडाच्या कांहीं कांहीं वस्तूंचीं नांवें सांगा. किर्लोस्करी खुर्च्या व नांगर कोणत्या लोखंडाच्या ?

१० विलायतेंत तयार झालेल्या एका सुती पायमोजाला बोलतां येतें आहे अशी कल्पना करून पुढील बाबींसंबंधीं तो काय काय सांगेल तें सांगाः —

(१) त्याचे आईबाप कोण ? (२) आजोबा कोठें राहात होते ? (३) त्यांनीं देशांतर कां केलें ? (४) सध्यांचें रूप प्राप्त होतांना त्याला कोणकोणत्या माणसांची मदत झाली ? तो हिंदुस्थानांत प्रथम कोठें उतरला ?

११ कापडाच्या गिरण्या लँकेशरलाच इतक्या कां ? तेथील हवा दमट आहे याशिवाय आणखी कारणें कोणतीं ?

१२ ब्रिटिश बेटांत बाहेरून कोठकोठून लोंकर येते ! यॉर्कशर परगण्यांत खंडोगणती लोंकर होत असतां बाहेरून मागविण्याची जरूरी काय ? व तें परवडतें तरी कसें ?

१३ लँकेशर परगण्यांतील रहिवाशांच्या अन्नपाण्यासंबंधीं माहिती द्या. थारापालट करण्याकरितां ते कोणत्या ठिकाणीं जातात ?

१४ लोंकर, रेशीम, व कापूस यांची खालीं विचारलेली माहिती सांगाः—

(१) कुल, गोत, जात. (२) त्यांना मानवणारें हवापाणी, जमीन. (३) त्यांचे विशेष आवडते देश. (४) ब्रिटिश लोकांना जास्तींत जास्त उपयोग कोणाचा (५) प्रत्येकाचे अंगचे बरे वाईट गुण.

प्रकरण ६ वें

ब्रिटिश शेतकरी

ब्रिटिश बेटें मुख्यतः कारखाने, गिरण्या, गोद्या वगैरेबद्दल जगांत प्रसिद्ध असलीं, व बरेचसे लोक हल्लीं शहरांत राहून शेतीपेक्षां इतर उद्योगधंदेच जास्त करीत असलेले दृष्टीस पडले, तरी अद्यापि ब्रिटिश बेटांतील अर्धेअधिक लोक शेती किंवा तत्संबंधींचीं इतर कामेंच करीत असतात. तेथील अर्धीअधिक जमीन शेतीची व कुरणाळ असून ब्रिटिश बेटें सुंदर सुंदर कुरणांबद्दल तर फारच प्रसिद्ध आहेत. खुद्द इंग्लंड व वेल्स हें एकच बेट घेतलें तर आपल्याला असें दिसून येईल कीं, त्यांतील पाऊण भागांत गहूं, जवस,

राय, बार्ली इत्यादींपैकीं कोणतें ना कोणतें पीक होत असतें. इंग्लंड व वेल्स यांचा आकार सामान्यत: तिकोनी असून त्याच्या तिन्ही बाजू जवळ जवळ सारख्या लांबीच्या आहेत. वरच्या म्हणजे उत्तरेच्या टोंकापासून पिनाइन पर्वताची रांग दक्षिणेकडे पसरली असून तीच पुढें डाव्या हातच्या म्हणजे पश्चिमेकडच्या बाजूला थेट टोंकापर्यंत पसरली आहे; व त्यामुळें इंग्लंडचा बहुतेक मध्यभाग व जवळ जवळ सर्वच पूर्वभाग सपाट बनला आहे. या भागांतील जमीन चिकणमातीची, हवा उष्ण व कोरडी, व पाऊस बेताचा अशी स्थिति असल्यामुळें यांत गव्हाचें पीक इतकें होतें कीं, हा भाग म्हणजे ब्रिटिश बेटांचें 'धान्याचें कोठार' असें मानण्याचा प्रघात आहे. नॉर्विच् इप्स्विच्, लंडन वगैरे गव्हाच्या मोठमोठ्या पेठा याच भागांत आहेत. सर्व ब्रिटिश बेटांत लागणारा गहूं या टापूंत होत असल्यामुळें हा भाग अतिशय महत्त्वाचा मानण्यांत येत असे. हल्लीं मात्र कॅनडा, हिंदुस्थान इत्यादि देशांतून येणारा गहूं या गव्हापेक्षां जास्त स्वस्त पडत असल्यामुळें, या सर्व भागांत गहूं करणें पूर्वींइतकें किफायतशीर राहिलें नसून तो कॅनडा, हिंदुस्थान इत्यादि परदेशांतून मागविणेंच जास्त परवडते. लंडनच्या बंदरांत आपणाला गव्हाच्या बोटी आलेल्या दिसल्या त्याचें कारण हेंच. याचा एक वाईट परिणाम मात्र असा होत आहे कीं, आपलेकडीलप्रमाणेंच खेड्यांतील शेतकऱ्यांची प्रवृत्ति शहरांत जाऊन तेथील उद्योगधंदे करण्याकडे होत चालली असून लहान लहान खेडीं उजाड पडत आहेत.

एक गहूं करायाचा म्हणजे, शेतकऱ्याला जवळ जवळ उभें वर्ष राबावें लागतें. सेप्टेंबरच्या सुमारास म्हणजे पावसाळा संपून खरीपाचे दिवस लागले म्हणजे, प्रत्येक शेतकरी आपापले घोडे व नांगर

घेऊन शेतावर जातो; जमीन नांगरून व तण वगैरे काढून निर्मळ केल्यावर तो मैंदानें मातीचीं मोठमोठीं ढिखळें फोडतो, व सर्व जमीन भुसभुशीत करतो. जमीन भुसभुशीत केल्यावर तो सर्व शेतभर कुळवानें मातीच्या पाळी घालतो, व त्यांत पाभरीनें दाणा पेरतो. नंतर सऱ्या मोडून दाणा व माती नीट मिसळण्याकरितां तो पाळ्यांवरून फराट फिरवितो. दाण्याला अंकूर फुटून जिकडे तिकडे हिरवळ झाल्यावर तो एकदां सर्व जमीन कोळपून फालतू गवत काढून टाकतो; व इतकें सर्व झालें म्हणजे त्याचें पेरणीचें काम संपलें असें होतें. ताट वाढीस लागून त्याला दाणा धरण्याच्या सुमारास शेताची राखण करावी लागते. राखणीच्या कामीं शेतकऱ्याला आपल्या मुलांबाळांची भारी मदत होते. राखणीचा सर्व प्रकार—गोफणीनें दगड मारणें, ओरडणें, डबे वाजवून किंवा मधून मधून बंदुकीचे बार करून पक्ष्यांना भेडसावणें, शेतावर मनुष्याच्या आकाराचें एकादें बुजगावणें उभारणें इत्यादि प्रकार आपले कडील-प्रमाणेंच असतो. पीक पुरें होऊन तें काढण्याची वेळ आली म्हणजे, सबंध शेत पिवळें धमक दिसूं लागून एकंदर देखावा फारच सुंदर दिसतो. नंतर विळ्यानें किंवा बऱ्याचश्या सुऱ्या असलेल्या एका लांब दांड्याच्या यंत्रानें तें सर्व शेत कापतात. नंतर कापलेल्या गवताच्या पेंढ्या बांधून त्यांची खळ्यावर एक वाटोळी गंज रचतात. नंतर कणसें झोडपून सुटे दाणे तयार झाले म्हणजे ते गिरणींत नेतात, व तेथें ते दळून पाव भाजण्याच्या भट्टयांत किंवा बिस्किटाच्या कारखान्यांत पाठवितात.

शेती म्हणजे एक साधें व कमी दर्जाचें काम नसून त्यांत कितीतरी निरनिराळ्या गोष्टी साधाव्या लागतात हें दाखविण्याकरितांच इतक्या सर्व गोष्टी सांगितल्या. इंग्लंडांतील शेतीचीं सर्व

कामें, व तीं करण्याचा क्रम हीं आपलेकडच्यासारखींच दिसतात, नाहीं? मात्र या प्रत्येक गोष्टी करतांना तिकडील शेतकरी शक्यतों यंत्रांचा उपयोग करतात. तसेंच ते पुष्कळशा गोष्टी समाईक पद्धतीनें व सहकारितेनें करतात; म्हणजे प्रत्येक यंत्र प्रत्येक शेतकरी निरनिराळें विकत न घेतां, पुष्कळजण मिळून तें घेतात, व पाळी-पाळीनें त्याचा उपयोग करतात. अर्थात् असें करतां येण्याला त्यांच्यांत एकी अवश्य असावी लागते. तसेंच ते आपल्याकडील शेतकऱ्यांपेक्षां जास्त शिकले सवरलेले असल्यामुळें नवीन नवीन खतें घालून जमिनीचा कस वाढविण्याचे प्रयत्न करितात; व सालो-साल एकच पीक न काढतां ते तीं आलटून पालटून करतात. म्हणजे एक वर्ष गहूं, तर दुसरें वर्षी जवस, तर तिसरें वर्षी बार्ली किंवा ओट. याचा फायदा असा होतो कीं, जमीन एकदम निःसत्व होऊन ती कधींच रिकामी टाकावी लागत नाहीं.

आतांपर्यंत आपण इंग्लंडमधील गव्हाची शेती व तेथील सर्व साधारण शेतकऱ्याचें काम या गोष्टी पाहिल्या; परंतु शेती या सदरा-खालीं भाजीपाल्याचे मळे करणें, फळाफुलांचे बागबगीचे करणें, शेळ्या--मेंढ्या, गायी--बैल, कोंबड्या--बदकें, डुकरें इत्यादि प्राणी पाळणें याही बाबी येतात; व या सर्वांवर आपली उपजीविका करणारा शेतकरीवर्गहि ब्रिटिश बेटांत फार मोठा असल्यामुळें आपण आतां त्याची थोडीशी माहिती मिळवूं. बटाटे, कोबी, नवलकोल, कॉलीफ्लॉवर, टर्निप् वगैरे भाज्या तिकडे बऱ्याच होत असल्या तरी त्यांतल्या त्यांत बटाटा अतिशय पिकतो. इंग्लंडचा बहुतेक पश्चिम भाग व विशेषतः आयर्लंड यांत बटाट्याचें पीक दांडग्या प्रमाणावर होतें. ३--३॥ शें वर्षांपूर्वीं बटाटा ही वस्तु इकडील लोकांना माहीतहि नव्हती. सर वॉल्टर रॅले नांवाच्या धाडशी

प्रवाश्यानें १५८६ मध्यें तो प्रथम इंग्लंडमध्यें आणिला. पण तेव्हांपासून बटाट्यानें बहुतेक जमीन व्यापून टाकली असून आज ब्रिटिश बेटांतील दहा बारा लाख एकर जमिनींत त्याचीच लागवड होत आहे. तिकडील माणसें बटाट्याचा उपयोग भाजी म्हणून तर करतातच; शिवाय ते तो गुरें, ढोरें, डुकरें यांसहि खावयाला घालतात; व तो त्यांना फारच मानवतो. कोबीचें पीकहि वाटेल त्या जमिनींत व बाराहि महिने होत असल्यामुळें शेतकरी तें मोठ्या हौसेनें करितात. ॲपल्स्, पेअर्स्, प्लम्स्, चेरीज, स्ट्रॉबेरीज, रास्पबेरीज वगैरे फळझाडांची लागवडहि बरीच करतात. परंतु ती बटाटा किंवा कोबी यांच्या लागवडीचे मानानें कमीच. सदरहु फळांना साधारण कोरडी हवा, बेताचा पाऊस, व थोडी चिकण आणि रेताड अशी दोन्ही प्रकारची जमीन मानवते; व या सर्व गोष्टी इंग्लंडच्या आग्नेय दिशेकडे केंट् परगण्याचे आजूबाजूला बऱ्याचश्या प्रमाणांत असल्यामुळें त्या भागांत या फळझाडांचे इतके मळे दृष्टीस पडतात कीं त्याला 'इंग्लंडचा मळा' असेंच म्हणतात हा भाग लंडनचे अगदीं जवळ असल्यामुळें सकाळपासून या फळांच्या गाड्या भरभरून लंडनचे रस्त्यानें जात असतात. लंडनशिवाय मेडस्टन्, कँटरबरी हींहि शहरें या भागांत फळबाजार म्हणून प्रसिद्ध आहेत. हीं सर्व प्रकारचीं फळें—कांहीं जूनमध्यें तर कांहीं जुलैंत, कांहीं आगस्टमध्यें तर कांहीं सेप्टेंबरांत अशीं—महिन्यामहिन्याचे अंतरानें तयार होत असल्यानें बागवानांना तीं वेंचण्याचें काम पांच-सहा महिने पुरतें. बाकींचीं झाडें साधारण उंच असल्यामुळें फळें तयार करण्याचें किंवा तीं तयार झालीं म्हणजे उतरण्याचें काम फारसें दगदगीचें नसतें. परंतु स्ट्रॉबेरीजचें झाड अगदीं जमिनीसरसें असल्यामुळें फळें जमिनीला चिकटून सडूं नयेत म्हणून झाडां-

खालीं गवत पसरावें लागतें. तसेंच तीं वेंचण्याकरितां सारखें ओणवें उभें राहावें लागतें. यामुळें या फळांची मशागत करणें अत्यंत जिकीरीचें व त्रासाचें होतें. नोव्हेंबरमध्यें वेंचणी संपली तरी, पुढील सहा महिन्यांत सर्व झाडें एक एक अशीं तपासून कळ्यांना कीड लागूं नये म्हणून बुंध्याला चुना वगैरे फांसणें, आणि विशेषत: पानें फांद्या कातरणें इत्यादि कामें करावयाचीं असल्यामुळें खुद्द बागवान व त्याच्या कुटुंबांतील सर्व माणसें सबंध वर्षभर गुंत-लेलीं राहातात. ब्रिटिश लोकांना ताजीं फळें खाण्याचा शौक फार आहे. आपल्याप्रमाणें मुखशुद्धीकरतां तर ते फळें खातातच; परंतु खुद्द जेवतांनाहि फळें किंवा फळांचेच केलेले इतर पदार्थ खाण्याचा प्रघात फार आहे. घरोघर पेअर्स्, ॲपल्स् वगैरेचीं झाडें असून मुलें शाळेंत जातांना, मधल्यावेळीं ब्रेड बरोबर खाण्याकरितां १।२ फळें खिशांत घेऊन जातात. परंतु याशिवाय मागें सांगितल्याप्रमाणें, त्यांचे निरनिराळ्या तऱ्हेचे पाक, जेली, जॅम वगैरे टिकाऊ पदार्थहि करून ठेवतात. ॲपल्स्ची दारूहि करतात. फळें साखरेच्या पाकांत घालून व बाटल्यांचीं तोंडें सीलबंद करून तीं परदेशींहि पाठवितात.

इंग्लंडचा पूर्वेकडील सखल भाग सोडला म्हणजे, ब्रिटिश बेटांचा बहुतेक भाग डोंगराळ आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. 'डोंग-राळ भाग' म्हणजे नापीक व निरुपयोगी असें आपल्याला वाटतें; व तें हिंदुस्थानचे दृष्टीनें थोडें-फार खरेंहि आहे. परंतु ब्रिटिश बेटांतील डोंगर हे तेथील सपाट व सुपीक शेतजमीनीपेक्षांहि जास्त उपयोगी व महत्त्वाचे आहेत. कारण त्यांवर उगवणारें सर्व प्रका-रचें लहान मोठें गवत व त्यांत दडून बसलेले लोखंड, कोळसा, जस्त, स्लेट, दगड, चुनखडी वगैरे सर्वच पदार्थ ब्रिटिश बेटांचें पोषण करीत असून, जगांतील त्यांच्या वैभवालाहि कारणीभूत झाले आहेत.

खुद्द इंग्लंडचा निम्मा भाग व वेल्स, स्कॉट्लंड, आयर्लंड् यांचा पाऊण भाग त्यावर बाराहि महिने थोडाथोडा पाऊस पडत असल्यामुळें कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या गवतानें हिरवागार दिसतो. विशेषत: आयर्लंड् तर असल्या गवताळ किंवा कुरणाळ भागांविषयीं सर्व जगांत प्रसिद्ध असून त्याला 'पाचूचें बेट' असें सुंदर नांव मिळालें आहे. त्याचें एकंदर क्षेत्र इंग्लंडच्या निम्यानेंच असलें तरी तेथील गुरां-ढोरांची संख्या इंग्लंडच्या बरोबरीनें आहे. आणि खुद्द आयर्लंड-मध्यें तर माणसांच्या संख्येपेक्षां गुरांचीच संख्या जास्त आहे असें म्हणतात.

डोंगरावरच परंतु पायथ्याशीं जें गवत उगवतें तें उंच वाढूं शकतें. कारण माथ्याचे मानानें पायथ्यावर दलदल जास्त असते, व हवाहि उष्ण असते. जसजसे आपण माथ्याकडे जाऊं तसतशी हवा थंड, वरवरची मऊ माती खालीं घरंगळून जाऊन उरलेली मुरमाड जमीन, व पावसाचें पाणी वाहून गेल्यामुळें आलेली कोरड अशी स्थिति असल्यामुळें, येथें उगवणारें गवत खुरटें खुरटें होत जातें. गाई, बैल, डुकरें यांच्या दांतांची व पायांची रचना कांहीं विशेष प्रकारची असल्यामुळें पायथ्याचे उंच गवतच अशा प्रकारचे प्राणी खातात; तर उलट शेळ्या, मेंढ्या, बकरीं, घोडे यांची दंत-रचना निराळी असल्यामुळें त्यांच्या प्रकृतीला उंच गवताऐवजीं खुरटें गवतच अधिक मानवतें. मागें म्हटल्याप्रमाणें आयर्लंडची एकंदर रचना एकाद्या उथळ बशीसारखी म्हणजे मधें खोलगट व भोंवतालीं उंचट अशी असल्यामुळें मध्यभागांतील गवत उंच वाढतें व म्हणूनच, आपण मघांशीं पाहिल्याप्रमाणें तेथें गुरें व डुकरें फार आहेत. उलट स्कॉट्लंड व वेल्स यांतील डोंगर उंच

असल्यामुळें तेथें गुरांपेक्षां शेळ्यामेंढ्याच जास्त असतात. गाईचा उपयोग मुख्यत: दूध व त्यापासून होणारें लोणी, चीज वगैरे करि-तांच असला तरी, तिकडे तिचा मांसाचे कामीं विशेष उपयोग होतो.

गवळ्याची एकंदर दिनचर्या आपलेकडीलप्रमाणेंच असली तरी, गाईला खाणें घालणें, दूध काढणें, दुभत्याचीं भांडीं घासणें-पुसणें,दूध तापवणें, लोणी व चीज करणें इत्यादि सर्व बाबी अत्यंत स्वच्छतेनें, शास्त्रोक्त पद्धतीनें व यंत्राचे साह्यानें होतात; त्यामुळें गाई व गवळी यांची स्थिति आपलेकडीलपेक्षां बऱ्याच चांगल्या प्रकारची असते. शिवाय दुधाचा धंदा घरोघर न करतां निघालेलें सर्व दूध डेअऱ्यांमध्यें पाठविलें जातें, व त्यांचेच मार्फत रतीब घालणें व उरलेल्या दुधाचा योग्य तो विनियोग करणें हीं कामें होत असल्यामुळें दुधाचा एकंदर धंदा फार किफायतशीर होतो. अशा डेअऱ्या आयर्लंडमध्यें खूपच असल्यामुळें, त्याला ब्रिटिशांची 'डेअरी' असें म्हणतां येईल. आपलेकडे बैलांचा उपयोग बराचसा नांगर, गाड्या वगैरे ओढण्याचे कामीं करतात; परंतु तिकडे हीं कामें घोडे व यंत्रें करीत असल्यामुळें बैलांचा उपयोग मांस, कातडीं, शिंगें, केस इत्यादींच्या रूपानेंच जास्त होतो. डुक्कर म्हटलें म्हणजे मूर्तिमंत घाण आपल्या डोळ्यांपुढें उभी राहते; परंतु तिकडे डुकरें मुद्दाम पाळीत असल्यामुळें यांचीहि निगा गाईबैलांप्रमाणेंच राखली जाते. तीं उकिरड्यांवर किंवा मोऱ्यां-नाल्यांतून चरत नसून घरांतील पाळीव प्राण्यांप्रमाणेंच बटाटे, भाजीपाल्याचीं देठें, अंबोण, उष्टें, खरकटें वगैरेवर पोसलीं जातात. डुक्कर जितकें चांगलें तितकी त्याला किंमतहि जास्त येत असल्यामुळें त्याच्यावर खर्च करायला शेतकऱ्यांना कांहींच वाटत नाहीं.

गाई, बैल, डुकरें वगैरे प्राण्यांचें उत्पन्न बरेंच असलें तरी शेळ्या-मेंढ्यांच्या उत्पन्नाचे मानानें तें कमीच ठरेल. हें उत्पन्न म्हणजे त्यांची सागुती येवढेंच नसून मुख्यतः लोंकर हें होय. उंच उंच गवताच्या गवताळ जमीनीपेक्षां आंखूड गवताची कुरणाळ जमीनच ब्रिटिश बेटांत जास्त असल्यामुळें शेळ्या-मेंढ्यांसारखे प्राणी नसते तर सबंध स्कॉट्लंड व इंग्लंडचा अर्धाअधिक भाग जवळ जवळ निरुपयोगी ठरला असता. मेंढ्यांचे चांगले ५-२५ प्रकार असून त्यांपैकीं प्रत्येक प्रकारच्या मेंढ्यांना कांहीं विशिष्ट प्रकारचीच जमीन लागते असें सांगतात. सबंध ब्रिटिश बेटांत ३-४ कोट मेंढ्या असून त्यांपैकीं बऱ्याच एकट्या स्कॉटलंडमध्यें आहेत.

धनगरांचीं कामें व एकंदर आयुष्यक्रम हीं गवळ्यापेक्षां बरींच निराळ्या प्रकारचीं असल्यामुळें त्यासंबंधींची माहिती तुम्हांला बरीच मनोरंजक वाटेल. धनगर म्हटला कीं रिकामटेकडा, आळशी व जड बुद्धीचा अशी आपली कल्पना असते; परंतु ती तिकडील धनगरांसंबंधीं तरी चुकीची आहे असें आपणांस दिसून येईल. बहुतेक मेंढ्या वर्षाच्या सुरुवातीला वितात; व त्या वेळीं धनगरांना अतिशयच काम पडतें. त्यांना या कुरणांतून त्या कुरणांत—जेथें जेथें कळप असतील तेथें—सारखें राहावें लागतें. कुरणें जात्याच उंच डोंगरावर असल्यामुळें, वारा अतिशय सोसाट्याचा वाहतो; शिवाय हवाहि अतिशय थंड असते; त्यामुळें तेथील धनगरांना आपलेकडील धनगरांप्रमाणें नुसत्या उघड्या माळावर राहणें शक्य नसतें; व म्हणून ते तात्पुरत्या झोंपड्या बांधून त्या इकडून तिकडे हलवितां याव्यात म्हणून त्यांना चाकें बसवितात. त्याच सुमारास मार्चचे झोंबरे वारे सुरू होत असल्यामुळें, व्यायला टेकलेल्या मेंढ्यांचें किंवा नुकत्याच झालेल्या करडांचें थंडीपासून रक्षण करण्याकरितां

त्यांना आडोशाच्या जागा तयार करून त्यांत शेकोटीचीहि व्यवस्था करावी लागते. हिंवाळ्याचे सुमारास मेंढरावरील लोंकर बरीच वाढून कापण्यासारखी होते. परंतु तिच्यांत अतिशय मळ सांचल्यामुळें तिच्या जटा वळतात; आणि म्हणून लोंकर कातरण्यापूर्वी मेंढ्या धुण्याचें गलिच्छ काम उरकावें लागतें. मेंढ्यांना चांगलेंसें पोहतां येत नसल्यामुळें, त्यांना मोठ्या नदींत किंवा ओढ्यांतहि घालतां येत नाहीं; व तेवढ्याकरितां ओढ्याचें पाणी एका निराळ्या पाटांतून घेऊन त्यांत त्या बुडणार तर नाहींत, परंतु त्यांचें सर्व अंग बुचकळून तर निघेल अशी व्यवस्था करावी लागते. प्रत्येक मेंढी त्या पाटांतून ओळीनें जात असतां, कांठावरील मनुष्य एका लांब काठीनें तिला पाण्यांत रोखून ठेवतो, व अशा प्रकारें सर्व मेंढ्या धुऊन काढतो. न्यूझीलंड ऑस्ट्रेलिया इत्यादि देशांत-जेथें हजारों मेंढ्या धुवाव्या लागतात तेथें—हें धुण्याचें काम यंत्राचे साह्यानेंच करावें लागतें. लोंकर धुतल्यावर तिचा स्वाभाविक तजेला नाहींसा होतो, म्हणून २।४ आठवडे ती तशीच अंगावर ठेवून नंतर ती कातरावी लागते. कातरण्याच्या कामालाहि एक निराळी जागा लागते. एका अरुंद बोळकंडींतून एकेका मेंढीला सोडतात; व बोळकंडीच्या दुसऱ्या तोंडाशीं उभा असलेला मनुष्य मेंढी आली रे आली कीं, तिला आपल्या पायांत पकडून तिच्या दोन्ही बाजूंनीं आपली कातर चट्दिशीं फिरवितो, व पायांतील मेंढी सोडून मागची मेंढी पकडतो. हें कातरण्याचें काम हल्लीं यंत्रांनींच करतात. मेंढ्या धुतल्यावर व भादरल्यावर, गुंजडा झालेली सर्व लोंकर विंचरणें, ती चरक्यावर कांतणें, हातमागावर तिचें कापड विणणें, व शेवटीं कापडाचे कपडे शिवणें इत्यादि सर्व कामें पूर्वीं शेतकरी व त्याची बायकामुलें घरच्याघरींच करीत; आणि म्हणून सबंध कुटुंब सर्व वर्षभर

कोणत्या ना कोणत्यातरी कामांत गुंतलेलें असे. शिवाय कपड्यांसारखी संसारांतील एक मुख्य गरज घरांतल्याघरांत भागवितां येत असल्यामुळें प्रत्येक कुटुंब एक प्रकारें स्वतंत्र असे. परंतु कोळसा व लोखंड यांची निपज जास्त जास्त होऊन वाफ व वाफेचीं एंजिनें यांचा उपयोग सर्रास होऊं लागल्यापासून घरीं हातांनीं होणारीं सर्व कामें गिरण्यांत यंत्रांवर होऊं लागून, पूर्वीं खेड्यांतून घरोघर चालणारीं कामें आतां फक्त शहरांतून गिरण्यांत चाललेलीं दिसतात. यामुळें स्वतंत्र शेतकऱ्याला भाडोत्री मजुराचें स्वरूप प्राप्त झालें, व खेड्यांतील वस्ती शहरांचे जवळ जवळ येऊन शहरें मात्र भरमसाट वाढूं लागलीं. इंग्लंडच्या उत्तरेस असलेल्या यॉर्कशर परगण्यांतील लीड्स, ब्रॅड्फर्ड, हॅलिफॅक्स वगैरे शहरें अशाच प्रकारें मोठीं बनलीं असून एके वेळीं सर्व परगण्याभर पसरलेला लोंकरीचा धंदा या शहरांत येऊन गोळा झाला आहे. उत्पन्न होणाऱ्या लोंकरीची विल्हेवाट तावडतोब व्हावी म्हणून गिरण्या व कारखाने काढले; परंतु या कारखान्यांचीच उत्पादनशक्ति इतकी वाढली आहे कीं, ब्रिटिश बेटांत होणारी लोंकर त्यांना अपुरी पडत असून न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिआ वगैरे परदेशांतून लोंकर आणावी लागते. नाहींतर तो कारखानाच बंद करावा लागून त्यांत गुंतविलेलें भांडवल अंगावर पडावयाचें, व कामावरील मजुरांची उपासमार व्हावयाची !

आतांपर्यंत आपण ब्रिटिश बेटांतील शेती, तींत येणारे दुसरे निरनिराळे धंदे व हे धंदे करणारे शेतकरी लोक इत्यादिसंबंधींची माहिती मिळविली. वास्तविक ब्रिटिश बेटें हा शेतीचाच देश परंतु शेतीसंबंधींची बहुतेक सर्व कामें आतां यंत्रांनींच होऊं लागल्यामुळें या देशाचें मूळचें शुद्ध शेतीचें स्वरूप पालटून त्याला कारखान्याच्या देशाचें रूप येऊं लागलें आहे. व पुष्कळांना अशी भीति वाटते

कीं ब्रिटिश बेटांतील शेतीसारखे कच्चा माल उत्पन्न करण्याचे उद्योग-धंदे बसत जाऊन त्याची जागा पक्का माल उत्पन्न करण्याचे कारखानेच घेतील. लोंकरीच्या गिरण्या, कांतड्याचे कारखाने, दुधाच्या डेअऱ्या इत्यादि यांत्रिक कारखाने चालविण्यास लागणारा बहुतेक कच्चा माल तरी खुद्द ब्रिटिश बेटांतच उत्पन्न होतो. परंतु आज जिकडे तिकडे उभ्या असलेल्या कापसाच्या कापडाच्या, गिरण्या पाहिल्या म्हणजे, आपणांस तसें म्हणतां येणार नाहीं; कारण ब्रिटिश बेटांत कापसाचें एकहि बोंड न पिकतां कापडाचें उत्पन्न मात्र फारच मोठें आहे. सर्व कापूस अमेरिका, ईजिप्त, हिंदुस्थान इत्यादि देशांतून येत असून फक्त यंत्रें व तीं चालविण्यास लागणारी वाफ येवढीं मात्र ब्रिटिश बेटांत सांपडण्याऱ्या लोखंडापासून व कोळशापासून होतात; म्हणजे बऱ्याच शेतकऱ्यांना शेतीचें काम सोडून कापडाच्या गिरण्यांतून किंवा कोळशा-लोखंडाच्या खाणींतून मजूर म्हणून काम करावें लागत आहे.

विचाराकरितां प्रश्न


प्रकरण ६ वें


१ जमीन नांगरून धान्य पिकविणें एवढेंच काम आपलेकडे शेतकी या सदरांत येतें. ब्रिटिश बेटांत आणखी कोणकोणत्या कामांचा शेतकींत अंतर्भाव होतो ?

२ ब्रिटिश बेटांत शेतकऱ्यांची वस्ती कोणकोणत्या भागांत विशेष आढळते ? त्या त्या भागांत कोणत्या प्रकारची शेती विशेष होते ? कां ?

३ ब्रिटिश बेटांतील कोणत्या विशेष भागाला ‘ इंग्लंडचा मळा ’ म्हणतात ? या मळ्यांत कोणकोणतीं फळझाडें होतात ? फळें बाराहि महिने खावयास मिळवींत म्हणून काय योजना केलेली असते ?

४ गव्हाच्या शेतीचें थोडक्यांत वर्णन करून गहूं करणारा शेतकरी बाराहि महिने कसा खपत असतो हें सांगा.





वर दिलेल्या चित्रांचें बारकाईनें निरीक्षण करून पुढील प्रश्नांचीं उत्तरें द्याः—
(१) तीं घरें कोणकोणत्या भागांतील आहेत? (२) छपरें, कुंपणें, धुराडीं इत्यादि बाबतींत काय फरक दिसतो? (३) तो फरक कां केलेला असावा? (४) तेथील प्राणी, आभाळ, व भोंवतालची जमीन यांसंबंधीं विशेष काय सांगता येईल?

५ ब्रिटिश बेटांतील शेतकऱ्याच्या स्थितीची आपलेकडील शेतकऱ्याच्या स्थितीशीं तुलना करा. त्याची स्थिति जास्त चांगल्या प्रकारची असल्यास ती कां ?

६ डेअरी म्हणजे काय ? आयर्लंडमध्येंच डेअऱ्या विशेष कां ? रतीबाला घालून उरलेल्या दुधाचा विनियोग कसा करतात ?

७ आपलेकडील गाईबैल व तिकडील गाईबैल यांत कोणकोणत्या बाबतींत फरक आहे ? तिकडील गुरें सरस असल्यास तीं तशीं कां ?

८ तिकडील धनगराचा सर्व सामान्य आयुष्यक्रम सांगा; त्याला कोणकोणतीं कामें करावीं लागतात ?

प्रकरण ७ वें

ब्रिटिश कोळी

आतांपर्यंत आपण ब्रिटिश लोकांचे चार-पांच मुख्य मुख्य धंदे, व ते ते धंदे करणाऱ्या माणसांचा सर्वसाधारण आयुष्यक्रम हे थोडक्यांत पाहिले. परंतु अद्यापहि एक मोठा धंदा व एक मोठा वर्ग असा राहिला आहे कीं, त्याचीहि थोडीबहुत माहिती आपणांस असणें आवश्यक आहे. शिवाय ती तितकीच मनोरंजकहि आहे. हा धंदा म्हणजे मच्छीमारी, व हे लोक म्हणजे तो धंदा करणारे कोळी.

ब्रिटिश लोकांच्या खाण्याच्या पदार्थांपैकीं खुद्द ब्रिटिश बेटांत उत्पन्न होणारा मुख्य पुरवठ्याचा पदार्थ म्हणजे गहूं. परंतु हा गहूंहि ब्रिटिश बेटांचे मानानें इतका अपुरा पडतो कीं, त्यावर त्यांचें फार तर तीन-चार महिनेच चालेल. म्हणूनच गव्हाच्या धंद्याचे जोडीला ब्रिटिश शेतकऱ्याला भाजीपाला, मांस, अंडीं वगैरेचे जोडधंदे करावे लागतात. ब्रिटिश लोकांचें येवढ्यानेंहि भागत नसून आणखी एक पुरवठ्याचा पदार्थ देवानें त्यांना बहाल केला नसता

तर त्यांची खरोखरच मोठी हलाखीची स्थिति झाली असती. हा पदार्थ म्हणजे मासा हा होय. अंगावर चरणाऱ्या बकऱ्यांच्या लोंकरीनें व पोटांतील कोळशाच्या उबेनें ब्रिटिश बेटांतील डोंगर आपल्या कुशींत वसती करून राहणाऱ्या लक्षावधि लोकांचें थंडीपासून रक्षण करीत आहेत असें आपण मागें पाहिलें. डोंगरांप्रमाणेंच दुसराहि एक महात्मा ब्रिटिश लोकांचें नुसतें रक्षणच नव्हे तर पोषणहि करीत आहे. हा महात्मा म्हणजे ब्रिटिश बेटांभोंवतीं सभोंवार पसरलेला समुद्र होय. या समुद्राच्या खंदकामुळें ब्रिटिश लोकांचें आज शेंकडों वर्षें नेपोलिऑं, कैसर, वगैरेसारख्या मी मी म्हणणाऱ्या शत्रूंपासून रक्षण झालें असून त्याच्या पाण्यांत वावरणाऱ्या अनंत माशांवर त्यांचें पोषणहि होत आहे. शिवाय हें पोषण अगदीं फुकटांत होत आहे. कारण मेंढरें पाळावयाला, गहूं पिकवावयाला, किंवा लोखंड व कोळसा काढावयाला खर्च तरी येतो; पण मासे पाळावयाला कांहींच खर्च येत नसून सर्व काम परभारें समुद्रच करीत आहे! ब्रिटिश लोक मोठे दैववान् आहेत, नाहीं? अथवा दैववान् आहेत असें तरी कसें म्हणतां येईल? त्यांनीं आपल्याला आपल्या उद्योगाच्या व बुद्धीच्या जोरावर दैववान् करून घेतलें आहे असें म्हणणेंच जास्त शोभेल. उथळ समुद्रांतच पुष्कळसे वनस्पति होत असल्यामुळें अशा प्रकारचा समुद्र माशांना फार मानवतो. हे सर्व वनस्पति तर मासे फस्त करतातच; पण तेवढ्यानेंहि त्यांचें भागत नसल्यामुळें ते आपल्या भाईबंदांचाहि फन्ना उडवायला कमी करीत नाहींत! प्रत्येक मोठा व बलवान् मासा आपल्यापेक्षां लहान व दुर्बल माशाला खाऊन टाकून स्वतःच्या पोठाची खळगी भरण्याच्या खटपटींत असतो! प्रत्येक जीव दुसऱ्या जीवावर जगत असतो असें म्हणतात त्याचें प्रत्यंतर माशाचे बाबतींत पूर्णपणें येतें. परंतु हें असें

होतें हेंहि एक प्रकारें बरेंच आहे. कारण एकेक मासा दरवर्षीं लक्षावधि अंडीं घालतो ! आणि हीं सर्वच्या सर्वच अंडीं उबून त्यांचे मासे झाले असते तर काय कहर उडाला असता ! समुद्र अपुरा पडून त्यांनीं जमीनहि व्यापिली असती ! आणि कदाचित् मनुष्यानें माशांना नाहींसें करण्याऐवजीं माशानेंच मनुष्याला नाहींसें केलें असतें ! हा सर्व प्रसंग टळावा, मनुष्य व मासा या दोघांनाहि पुरेसें भक्ष्य मिळावें म्हणूनच ही सृष्टीची योजना असावी, दुसरें काय ?

जीवनाचे दृष्टीनें माशांना उथळ किनाराच जास्त सोइस्कर होत असल्यामुळें, जेथें जेथें किनारा उथळ असतो तेथें तेथें मासे फार असतात. आणि याच कारणानें उत्तर अमेरिकेंतील कॅनडा, यूरोपमधील नॉर्वे, अशियांतील जपान, हिंदुस्थानांतील मद्रास या देशांच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें मच्छीमारी फारच मोठ्या प्रमाणांत चालते. यूरोपच्या उत्तरेस परंतु ब्रिटिश बेटांच्या पूर्वेस असलेला उत्तर समुद्रहि बराच उथळ असल्यामुळें पूर्व किनाऱ्यावरील बहुतेक लोकांचा मुख्य धंदा मासे पकडणें व ते लंडनला पाठविणें हाच झाला असून ग्रिम्सि, यारमथ, हीं शहरें माशाच्या मोठमोठ्या पेठा म्हणून प्रसिद्ध आहेत. या किनाऱ्यावर व विशेषत: 'डॉगर् बँक्' म्हणून जो एक विशेष टापू आहे त्यांत नाना रंगांचे, विविध जातींचे, व निरनिराळ्या आकारांचे लहानमोठे अनंत मासे वसती करून राहिले आहेत. 'कॉड' हें एकच नांव आपल्या ऐकण्यांत येतें; पण याशिवाय हॅडॉक्, हेरिंग्, ह्लेस, सोल, टर्बॉट, वगैरे कितीतरी नांवांचे मासे तेथें सांपडत असून त्यांपैकीं कांहीं सकाळचे न्याहारीला तर कांहीं संध्याकाळचे मुख्य जेवणाचे वेळीं, कांहीं औषधांकरितां तर कांहीं चरबीकरितां, अशा निरनिराळ्या रीतीनें उपयोगी पडतात.

कोळ्याचें काम शेतांत राबणाऱ्या शेतकऱ्याच्या कामापेक्षां किंवा

खाणींत उरस्फोड करणाऱ्या मजुराच्या कामापेक्षां बरेंचसें सोपें व सुखावह दिसतें. एकतर समुद्रावरची मोकळी, शुद्ध व सम हवा; दुसरें माशासारखें पौष्टिक अन्न; आणि म्हणून सामान्यतः हे लोक जास्त सुदृढ व आनंदी दिसतात यांत शंका नाहीं. तथापि मोठमोठ्या वादळांत मासे धरण्याचें काम खाणींतील कामाइतकेंच धोक्याचें असतें. खाणींत गुदमरून किंवा होरपळून मरण्याचा जितका संभव तितकाच या कामांत बुडून मरण्याचा संभव. तथापि कोणास जळून मरण्यापेक्षां बुडून मरणेंच जास्त सोयीचें व कमी दुःखाचें व म्हणूनच अधिक आवडीचें वाटल्यास गोष्ट निराळी!

कोळी ज्या जहाजांतून मासे धरण्याकरितां जातो त्याला तिकडे ' ट्राउलर ' असें म्हणतात. जहाजाला एक मोठें जाळें बांधलें असून तें पाण्यांत सोडलेलें असतें. जहाज चालूं लागलें म्हणजे तें जाळेंहि त्याचेबरोबर फरपटत जातें. जाळ्याचें तोंड एका लांकडाच्या योगानें सताड उघडें ठेवण्याची व्यवस्था केलेली असते, व त्याच्या बुडाशीं एक दोर बांधला असतो; तो तळच्या रेतीवरून घासून जाऊं लागला म्हणजे प्लेस्, सोल वगैरे रेतीला चिकटून बसणारे मासे डिंवचले जातात, व आयतेच त्या जाळ्यांत सांपडतात. वास्तविक ' ट्राउलर ' हें नांव या जाळ्याला असून त्याच्याचवरून सबंध जहाजालाहि ' ट्राउलर ' असेंच म्हणतात.

कोळी सकाळीं घरांतून निघण्यापूर्वी मेणकापडी कपडे व रबरी बूट घालतो. कारण मासे धरणारांना पुष्कळ वेळां प्रत्यक्ष पाण्यांत किंवा चिखलाच्या रबड्यांत उतरावें लागतें. जहाज जरा पुढें जाऊन उथळ पाणी लागलें म्हणजे कोळी आपलीं जाळीं जहाजाच्या दोन्ही अंगांनीं खालीं सोडतात; व आतां आपल्याला खूप लग्गा सांपडणार अशा आशेनें तासन् तास वाट पाहात बसतात. त्यांच्या

आशेची सहसा निराशा होत नाहीं. कारण जाळें भरलेंसें वाटून जेव्हां कोळी तें वर ओढतात तेव्हां त्यांना खरोखर कितीतरी मासे जाळ्यांत सांपडलेले दिसतात ! मासे वर आल्याबरोबर ते निवडणें, स्वच्छ करणें, व खालीं ठेवलेल्या बर्फांत घालून पॅक्‌बंद करणें इत्यादि कामें भराभर उरकून ते किनाऱ्याकडे परत फिरतात. कारण त्यांचा घाऊक सवदा करून लंडनच्या बाजारांत ताबडतोब विक्रीकरितां पाठविण्यासाठीं कितीतरी व्यापारी कोळ्यांची बंदरावर वाट पाहात उभे असतात.

समुद्राच्या तळाशीं गाळांत बसलेले मासेच अशा ट्रॉउलरमध्यें पकडतां येतात. परंतु हेरिंग्‌सारखे पाण्यावर तरंगणारे मासे पकडण्याकरितां निराळ्या प्रकारच्या जाळ्यांचा उपयोग करावा लागतो. हें जाळें अतिशय लांब असून तें जहाजाबरोबर उभेंच्या उभें तरंगत राहावें म्हणून त्याला खालीं जड वजनें व वर हलकीं बुचें लाविलेलीं असतात. लाटेबरोबर जहाज डुलत डुलत चाललें म्हणजे शक्यतों तें हेरिंगच्या झुंडीपुढून नेण्याचा कोळ्यांचा प्रयत्न चाललेला असतो. आणि या त्यांच्या प्रयत्नाला यश येऊन जेव्हां हजारों मासे जहाजाला आपटून जाळ्यांत सांपडतात तेव्हां कोळ्यांना अतिशय आनंद होतो. हे मासे बरेच दिवस टिकतात; व ते तसे टिकावेत म्हणून एका विशिष्ट तऱ्हेनेंच ते चिरून व धुऊन धुरावर सुकवावे लागतात. कधीं कधीं ते नासूं नयेत म्हणून त्यांत मीठ भरावें लागतें. चिरणें, सुकवणें, खारवणें, वगैरे किचकट कामें करण्यांत कोळ्यांना घरांतील बायका-मुलांची फार मदत होते. हेरिंग् माशांचे थवे नेहमीं एकाच ठिकाणीं नसतात. ते समुद्राच्या या भागांतून त्या भागांत सारखे स्थलांतर करीत असतात; आणि म्हणून कोळी लोक व त्यांचीं बायकामुलें यांनाहि त्यांचेबरोबर जागोंजाग हिंडावें लागतें.

हेरिंग्‌चा मोसम संपला म्हणजे बिचाऱ्यांना आपापल्या घरीं स्वस्थ-पणें राहतां येतें. कांहीं कांहीं मासे दिवसभर समुद्राचे तळाशीं असून फक्त रात्रींच वर येतात. असे मासे धरण्याकरितां कोळ्यांना कधीं कधीं रात्रींहि काम करावें लागतें.

ब्रिटिश बेटांतील पुष्कळशा लोकांना समुद्राची संवय असते; आणि कोळ्यांना तर त्याचें कांहींच वाटत नाहीं. ब्रिटिश बेटांतील कोळी मासे पाकण्याचे कामांत व एकंदर समुद्रावर लांब लांब सफरी मारण्याचे कामांत पूर्वापार फार नांवाजलेले असून यांच्याच पूर्वजांनीं दूरदूरच्या किनाऱ्यांना जाऊन निरनिराळे प्रांत शोधून काढले आहेत; व तेथें वसती करून ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करण्यास मद्दत केली आहे.

सफरी करणारे खलाशी व वसाहती बसविणारे नावाडी जसे कोळ्यांतून निघाले, तसे मोठमोठे व्यापारी, दर्यासारंग व शोधक हेहि कोळ्यांतूनच निघाले आहेत. स्पेनच्या आरमाराचा बुराडा करणारा सर फ्रान्सिस् ड्रेक, बटाटा व तंबाकू शोधून काढणारा सर वॉल्टर रॅले, हॉकिन्स वगैरे व्यक्ति पुढें इतिहासांत दर्यासारंग व शोधक म्हणून प्रसिद्ध झाल्या असल्या तरी ते प्रथम कोळ्यांच्याच वंशांतले व कोळ्याचाच धंदा करणारे लोक होते. अमेरिका खंडाचा शोध लावणारा कोलंबस, व त्यानंतर कॅनडा, ऑस्ट्रे-लिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका वगैरे दूरदूरच्या देशांत जाऊन तेथें प्रथम वसती करून वसाहती बनविणारे सर्व लोक जन्मानें नसले तरी कर्मानें व वृत्तीनें कोळीच होत. अशा-प्रकारें ब्रिटिश लोकांना कोळी जात व त्यांचा धंदा यांबद्दल आदर वाटत असून आज ब्रिटिश बेटांचा 'जलराणी' (मिस्ट्रेस् ऑफ् धी सी)

म्हणून जो जगांत गौरव होतो आहे तो कोळ्यांच्याच अंगच्या गुणांवर याची त्यांना मनांतून पूर्ण जाणीव आहे.

ब्रिटिश राष्ट्र दर्यावर्दी बनण्याला जसा हा कोळ्यांचा धंदा कारणीभूत झाला आहे, तसाच त्यांचा किनाराहि कारणीभूत झाला आहे. ब्रिटिश बेटें लहान लहान असून त्यांत असा एकहि भाग आढळणार नाहीं, कीं तो समुद्रापासून बराच दूर आहे. किनाऱ्याचा मधला मधला भाग पाण्यानें वाहून गेल्यामुळें एकंदर किनारा दंतुर झाला आहे, व जागोजाग आखातें व भूशिरें उत्पन्न झालीं आहेत; व त्यांच्याचमुळें बेटें व बंदरें निर्माण झालीं आहेत. व या सर्वांचा परिणाम एकंदर राष्ट्र शूर व दर्यावर्दी बनण्यांत झाला आहे.

विचाराकरितां प्रश्न
प्रकरण ७ वें

१ कोंकणांतील एखाद्या गांवीं शेजारच्या कोळीवाड्यांत आपण गेलों तर कोळ्यांच्या घरांभोंवतीं कोणकोणत्या गोष्टी दृष्टीस पडतील ? ते लोक माशांशिवाय आणखी दुसरे कोणते प्राणी खात असतील ?

२ प्रत्येक प्राण्याचा रंग तो ज्या परिस्थितींत राहतो त्या परिस्थितीला साजेसा असतो. बर्फाळ देशांत राहणाऱ्या प्राण्यांचा रंग पांढुरका असतो; गवताळ जमिनींत राहणाऱ्यांचा हिरवट असतो; रेताड वाळवंटांत राहणाऱ्यांचा भुरकट असतो. माशांचे बाबतींत तसें काय सांगतां येईल ?

३ प्रत्येक प्राण्याला स्वतःचें रक्षण करण्याकरितां म्हणून कांहींना कांहीं साधन असतें. गाईबैलांना शिंगें, आणि वाघसिंहांना नखें व दांत असतात. तसें माशांना काय ?

४ महाराष्ट्रांतील ब्राह्मण मासे खात नाहींत; बंगालमधील ब्राह्मण ते खातात, असें कां ? काश्मिरी ब्राह्मण ते खात असतील कीं नाहीं ?

५ उथळ समुद्रांतील मासे पाण्याच्या पृष्ठभागावरील वनस्पति खातात.


खोल समुद्रांत राहणारे मासे काय खात असतील ? त्यांना हवा कशी मिळत असेल ?

६ पुष्कळ वेळां धंद्यावरून मनुष्य ओळखूं येतो असें म्हणतात. कोळी ओळखतां येईल काय ? कोणत्या खुणांनीं ?

प्रकरण ८ वें

आणखी कांहीं पोटधंदे

ब्रिटिश बेटांतील लोकांना कोळ्यांबद्दल इतका अभिमान वाटत असला तरी व त्यांतूनच खलाशी, दर्यावर्दी, शोधक व्यापारी वगैरे लोक निर्माण झाले असले तरी किनाऱ्यावरच्या सर्वच लोकांना कांहीं कोळी, खलाशी, किंवा व्यापारी होतां येत नाहीं. कारण त्याला स्वतःचीं जहाजें व इतर उपकरणेंहि असावीं लागतात. अर्थात् ज्यांचेपाशीं अशीं कांहीं उपकरणें नसतात अशा कितीतरी लोकांना आणखी कांहीं बारकेसारके धंदे करून आपली उपजीविका करावी लागते. अशा प्रकारचा एक पोटधंदा म्हणजे उन्हाळ्याच्या चार महिन्यांत आपल्या राहत्या घरांतून सरदारगृहासारख्या खाणावळी काढणें, व त्यांतून दूरदूरचे सुखवस्तु लोक हवा खाण्याकरितां किनाऱ्यांवर राहण्यास येतात तेव्हां त्यांची राहण्यासवरण्याची सोय करणें हा होय. येणारे सर्व लोक चांगले श्रीमंत असून हौसेकरितां येत असल्यामुळें, व हौसेला मोल नसल्यामुळें किनाऱ्यावरच्या गरीब लोकांना या चार महिन्यांत चांगलीच प्राप्ति होऊन बाराहि महिने त्यांची तिच्यावर गुजराण होऊं शकते. परंतु त्यांना कामहि खूपच पडतें. मजा मारणारे बोलूनचालून मजा मारणेकरितांच आले असल्यामुळें सर्व काम त्या बिचाऱ्यांसच करावें लागतें.



मजा मारण्याकरितां आलेल्या मुलांमाणसांनीं फुललेला समुद्रकिनारा.

अशा प्रकारचीं हवा खाण्याचीं ठिकाणें सर्व ब्रिटिश किनाऱ्यावर पसरलीं असून त्या ठिकाणीं उन्हाळ्यांत सर्व प्रकारचे व सर्व दर्जाचे लोक थोडे दिवस तरी राहून, मजा मारून, व पुनः ताजेतवाने होऊन परत आपापल्या ठिकाणीं जातात. मजा मारणेकरितां आलेल्या मुलांमाणसांनीं समुद्रकिनारे नुसते फुलून जातात. मागच्या चित्रांत दाखविल्याप्रमाणें मोठीं माणसें पोहत व स्नान करीत असतांना मुलें नुसतींच पाण्यांत डुबकत किंवा वाळूंत खंदक व किल्ले करीत असतात. कांहीं शिंपा व शंख वेंचतात, तर कांहीं खेकडे पकडण्याच्या नादांत असतात. जिकडे तिकडे आनंद, उल्हास व मजा दृष्टीस पडतात. सबंध वर्ष काम करून बरेचसे पैसे कमावून ठेवले असल्यामुळें थोडे दिवस अशा रीतीनें मजा मारण्यांत व त्याकरितां थोडासा जास्त पैसा खर्च करण्यांत ब्रिटिश लोकांना कांहींच वाटत नाहीं. कारण अशा प्रकारच्या विश्रांतीनेंच त्यांना फिरून जोमानें काम करतां येतें. वर्षाचे शेवटींच नव्हे तर महिन्याच्या शेवटीं, व शक्य असल्यास आठवड्याचेहि शेवटीं आसपास कोठें तरी जाऊन एक फेरफटका करण्याचा प्रघात ब्रिटिश लोकांत पुष्कळच आहे.

लंडनचे बहुतेक लोक पूर्व किनाऱ्यावरील राम्सगेट, मार्गेट वगैरे ठिकाणीं, व दक्षिणकिनाऱ्यावर ब्रायटन्, आइल् आफ् वेट वगैरे ठिकाणीं जातात. सुंदर सुंदर बागा, उद्यानें, बँडच्या जागा, सिनेमा, नाटकगृहें, उपाहारगृहें, बाजार, दुकानें, समुद्राचे धक्के, खेळण्याच्या व शर्यतींच्या जागा अशा कितीतरी सुखसोयी अशा ठिकाणीं केलेल्या असतात. हेतु हा कीं, इच्छा व पैसा असल्यास साधनांची कमतरता पडूं नये.

इंग्लंडच्या दक्षिण भागांत राहणारीं माणसें पूर्व व दक्षिण किनाऱ्याला जातात तर लँकेशर, यॉर्कशर वगैरे उत्तरेकडील भागांत राहणारीं माणसें स्कॉट्लंडमधील डोंगराळ भागांत, व विशेषतः इंग्लंडचे उत्तरेस 'लेक डिस्ट्रिक्ट' म्हणून जो सुंदर व रमणीय प्रांत आहे तेथें जातात. हा सर्व भाग डोंगराळ असून त्यांत ठिकठिकाणीं डोंगरांच्या पायथ्यापायथ्यांशीं लहानमोठीं तळीं व सरोवरें बनलीं आहेत. खालीं खोलग्यांतून नितळ व लखलखीत पाणी, भोंवतालच्या चढावांवरून हिरव्यागार गवताचीं कुरणें, गवतांत मधून मधून चढत असलेलीं व लांबून ठिपक्या ठिपक्यासारखीं दिसणारीं पांढरीं शुभ्र गुरें व बकरीं, आणि वर निळसर आकाश असा मनोहर देखावा असल्यावर कुंद व घामट हवेंतील गजबजलेल्या शहरांतून शेंकडों लोक दरवर्षी निदान एकदां तरी येथें येत असल्यास नवल तें काय ? अत्यंत चित्ताकर्षक व स्फूर्तिदायक असा या प्रांताचा फार दिवसांपासूनचा लौकिक आहे. वर्ड्स्वर्थ्, साऊदे, कोलरिज्, डिक्वेन्सी वगैरे कितीतरी मोठमोठ्या कवींना व लेखकांना याच प्रांतानें काव्य करण्याची व लेखनाची स्फूर्ति दिली असें म्हणतात. या भागांत डर्वेंट् वॉटर, ग्रासमिअर, विंडरमिअर, वगैरे फारच सुंदर सरोवरें असून तेथें लोकांची खूप गर्दी होते; व त्यामुळें शेजारच्या गांवांना फार महत्त्व आलें आहे.

खाण्यापिण्याच्या व राहाण्याच्या जागांप्रमाणेंच प्रवाश्यांना प्रवासाचीं साधनेंहि अतिशय सुखावह व सोइस्कर हवीं असतात; आणि ही त्यांची इच्छा पुरविण्याकरितां कितीतरी मोटार-कंपन्या सज्ज असतात. कोणत्या ठिकाणीं सहल करावयाची येवढें ठरण्याचा अवकाश, कीं मोटारवाले प्रवाश्यांच्या मुक्कामांची, त्यांच्या जेवणाखाणाची व इतर सर्व कांहीं व्यवस्था करतात. या सर्वांला लागणारा

खर्च निराळा न घेतां त्यांनीं तो मोटारीचे भाड्यांत अगोदरच धरलेला असतो. कांहीं वेळां हा वरचा खर्च प्रवाश्याला निराळाच करावा लागतो; ठरलेल्या ठिकाणीं तुम्हांला नेऊन सोडलें, कीं मोटारवाल्याचें काम संपलें. या मोटारीचे धंद्यावर कितीतरी लोक आपली उपजीविका करीत आहेत. नवीन गाड्या तयार करणें, जुन्या दुरुस्त करणें, मोटारला लागणारें रबर, पेट्रोल, लांकूड इत्यादींची पैदास करणें वगैरे धंद्यांत कितीतरी माणसें गुंतलीं असून त्यांवर त्यांचा उदरनिर्वाह चालला आहे. या दृष्टीनें विचार करतांना पेट्रोल व रबर या पदार्थांनीं कोळशाप्रमाणेंच मनुष्याच्या जीवनक्रमांत केवढी मोठी क्रांति घडवून आणिली आहे. या पदार्थांची पैदास आपले देशांत होत नाहीं, व आपल्याला या बाबतींत अमेरिका, रशिया वगैरे देशांचे तोंडाकडे पाहावें लागतें याचें ब्रिटिश लोकांना अतिशय वैषम्य वाटत असून या दोहोंची पैदास साम्राज्यांतील इतर देशांत तरी व्हावी येवढ्याकरितां त्यांचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत.

वाहनाच्या व राहण्याच्या सोयी करून देणाराप्रमाणेंच तिसऱ्या एका प्रकारच्या माणसाची प्रवाश्याला अतिशय जरूरी असते; व तो म्हणजे गाइड् किंवा वाटाड्या. जें ठिकाण पहाण्यास जावयाचें त्याची शक्य ती माहिती मिळविणें, तेथील प्रेक्षणीय स्थळांचे फोटो घेणें वगैरे गोष्टी ब्रिटिश प्रवाश्याला अतिशय महत्त्वाच्या वाटतात. आपल्याप्रमाणें फक्त फराळ करून व झोंप काढून ते प्रवासी परत फिरत नाहींत. माझा एक मित्र ताजमहाल पहावयास गेला, व तेथें काय काय पहावयाचें हें सांगणारा कोणी वाटाड्या वगैरे त्याचे बरोबर नसल्यामुळें तो अरसिक प्रेक्षकांनीं स्वतःचें स्मारक करण्याच्या भरीस पडून पांढऱ्याशुभ्र मनोऱ्यांवर खरडलेलीं काळीं अक्षरें वाचून

परत आला ! वाटाड्या हुशार, चुणचुणीत, व प्रवाश्याच्या मनाचें तालमान पाहणारा असावा लागतो. परंतु तो जर का घुमा असला, किंवा किरकोळ व बारीकसारीक गोष्टीहि सांगत बसला तर प्रवाश्याचे उल्हासांत विरजण पडतें. माझा दुसरा एक मित्र टांकसाळ पाहण्यास गेला असतां तेथील वाटाड्यानें त्याला तेथील जमाखर्चाच्या वह्यांतच इतका गुंतवून ठेवलान् कीं, तो कंटाळून प्रत्यक्ष नाणीं कशीं पाडतात हें पाहिल्यावांचूनच परत फिरला ! तिकडील वाटाडे या बाबतींत मोठे चाणाक्ष असतात. शिवाय त्यांना दुभाष्याचें कामहि करावें लागत असल्यामुळें निरनिराळ्या भाषाहि येत असतात. वाटाड्या जितका चांगला तितकी त्याची कमाई जास्त. अशामुळें पुष्कळशीं हुशार व होतकरू माणसें या धंद्यांत पडतात.

अशा प्रकारें खाणावळीच्या धंद्याशिवाय आणखी कितीतरी पोटधंदे ब्रिटिश बेटांच्या किनाऱ्यांवर, लेक डिस्ट्रिक्टसारख्या प्रांतांत व मोठमोठ्या शहरांतून चालत असून कितीतरी लोकांचें पोट त्यांवर भरत आहे.

विचाराकरितां प्रश्न

प्रकरण ८ वें

१ हिंदुस्थानांत थंड हवेच्या ठिकाणीं जाण्याचा प्रघात आहे. ब्रिटिश बेटांतील लोक कोणत्या प्रकारच्या ठिकाणीं जातात ? अशीं ठिकाणें कोठें कोठें आहेत ?

२ सहलींचे फायदे कोणते ? जुने लोक याला करीत असत, त्यांच्या याला व आपल्या सहली यांत फरक काय ?

३ ब्रिटिश बेटांचे समुद्रकिनाऱ्यावर कोणकोणते धंदे चालतात ? हिंदी किनाऱ्यावर कोणते चालतात ?

प्रकरण ९ वें

आपण आतांपर्यंत काय काय पाहिलें ?

प्रकरण १ लें:–१ ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार. २ ब्रिटिश साम्राज्य व इतर साम्राज्यें यांतील फरक. ३ ब्रिटिश साम्राज्याचा अभ्यास करण्याची जरूरी. ४ ब्रिटिश राज्य व साम्राज्य हीं कशीं व केव्हां बनलीं यासंबंधींचा इतिहास.

प्रकरण २ रें:– १ मुंबईपासून डोव्हरपर्यंत प्रवास करतांना लागलेले जलसंचय–आरबी समुद्र, एडनचें आखात, तांबडा समुद्र, सुएझचा कालवा, भूमध्य समुद्र, इंग्लिश खाडी. २ वाटेंत लागलेलीं महत्त्वाचीं बंदरें-एडन, पेरिम, सुएझ, पोर्ट सय्यद, माल्टा, मार्से, कॅले, डोव्हर. ३ वाटेंतील कांहीं गंमती–एडन गांवांतील पाण्याचें दुर्भिक्ष्य, सुएझचा कालवा, लेसेप्सचें धाडस, पोर्ट सय्यदचा वर्णसंकर, भूमध्य समुद्राच्या कांठचा दमट हिंवाळा, स्ट्रांबोलीचा ज्वालामुखी, मार्से येथील नोत्रदामचें देऊळ, पॅरीचे शौकी लोक. डोव्हरची तपासणी.

प्रकरण ३ रें:–१ लंडनचें महत्त्व-जगांतील सर्वांत मोठें शहर, अतिशय वैभवशाली राजधानी, ब्रिटिश बेटांतील सर्व प्रमुख आग-गाड्यांचें मध्यवर्ती ठिकाण, आतिशय महत्त्वाचें बंदर, उद्योगधंद्यांचें आगर व जगांतील व्यापाराचें मुख्य केंद्र. २ तेथील कांहीं भव्य पूल–टॉवर ब्रिज्, वेस्टमिनिस्टर ब्रिज्, लंडन ब्रिज्. ३ कांहीं प्रसिद्ध स्थळें–पार्लमेंट्, वेस्ट मिनिस्टर ॲबे, ट्रफालगर स्क्वेअर, बकिंगहॅम पॅलेस, हाईड पार्क. ४ तिकडील लोकांचे खेळ, पोषाख, जेवणखाण, आवडी-निवडी, स्वभावविशेष. ५ हवा-पाणी, पिकें, फळें. ६ एक सर्वसाधा-रण घर. ७ एका सामान्य कुटुंबाची दिनचर्या. ८ एक शाळा व तेथील शिक्षण.

प्रकरण ४ थें:–१ ब्रिटिश बेटांचा विस्तार, व जगांतील त्यांचें स्थान. २ भूपृष्ठरचना–डोंगर, नद्या, समुद्रकिनारा यांसंबंधींच्या कांहीं विशेष गोष्टी. ३ हवा-पाणी. ४ पिकें. ५ आयात-निर्यात माल. ६ महत्त्वाचीं बंदरें.

प्रकरण ५ वें:—१ ब्रिटिश बेटांचें वैशिष्ट्य. २ ब्रिटिश बेटांतील महत्त्वाचे कारखाने. ३ मजूरवर्गाची सर्वसाधारण राहणी. ४ त्यांच्या वाढत्या सामर्थ्याचीं कारणें. ५ कोळशाची खाण. ६ लोखंडाची भट्टी. ७ जहाजें बांधण्याचा कारखाना.

प्रकरण ६ वें:—१ गव्हाची शेती व शेतकऱ्याचा जीवनक्रम. २ फळांचे मळे व बागवान्. ३ डेअऱ्या व गवळी ४ कुरणाळ जमीन व धनगर. ५ शेतकीच्या धंद्याला लागलेली उतरती कळा व तिचे परिणाम.

प्रकरण ७ वें:—१ माशांच्या वाढीला अत्यंत अनुकूल असा किनारा. २ कोळी, त्याचें काम, त्याचा आयुष्यक्रम. ३ कोळ्यांचा धाडशी स्वभाव व ब्रिटिश बेटांची अभिवृद्धि.

प्रकरण ८ वें:-१ उद्योगी आयुष्याला विश्रांतीची आवश्यकता. २ विश्रामस्थानें. ३ खाणावळवाले. ४ मोटारवाले. ५ वाटाडे.

वाचकांनो, ‘ साम्राज्यांतील आपले संबंधी ’ या पुस्तकाचा पहिला भाग येथें संपला. दुसऱ्या भागाला सुरुवात करण्यापूर्वीं आपण थोडा वेळ विश्रांति घेऊं. उद्योगी जीवनांत विश्रांतीची किती जरूरी आहे हें नुकतेंच आपण पाहिलें. या विश्रांतीनें ताजेतवाने होऊन आपण साम्राज्यांतील लांबचा पल्ला मारण्याला निघालों म्हणजे वाटेंतच कोठें थकणार नाहीं. या शेवटच्या प्रकरणांत मीं नवीन असें कांहींच सांगितलें नाहीं. ठळक ठळक गोष्टींची नुसती आठवण करून दिली येवढेंच. हेतु हा कीं, मागील सर्व

गोष्टी एखाद्या चित्रपटाप्रमाणें डोळ्यांसमोरून भराभर जात असतांना बारीकसारीक गोष्टींचीहि आठवण व्हावी. ब्रिटिश लोकांची राज्य-व्यवस्था, त्यांच्या सामाजिक चाली-रीति, त्यांचे धार्मिक विधि-संस्कार व त्यांच्या इतर समजुती आणि रूढी इत्यादिसंबंधींची माहिती बरीच मनोरंजक आहे; परंतु या माहितीचा भूगोलापेक्षां इतिहासाशींच जास्त जवळचा संबंध असल्यामुळें भूगोलासारख्या या पुस्तकांत ती न देणें जास्त बरें.

हें प्रकरण संपवितांना तें संपलें म्हणून एक प्रकारें आनंद होत आहे, तर तें संपलें याचमुळें थोडेंसें वाईटहि वाटत आहे. गेले २।४ महिने हा भाग लिहीत असतांना तुम्ही सर्वजण माझ्या अगदीं समोर बसलां असून मी तुम्हांला खरोखरच कांहींतरी सांगत आहे असें वाटून मनाला मोठा आनंद होत होता. पण ती भावना आतां नाहींशी होऊन आपणांला आतां कांहीं वेळपर्यंत तरी एकमेकांना मुकावें लागणार या भावनेनें वाईट वाटत आहे.

सर्व साम्राज्यांत ब्रिटिश लोकांचाच वरचष्मा आहे, व राजकीय दृष्ट्या आपला दर्जा कमी आहे याचें तुम्हांला शल्य वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. पण राजकारण म्हणजेच कांहीं सबंध जीवन नव्हे; तें त्याच्या अनेक अंगांपैकीं एक अंग आहे, म्हणून केवळ राजकारणाचे दृष्टीनेंच त्यांचेकडे न पाहतां जगांतील एका महत्त्वाच्या देशाचे रहिवासी या दृष्टीनें आपण त्यांच्याकडे पाहिलें तर त्यांच्यापासून घेण्यासारखे कितीतरी गुण आपणांस दिसतील. तिकडे राहून आलेले व त्यांच्याशीं परिचय असलेले कितीतरी लोक असें सांगतात कीं, खाजगी स्नेहसंबंधांत, व बोलण्याचालण्यांत इंग्रज लोक मोठे सभ्य व सरळ असतात; आणि व्यक्ति या दृष्टीनें त्यांचें जीवन पुष्कळशा बाबतींत अनुकरणीय आहे. त्यांच्यांत कोणकोणते गुण आहेत हें

मीं वेळोवेळीं सांगितलेंच आहे. इकडे आपला व त्यांचा पुरेसा व खाजगी व्यक्ति या नात्यानें परिचयच होत नसल्यामुळें कांहींना त्यांचे गुणच दिसतात, तर कांहींना त्यांचे दोष तेवढेच दिसतात. परंतु आतां त्यांच्यासंबंधींची बरीचशी माहिती आपणांला झाली असल्यामुळें यापुढें तरी आपलें मत वरील लोकांप्रमाणें केवळ एकतर्फीच होतां कामा नये. त्यांच्यांत असणाऱ्या गुणांबद्दल योग्य तो आदर, व वाटणारे दोष स्वाभाविक परिस्थितीमुळें उत्पन्न झाले आहेत कीं काय हें समजावून घेण्याची इच्छा हे दोन गुण आपल्यांत आले कीं, आपण मिळाविलेल्या ज्ञानाचें सार्थक झालें. असो. साम्राज्यांत आपले आणखी संबंधी कोण कोण आहेत, व त्यांच्यापासूनहि आपणांस कांहीं घेतां येण्यासारखें आहे कीं नाहीं हें आपण थोडक्याच वेळांत पाहूं.

थोडेसे आभार

पण थांबा ! एक लहानसेंच परंतु अत्यंत महत्त्वाचें काम करायचें राहिलें; व तें म्हणजे ज्यांनीं ज्यांनीं म्हणून आपणांस ही माहिती मिळवून देण्याचे कामीं प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत केली त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें हें होय. मुलांनो, खरें पाहिलें असतां मीं हें जें कांहीं लिहिलें आहे तें या उदारात्म्यांनीं वेळोवेळीं निरपेक्षपणें सांगितलेल्या माहितीचा केवळ अनुवाद आहे. मी एक निरोप्या असून 'बोलविता धणी वेगळाची' अशी वस्तुस्थिति आहे. तेव्हां

त्यांचे आभार मानतांना आपल्याला किती आनंद झाला पाहिजे! गुरुवर्य आण्णा (प्रो० धों० के० कर्वे), रा० भास्करराव कर्वे, रा० बाबूराव अत्रे, प्रो० वामनराव जोशी, रा० मोडक, व मुद्रक रा० राजगुरु यांचे आपणावर फार उपकार झाले असून त्यांबद्दल आपण त्यांचे आभार मानूं या. मी रा० भास्करराव कर्वे यांस हें पुस्तक वाचून दाखवीत असतांना गुरुवर्य आण्णाहि तेथें थोडा वेळ होते. त्यांनीं, मला वाटतें, तें १०–१५ मिनिटेंच ऐकलें असावें; परंतु तेवढ्या अवधींतच त्यांनीं ज्या थोड्याश्या सूचना केल्या व जें समाधान चेहऱ्यावर दर्शविलें त्याचे योगानें मला जन्माचा उल्हास आला! रा० भास्करराव कर्वे व रा० बाबूराव अत्रे हे तर इंग्लंडला प्रत्यक्ष जाऊन–राहून आलेले. त्यांच्या प्रत्यक्ष व नेमक्या माहितीचा उपयोग भाराभर अप्रत्यक्ष माहितीपेक्षां मला किती तरी जास्त झाला! प्रो० जोशी व रा० मोडक यांच्या कोणत्याहि लिखाणाकडे पाहाण्याच्या निरनिराळ्या दृष्टींची मला केव्हांहि काय, भारी मदत होते. रा० राजगुरूंनीं प्रसंगाचें महत्त्व ओळखून पुस्तक खरोखरच दोन दिवसांत व तेंहि शक्य तितक्या सुबक रीतीनें तयार करून दिलें!

शेवटीं दोघां व्यक्तींचा उल्लेख करावयाचा राहिला. एक म्हणजे सौ० गंगूबाई पटवर्धन व दुसरी म्हणजे नाना नारळकर. सबंध दुसरें प्रकरण जवळ जवळ गंगूबाईच्या विलायतच्या पत्रांतूनच घेतलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं (एक दोन कल्पना व एक वाक्य तर सबंधच्यासबंध तात्यासाहेब केळकरांच्या विलायतच्या बातमीपत्रांतील आहे). त्याहि विलायतेंत वर्ष-दीडवर्ष राहून आल्यामुळें इतर अन्य प्रकारची माहिती पुरविण्याचे कामीं त्यांचा मला फार उपयोग झाला, हें काय मी सांगायास पाहिजे? प्रो० नारळकर यांस मी

लहानपणच्या सलगीनें जरी ' नाना ' म्हणून संबोधीत असलों, व वयाचा मान राखण्याकरितां म्हणूनच जरी ते मला ' तर्थिस्वरूप ' म्हणून मानीत असले तरी खरें सांगावयाचें म्हणजे ते माझे स्फूर्तिदाते आहेत असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यांना अपरिहार्य अडचणीमुळें व प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपल्या मनासारखी प्रस्तावना लिहितां आली नाहीं तरी त्यांनीं माझी मनांतली इच्छा ओळखून रणांगणावरच्या धुमश्चक्रींतहि शक्य तितकी सवड काढून प्रस्तावनेवजा पत्र लिहिलें हेंच त्यांच्या सुहृद्भावाचें प्रत्यंतर. आपण या दोघांहि व्यक्तींचे मनःपूर्वक आभार मानूं.

या वरील व्यक्तींप्रमाणेंच मला खालील पुस्तकांचाहि फार उपयोग झाला आहे. तुम्हीहि जमल्यास तीं अवश्य वाचा.

१ आमचा विलायतचा प्रवास (श्रीमंत सौ० माईसाहेब घोरपडे–इचलकरंजी).
२ विलायतचीं बातमीपत्रें (श्री० न० चिं० केळकर).
३ यूरोपचा प्रवास (गुरु० प्रो० भाटे).
४ रिजनल जिऑग्रफी.
५ हाय रोड्स् ऑफ् जिऑग्रफी.
६ अवर वर्ल्ड (मॉरिसन्.)
७ लँड्स् अँड लाइफ् हॉर्निब्लो.
८ न्यू एज जिऑग्रफीज् (डड्ले स्टंप्)
९ ह्यूमन जिऑग्रफीज् (फेअर्ग्रीव्ह, अँड यंग)
१० रॅवल्स् अमंग अवर इंडस्ट्रीज् (ब्लॅकी अँड् सन्)